बुलढाणा | मंगळवार । २१ जुलै २०२६ । वर्ष-३ । अंक-३३७ । पृष्ठे-१२ । किंमत-५ रु. | RNI : MAHMAR/2023/89148 | DAINIK MAHABHOOMI | बुलढाणा। छत्रपती संभाजीनगर । जालना । अकोला । वाशिम

https://dainikmahabhoomi.com | https://epaper.dainikmahabhoomi.com

दैनिक महाभूमि

निर्मळ, निकोप, निःपक्ष



## आंदोलकांचा मार्च निघताच संसद भवनाचे दरवाजे बंद

## अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या, संसद मोर्चावरही लाठीमार

# दिल्लीत आंदोलन चिघळले

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था**

राजधानी दिल्लीत सोमवारी अनपेक्षित गदारोळ बघायला मिळाला. कॉक्रोच जनता पार्टीने दिलेल्या हाकेला प्रतिसाद देत हजारो तरुण रस्त्यावर आले. त्यामुळे दिवसभर पोलिसांसोबत झटापटी सुरू होत्या. कॉकरोच जनता पार्टीचे आंदोलक संसद भवनाजवळ पोहोचताच संसद भवनाचे मुख्य प्रवेशद्वार बंद करण्यात आले. जमावाला नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्यांचा वापर केला. आंदोलकांनी रेल्वे भवनजवळ धरणे आंदोलन केले. दिल्लीतील हे आंदोलन चिघळल्याने सर्वत्र तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

संसद भवनात धर्मेंद्र प्रधान आणि अमित शाह यांची भेट झाली. सीजेपीच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्त्वाची मानली जात आहे. दुसरीकडे, सरकारनेही सीजेपी नेत्यांना भेटीसाठी बोलावले आहे. कॉकरोच जनता पार्टीतर्फे आशुतोष रांका आणि सौरभ दास हे केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांची भेट घेण्यासाठी गेले होते. सीजेपीचा दावा आहे की, सरकारने सकाळीच बोलणी करण्यासाठी संपर्क साधला होता. यापूर्वी जेव्हा आंदोलक जंतर-मंतरवरून संसदेच्या दिशेने पुढे जाण्याचा प्रयत्न करत होते, तेव्हा पोलिसांनी त्यांच्यावर लाठीचार्ज केला. संसदेचे पावसाळी अधिवेशन आणि सीजेपीच्या संसद मार्चला लक्षात घेता दिल्ली पोलिसांनी राजधानीत आधीच सुरक्षा व्यवस्था कडक केली होती. नवी दिल्लीत बीएनएस कलम १६३ लागू करण्यात आले होते. सीजेपीच्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी अनेक पक्षांच्या नेत्यांनी उपस्थिती दर्शवली होती. आम आदमी पार्टीचे मनीष सिसोदिया, संजय सिंह, आजाद समाज पार्टीचे प्रमुख आणि यूपीचे नगीना मतदारसंघाचे सांसद चंद्रशेखर यांच्यासह अभिनेते प्रकाश राज आणि सोनम वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली देखील उपस्थित होत्या.



### ५० हून अधिक पोलीस जखमी

■ सीजेपीच्या आंदोलकांशी झालेल्या संघर्षात ५० हून अधिक पोलीस जखमी झाले असून, त्यामुळे कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. जखमी पोलिसांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, हिंसाचारानंतर पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली आहे. नवी दिल्लीतील महत्त्वाच्या ठिकाणी सुरक्षा आणखी वाढवण्यात आली आहे. या संघर्षात सहभागी असलेल्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे. हे नाकारले आहे. सोमवारी सकाळी ८ वाजता सुरू झालेल्या आंदोलनादरम्यान झालेल्या पोलीस लाठीचार्ज आणि संघर्षात अनेक आंदोलक जखमी झाले.



### पोलिसांनी आंदोलकांना जंतर-मंतरवरून हटवले

■ कॉकरोच जनता पक्षाच्या आंदोलकांना जंतर मंतरवरून हटवण्यात आले आहे. पोलिसांनी व्यासपीठ मोकळे करून तंबू हटवले आहेत. आंदोलकांना तेथून हुसकावून लावले. आंदोलनादरम्यान पोलिसांनी जोरदार लाठीचार्जही केला. दरम्यान, सीजेपीने अभिजीत दीपके यांना ताब्यात घेतल्याचा दावा केला आहे. मात्र, पोलिसांनी हे नाकारले आहे. सोमवारी सकाळी ८ वाजता सुरू झालेल्या आंदोलनादरम्यान झालेल्या पोलीस लाठीचार्ज आणि संघर्षात अनेक आंदोलक जखमी झाले.

## महाराष्ट्रातही आंदोलन; मुंबईत जमावबंदी

**मुंबई :** सोनम वांगचुक आणि अभिजीत दिपके यांच्या समर्थनार्थ सोमवारी राज्यभर आंदोलन करण्यात आले. दरम्यान, मुंबईत जमावबंदी लागू करण्यात आली. पोलिसांचे म्हणणे आहे की, मुंबईत नव्याने जमावबंदी नाही. मुंबई पोलिसांकडून झालेले आदेश कायम स्वरूपाचे. दर १५ दिवसांनी मुंबई पोलिसांकडून हे आदेश जारी केले जातात, असे स्पष्टीकरण मुंबई पोलिसांनी दिले आहे. पुढील १५ दिवसासाठी जमावबंदी लागू करण्यात आली. कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी जमावबंदीचे आदेश हे लागू करण्यात आले आहेत. २३ जुलैपासून ०३ ऑगस्टपर्यंत जमावबंदी मुंबईत लागू करण्यात आली. मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत २३ जुलै २०२६ रोजी रात्री १२.०१ वाजल्यापासून ६ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत जमावबंदीचे आदेश लागू करण्यात आले आहेत. सार्वजनिक शांतता भंग होण्याची, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची तसेच मानवी जीवित व मालमत्तेचे नुकसान होण्याची शक्यता लक्षात घेऊन हे आदेश जारी करण्यात आले आहेत. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास मनाई करण्यात आली आहे. कोणत्याही प्रकारच्या मिरवणुकांवर बंदी घालण्यात आली असून मिरवणुकांमध्ये लाऊडस्पीकर, ध्वनिवर्धक, वाद्यवृंद तसेच फटाके फोडण्यासही मनाई करण्यात आली आहे.

### माझे उपोषण सुरूच राहणार : सोनम वांगचूक



■ नीट-यूजी परीक्षा पेपरफुटी प्रकरणावरून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करणाऱ्या आंदोलनकर्त्यांच्या शिष्टमंडळाने सरकारसोबत चर्चा केल्यानंतरही, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांनी आपले उपोषण मागे घेण्यास नकार दिला आहे. आंदोलक विद्यार्थी नेत्यांना एकतर संसदेत जाऊन खासदारांची भेट घेण्याची परवानगी दिली जावी किंवा खासदारांनी स्वतः दिल्लीतील सफदरजंग रुग्णालयात येऊन त्यांची भेट घ्यावी, या मागण्या पूर्ण होईपर्यंत आपले आमरण उपोषण सुरूच राहील, अशी घोषणा वांगचूक यांनी केली आहे.

### आंदोलकांच्या नेमक्या मागण्या काय?

- सोनम वांगचुक यांची त्वरित सुटका करावी.
- शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्यावा.
- आत्महत्या केलेल्या सर्व नीट परीक्षार्थींच्या कुटुंबियांना एक कोटी रुपयांची नुकसानभरपाई मिळावी.

## न्यूज ब्रीफ

### तेहरानचा प्रवास पुढे ढकला, देश तातडीने सोडा

**तेहरान :** इराणमधील भारतीय दूतावासाने त्या देशात जाण्याची योजना आखणाऱ्या नागरिकांसाठी एक सूचना जारी केली. सुरक्षेच्या परिस्थितीमुळे त्यांनी आपला प्रवास पुढे ढकलावा आणि सध्या इराणमध्ये असलेल्या भारतीयांनी काही काळासाठी देश सोडण्याचा विचार करावा, असे आवाहन दूतावासाने केले आहे. तेहरानमधील भारतीय दूतावासाने ही माहिती दिली. दूतावासाने आपल्या सुधारित सूचनेत म्हटले आहे की, कोणत्याही कारणास्तव इराणला भेट देण्याची योजना आखणाऱ्या भारतीय नागरिकांनी सुरक्षेची परिस्थिती सुधारेपर्यंत आपला प्रवास सध्या पुढे ढकलावा.

### आक्षेपार्ह विधान करणाऱ्या आमदाराला अटक

**थुथुकुडी (तामिळनाडू) :** तामिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांच्याबद्दल आक्षेपार्ह विधान केल्याप्रकरणी पोलिसांनी विलाथिकुलम मतदारसंघाचे डीएमके आमदार जी. व्ही. मार्कंडेयन यांना अटक केली आहे. मतदारांचे आभार मानण्यासाठी १८ जुलै रोजी डीएमकेची एक जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत आमदार मार्कंडेयन यांनी केलेल्या भाषणामुळे मोठा वाद निर्माण झाला आहे.

### आता इथेनॉलवर अन्न शिजणार!

**नवी दिल्ली :** पेट्रोलनंतर आता इथेनॉल थेट स्वयंपाक घरातही पोहचण्याची शक्यता आहे. देशाचे एलपीजी वरील अवलंबित्व आणि एलपीजी आयातीवर होणारा कोट्यवधींचा खर्च कमी करण्यासाठी, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय एका विशेष धोरणावर काम करत असल्याची माहिती आहे. या वर सप्टेंबरपर्यंत शिक्कामोर्तब होऊ शकते.

## समृद्धी महामार्गावर भीषण अपघात

### ट्रकच्या धडकेनंतर कार पेटली; सहा जणांचा मृत्यू

**वर्धा, वृत्तसंस्था**

समृद्धी महामार्गावर वर्ध्यातील विरूळ गावाजवळ सोमवारी पहाटेच्या सुमारास एक भीषण अपघात झाला आहे. या अपघातात सहा जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. नागपूरकडे जाणाऱ्या एका कारला मागून भरधाव येणाऱ्या मालवाहू वाहनाने जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भयंकर होती की, अपघात होताच कारने अचानक पेट घेतला आणि आगीच्या मोठ्या ज्वाळा उसळल्या. या दुर्घटनेत कारमधील चार जणांना बाहेर पडण्याची कोणतीही संधी मिळाली नाही आणि ते आतच जिवंत होरपळले. तर धडक देणाऱ्या मालवाहू वाहनातील दोन व्यक्तींचांही मृत्यू झाला असून, अन्य एक जण गंभीर जखमी झाला आहे.

या भीषण अपघातात एकूण सहा जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये आयशर ट्रकचा चालक संजय कुमार (३०, उत्तर प्रदेश), वाहक समरजित पाल (२४, उत्तर प्रदेश) यांच्यासह कारमधील जानवी राजेश टिपले (२१), सुषमा राजेश टिपले, राजेश आनंदराव टिपले आणि अंकुश राऊत (सर्व रा. सालोड हिरापूर, जि. वर्धा) यांचा समावेश आहे.



### इथेनॉल टँकर उलटल्याने गोंधळ

■ या अपघाताचे मूळ कारण काल रात्री घडलेल्या एका दुसऱ्या घटनेत आहे. याच मार्गावर रात्रीच्या सुमारास इथेनॉल वाहून नेणारा एक टँकर पलटी झाला होता. त्यामुळे सुरक्षेचा उपाय म्हणून महामार्गाची एक बाजू बंद करून दुसऱ्या बाजूने एकेरी वाहतूक सुरू करण्यात आली होती. याच एकेरी मार्गावरून वाहतूक सुरू असताना, पहाटेच्या सुमारास विरूळ गावाजवळ एका मालवाहू वाहनाच्या चालकाचे स्वतःच्या वाहनावरील नियंत्रण सुटले. हे अनियंत्रित वाहन थेट समोरून चाललेल्या कारवर जाऊन जोरदार आदळले आणि त्यानंतर हा मृत्यूचा तांडव घडला.

## पावसाळी अधिवेशनाला वादळी सुरुवात

### कामकाज पाच वेळा तहकूब : पेपरफुटी अन् धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यावर विरोधक आक्रमक

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचा पहिलाच दिवस वादळी ठरला आहे. ससंदेत विरोधी पक्षांनी तर संसदे बाहेर कॉक्रोज पार्टी आणि सोनम वांगचूक यांच्या समर्थकांनी सरकारला घाम फोडल्याचे चित्र बघायला मिळाले. संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला २० जुलैपासून वादळी सुरुवात झाली.

पहिल्याच दिवशी संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये म्हणजे लोकसभेत आणि राज्यसभेत विरोधकांनी जोरदार गदारोळ केला. नीट पेपर लीक प्रकरण आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीवर विरोधक ठाम होते. त्याची मागणी त्यांनी लावून धरली होती. या गदारोळामुळे लोकसभा सोमवारी पाच वेळा स्थगित करावी लागली. तर राज्यसभा पूर्ण दिवसासाठी तहकूब करण्यात आली. लोकसभेचे कामकाज सुरू झाल्यानंतर विरोधकांनी हा प्रश्न लावून धरला होता. अध्यक्षांनी विरोधकांना शांत राहण्याचे आवाहन केले. पण त्याचा काही एक फरक विरोधकांवर पडला नाही. अध्यक्षांच्या आवाहनानंतरही गदारोळ न थांबल्याने कामकाज वारंवार तहकूब करावे लागले. असे एकदा नाही तर तब्बल पाच वेळ लोकसभा तहकूब करावी लागली. शेवटी अध्यक्षांनी कामकाज दिवसभरासाठी तहकूब केले. पहिल्या दिवशी लोकसभेत विरोधकांनी अध्यक्षांसमोर येऊन घोषणाबाजी सुरू केली. त्यामुळे प्रश्नकाळ आणि शून्यकाळचे कामकाज होऊ शकले नाही.





### धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्याच्या घोषणा...

■ लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी खासदारांना सभागृहाची प्रतिष्ठा राखण्याचे आवाहन केले. घोषणाबाजीने संसदेची मर्यादा राखली जात नाही, तर्कशुद्ध चर्चा करा, असे बिर्ला म्हणाले. मात्र, गदारोळ न थांबल्याने त्यांनी पहिल्यांदा बैठक दुपारी १२ वाजेपर्यंत स्थगित केली. दुपारी १२ वाजता कामकाज पुन्हा सुरू झाले. त्यानंतर ही विरोधकांचा आक्रमक पणा कमी झाला नव्हता. त्यांनी धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली. विरोधकांनी न्याय दो आणि धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या अशा घोषणा दिल्या. विरोधक प्रचंड आक्रमक झालेले दिसले. ते आपल्या मागणीवर ठाम होते. त्यामुळे सरकार समोर ही पेच निर्माण झाला होता.

### हे प्रकरण केवळ गुन्ह्याचा विषय : सर्वोच्च न्यायालय

## राम मंदिर दान चोरीचे राजकारण करू नका

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था**

अयोध्या येथील राम मंदिर देणगी कथित चोरी प्रकरण केवळ गुन्ह्याचा विषय आहे, असे निरीक्षण नोंदवत या प्रकरणाचे राजकारण केले जाऊ नये. देणगी अपहार प्रकरणाची योग्य चौकशी सुनिश्चित करणे, हीच न्यायालयाची भूमिका असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने २० जुलै रोजी स्पष्ट केले.

अयोध्या येथील राम मंदिरासाठी मिळालेल्या देणगीतील कथित चोरी प्रकरणाची न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशी व्हावी, अशी मागणी करणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. या याचिकांमध्ये सीबीआय चौकशी, फॉरेन्सिक ऑडिट आणि श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टच्या खात्यांचे कॅगद्वारे लेखापरीक्षण करण्याची मागणी करण्यात आली होती.

सुनावणीदरम्यान खंडपीठाने म्हटले की, हे केवळ गुन्हा घडल्याचे प्रकरण आहे. आम्ही येथे केवळ योग्य चौकशी सुनिश्चित करण्यासाठी आहोत. न्यायालये ही राजकारणाची जागा नव्हे. तसेच, संबंधित पक्षांनी या मुद्द्याचे राजकारण करू नये, असेही न्यायालयाने बजावले.



### एसआयटी तपासाची माहिती सादर करण्याचे आदेश

■ राम मंदिर देणगीतील कथित अपहाराची चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक स्थापन करता येईल का? याबद्दल सूचना घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांना सांगितले. यावर उत्तर देताना सॉलिसिटर जनरल यांनी सांगितले की, एसआयटीची स्थापना आधीच करण्यात आली असून उत्तर प्रदेश पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी २७ जुलै रोजी निश्चित करण्यात आली आहे; त्या दिवशी उत्तर प्रदेश सरकार एसआयटीच्या तपासाच्या प्रगतीबाबत न्यायालयाला माहिती देईल.

## अपार आयडीसाठी संमती अनिवार्य

### प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयाने सीबीएसईकडून मागितले उत्तर

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या 'अपार आयडी'शी संबंधित प्रकरणावरील सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण टिप्पणी केली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने स्पष्ट केले की, न्यायालय या प्रकरणी योग्य तो आदेश जारी करेल. सुनावणीदरम्यान न्यायालयाने संकेत दिले की, 'अपार आयडी'शी संबंधित डेटा सुरक्षा आणि गोपनीयतेच्या (प्रायव्हसी) चिंतांची चौकशी करण्याचे निर्देश देण्यास न्यायालय तयार आहे. या संपूर्ण प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) कडून उत्तर मागवले आहे.

'अपार आयडी' इतर ओळखपत्रांशी जोडणे आणि त्याची कथित अनिवार्यता याला आव्हान देणाऱ्या याचिकेवरील सुनावणीदरम्यान हा विषय समोर आला. कोणत्याही स्पष्ट आणि स्वतंत्र संमतीशिवाय 'अपार आयडी' बनवण्यासाठी दबाव आणणे, हा नागरिकांच्या गोपनीयतेच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन ठरू शकतो, असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांनी केला. ही याचिका विद्यार्थ्यांच्या चार पालकांनी दाखल केली आहे.

### प्रत्येक गोष्टीकडे संशयाने पाहू नका : सरन्यायाधीश

■ याचिकाकर्त्यांच्या सर्व युक्तिवादांशी पूर्णपणे सहमत न होता सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले, देशातील प्रत्येक गोष्टीकडे आपण संशयाच्या नजरेने पाहायला नको. हे एक स्वागतार्ह पाऊल आहे. या योजनेमागील मुख्य उद्देश प्रत्येक विद्यार्थ्याला एक युनिक आयडी देणे हा आहे. सीबीएसई मुख्यालयाकडे प्रत्येक विद्यार्थी काय शिकत आहे याची स्पष्ट माहिती असावी, जेणेकरून शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर राखण्यास आणि अभ्यासक्रमाची सुरळीत अंमलबजावणी करण्यास मदत होईल, असे सीजेआय यांनी स्पष्ट केले.

## न्यूज ब्रीफ

### ‘उद्धव ठाकरेंच्या पक्षात कार्यकर्ते उरले नाहीत’

**नाशिक :** राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांनी नाशिकमधील पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेसह संजय राऊत, सुप्रिया सुळे आणि रोहित पवार यांच्यावर जोरदार टीका केली. ठाकरेंच्या आंदोलनांना प्रतिसाद मिळत नसल्याने इतरांच्या आंदोलनांना पाठिंबा देण्याची वेळ त्यांच्यावर आली असल्याचा टोला त्यांनी लगावला. तसेच मतदारसंघ पुनर्रचना, मतदार यादी विशेष पुनरावलोकन, पर्यावरण, विविध मुद्द्यांवरही त्यांनी भूमिका स्पष्ट केली. उद्धव ठाकरे यांच्या आंदोलना बाबत बोलताना महाजन म्हणाले, "ठाकरेंची शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या काही गटांना आंदोलनासाठी माणसं मिळत नाहीत. त्यामुळे जिथे कुठे आंदोलन होईल तिथे सहभागी होणं एवढंच त्यांचे काम उरले आहे. कार्यकर्ते कमी झाल्यामुळे त्यांना इतरांच्या आंदोलनात जावे लागत आहे."

### गंगाखेड, अमरावती व काटोलच्या सुधारित तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांना मंजुरी

# संतपरंपरेचा वारसा जपत तीर्थक्षेत्रांचा विकास : मुख्यमंत्री

**मुंबई / वृत्तसंस्था**

संतपरंपरेचे जतन करत आध्यात्मिक वारसा जपत धार्मिक पर्यटनाला चालना देण्यासाठी तीर्थक्षेत्रांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

परभणी जिल्ह्यातील गंगाखेड येथील श्री संत जनाबाई तीर्थक्षेत्रासाठी ४८.५५ कोटी, अमरावती येथील श्री संत गाडगेबाबा समाधीस्थळासाठी २५ कोटी आणि नागपूर जिल्ह्यातील काटोल येथील श्री चक्रधर स्वामी मंदिर परिसरसाठी ४१.७५ कोटी या तीन तीर्थक्षेत्रांच्या सुधारित विकास आराखड्यांना एकूण ११५ कोटींच्या विकासकामांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. आराखड्यातील सर्व कामे उत्सव काळातील भाविकांची संख्या लक्षात घेवून दर्जेदार पद्धतीने व टप्प्याटप्प्याने निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सहयाद्री अतिथी गृह येथे विविध तीर्थक्षेत्र विकास आराखडा शिखर समिती बैठकीमध्ये मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी राज्यमंत्री ॲड आशिष जयस्वाल, राज्यमंत्री मेघना साकोरे- बोर्डीकर, आमदार रत्नाकर गुट्टे, आमदार चरण सिंग ठाकूर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल उपस्थित होते.



**संत गाडगेबाबा समाधीस्थळ विकासासाठी २५ कोटी**

अमरावती येथील श्री संत गाडगेबाबा समाधीस्थळ विकासासाठी २५ कोटी रूपयांच्या कामांमध्ये श्री संत गाडगे महाराज स्मृती केंद्र कल्चरल व्हॅल्यू एज्युकेशन सेंटरचे उर्वरित बांधकाम, श्री संत गाडगे महाराज स्मृति भवन परिसरामध्ये शेतकरी ग्राम सफाई मिशन सेंटर तळमजल्याचे बांधकाम करणे, यात्री निवासाच्या दुसऱ्या व तिसऱ्या मजल्याचे बांधकाम, कीर्तनासाठी सभागृह, समाधीचा जीर्णोद्धार व सौंदर्यीकरण, ध्यान केंद्रासाठी इमारत, कुंताबाई समाधीचे सौंदर्यीकरण, अंतर्गत रस्ते,पार्किंग, बगीचे,फर्निचर व इतर पायाभूत सुविधांचा समावेश आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भाविकांना आधुनिक सुविधा उपलब्ध करून देतानाच तीर्थक्षेत्रात नव्याने करण्यात येणाऱ्यां कामांमुळे स्थानिक अर्थव्यवस्था, रोजगार आणि पर्यटनालाही मोठी चालना मिळेल.

चक्रधर स्वामी मंदिर परिसरासाठी ४१.७५ कोटींच्या कामांमध्ये काटोल येथील भगवान श्री चक्रधर स्वामी मंदिर परिसर विकास आराखड्यात बहुउद्देशीय सभागृह, आधुनिक सार्वजनिक प्रसाधनगृह, भव्य प्रवेशद्वार, संरक्षक भिंत, वाहनतळ, बगीचा, कमानी पूल, पाथवे आणि इतर पर्यटन सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. या विकासामुळे महानुभाव पंथाच्या या ऐतिहासिक तीर्थक्षेत्रात धार्मिक पर्यटनालाही चालना मिळणार आहे.

# 'विश्वगुरु झुरळांना घाबरतात!'

### दिल्लीतील दडपशाहीवरुन अंधारेंचा घणाघात

**नाशिक :** संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राजधानी दिल्लीत कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वाखाली संसदेवर धडक मोर्चा काढण्यात आला. संसद भवनाजवळ पोहोचलेल्या या आंदोलकांना रोखण्यासाठी आणि पांगवण्यासाठी पोलिसांकडून बळाचा वापर करत अश्रुधुराच्या नळकांड्या फोडण्यात आल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. दरम्यान, पोलिसांच्या या दडपशाहीवरून आता राजकीय वातावरणही तापले असून, शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी या कारवाईचा तीव्र निषेध करत केंद्र सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर सडकून टीका केली आहे. 'विश्वगुरू झुरळांना घाबरतात, असे त्या म्हणाल्या.



दिल्लीतील आंदोलनाची बातमी आपल्या सगळ्यांच्या माध्यमातून बघायला मिळत आहे. भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाहीवादी देश आहे. आंदोलकांचा प्रश्न चर्चेतून सोडवता आला असता. पण प्रश्न चर्चेच्या पातळीवर सोडवण्याऐवजी सोनम वांगचुक यांना ज्या प्रकारे उचलले त्यातून आंदोलन मोडून काढण्यावर जास्त भर दिल्याचे दिसत आहे. पांढऱ्या चादरी घेऊन सोनम वांगचुक यांना हटवण्याचा प्रयत्न झाला. आपल्याकडे पांढऱ्या चादरी कधी वापरल्या जातात? शेवटच्या क्षणी. लोकशाही शेवटचा घटका मोजत आहे. लोकशाहीचा मुडदा उचलायचा आहे, अशा पद्धतीने पांढऱ्या चादरी वापरल्या गेल्या. विरोधी पक्षाने विद्यार्थी आंदोलनावरुन देशभर आक्रमक भुमिका घेतली आहे.

# नीट पेपरफुटीचे आंदोलन म्हणजे नौटंकी : बावनकुळे

**मुंबई / वृत्तसंस्था**

राजधानी दिल्लीत सोनम वांगचुक तसेच अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वात नीट पेपरफुटी प्रकरणी मोठे आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला महाराष्ट्रातून देखील विरोधी पक्षांकडून तसेच विविध विद्यार्थी संघटनांकडून पाठिंबा दिला जात आहे. या पार्श्वभूमीवर भाजप नेते व मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया देत ही सगळी नौटंकी असल्याची टीका केली आहे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, असे आंदोलन पेटवण्याचे काम कधीच नाही केले. एक विचार असा आहे जो पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना डॅमेज करण्यासाठी, देवेंद्र फडणवीस यांना डॅमेज करण्यासाठी असा समाजात एक गट निर्माण झाला आहे. या गटाला दिवसभर काम करायचे आहे. त्यामुळे कॉकरोच वगैरे आंदोलन सगळी नौटंकी आहे. काही मुद्दे मिळत नाही म्हणून लोकांच्या मनात द्वेष निर्माण करण्याचे काम सुरू आहे. काही मुलांना मनस्ताप झाला आहे म्हणून देखील ते तिथे सहभागी झाले आहेत. याचा अर्थ असा नाही की सरकारने यावर काही कारवाई केली नाही.



**मंत्र्यांचा राजीनामा मागून राजकारण सुरु**

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, सिस्टममध्ये कोणीतरी बदमाशी केली आणि त्याची शिक्षा त्याला मिळाली आहे. सरकारने योग्य आणि कडक कारवाई केली आहे. तसेच सरकारने पुन्हा एकदा नीट परीक्षा घेतली आहे. तुम्ही सुधारणा सुचवायला पाहिजे, पण या पद्धतीने, जेव्हा सरकारने आधीच कारवाई केली आहे आणि तरी तुम्ही मंत्र्यांचा राजीनामा मागून या ठिकाणी राजकारण करत आहात, अशी टीका बावनकुळे यांनी केली आहे.

आमच्या मंत्र्यांनी पेपर लीक केला आहे का? चंद्रशेखर बावनकुळे किंवा धर्मेंद्र प्रधानजींनी पेपर लीक केला आहे का? असा सवाल बावनकुळे यांनी उपस्थित केला आहे.

### विरोधकांचा आवाज दाबणे ही हुकूमशाहीची नांदी : प्रकाश आंबेडकर

**मुंबई :** दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थी आणि आंदोलकांवर झालेल्या कथित लाठीचार्जच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. लोकशाहीत उत्तरदायित्वाची मागणी, संवाद आणि शांततापूर्ण आंदोलन हीच खरी लोकशाहीची ओळख असल्याचे सांगत, आंदोलकांचा आवाज दडपणे म्हणजे हुकूमशाहीचे लक्षण असल्याचा आरोप त्यांनी केला. प्रकाश आंबेडकर यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या नागरिकांवर बळाचा वापर केला जात असेल आणि मतभेद दडपण्याचा प्रयत्न होत असेल, तर तो लोकशाही नव्हे तर हुकूमशाहीचा मार्ग आहे.

# महाविद्यालयीन तरुणीवर चार मित्रांकडून वर्षभर सामूहिक अत्याचार; गुन्हा दाखल

**पुणे / वृत्तसंस्था**

महिलांवरील तसेच महाविद्यालयीन तरुणींवर लैंगिक अत्याचारांच्या घटना दिवसेंदिवस वाढताना दिसत आहेत. पुण्यातील एका महाविद्यालयीन तरुणीवर चौघांकडून लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे सलग एक वर्ष या तरुणीवर चार मित्रांकडून लैंगिक अत्याचार केल्याचे समोर आले आहे. अश्लील व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत या नराधमांनी तरुणीवर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचे समजते. अखेर या त्रासाला कंटाळून तरुणीने वाघोली पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार पीडित तरुणीच्या फिर्यादीवरुन वाघोली पोलिसांनी चौघांना अटक केली आहे. फरहान शेख, फजल शेख, रेहान शेख आणि साहिल अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी तरुणी ही पुण्याच्या विमान नगर परिसरात वास्तव्यास आहे. २०२५ मध्ये या तरुणीने पुण्यातील एका नामांकित महाविद्यालयात प्रवेश घेतला होता. याच ठिकाणी तिची ओळख या प्रकरणातील मुख्य आरोपी फरहान शेख याच्याशी झाली. पुढे या ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. मात्र, याच विश्वासाचा आणि मैत्रीचा गैरफायदा घेत फरहानने आपल्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक आरोप या महाविद्यालयीन तरुणीने केला आहे.

पीडित तरुणीने दिलेल्या फिर्यादीनुसार, केवळ एकानेच नव्हे तर या प्रकरणातील चौघांनी मिळून गेल्या वर्षभरापासून विविध ठिकाणी तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केले आहेत.

या खळबळजनक घटनेची गंभीर दखल घेत पुणे पोलिसांनी तत्काळ कारवाई केली असून प्रकरणातील चारही आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. सध्या पोलिसांकडून या प्रकरणाचा सविस्तर तपास सुरू आहे. मात्र, शिक्षणाचे माहेरघर असलेल्या पुण्यात उघडकीस आलेल्या या धक्कादायक घटनेमुळे सर्वत्र तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.




### राशीभविष्य

- **मेष :** महत्त्वाच्या घडामोडी घडतील. विवाहाच्या प्रयत्नांना गती येईल. व्यवसायात प्रतिकूलता राहणार आहे.
- **वृषभ :** नोकरीत नव्या जबाबदाऱ्या येतील. वरिष्ठांची मर्जी राखावी. कायदेशीर बाबतीत काळजी घ्यावी.
- **मिथुन :** स्नेही, आप्तेष्टांच्या भेटीगाठी होतील. वाढत्या खर्चाचा ताण राहील. विद्यार्थ्यांना दिलासा मिळेल.
- **कर्क :** महत्त्वाचे करार रखडतील. कार्याच्या विस्ताराला चालना मिळेल. यांत्रिक क्षेत्रात संधी लाभतील.
- **सिंह :** बोलण्यातून गैरसमज संभवतात. कार्यकारणभाव जाणून घ्या. प्रवासाचे बेत सफल ठरणार आहेत.
- **कन्या :** सातत्य, चिकाटी कामी येईल. रखडलेली कामं मार्गी लागतील. प्रियजनांच्या भेटीगाठी होतील.
- **तूळ :** स्वकर्तृत्त्वावर विश्वास ठेवावा. नोकरी–व्यवसायात उत्तम संधी लाभतील. गुणीजनांचा गौरव होईल.
- **वृश्चिक :** अनावश्यक खर्चाचा ताण राहील. आलेल्या संधींचा लाभ घ्यावा. मानसिक अस्वास्थ्य राहील.
- **धनु :** कौटुंबिक प्रश्नातून मार्ग निघेल. मुलांच्या गुणांना वाव मिळेल. स्थापत्य क्षेत्रात संधी लाभतील.
- **मकर :** आजचा दिवस खास आहे. सर्व काही मनाप्रमाणे घडेल. मोठी खरेदी करणं तुर्तास टाळायला हवं.
- **कुंभ :** अनुभवींचं मार्गदर्शन कामी येईल. नव्या योजना मार्गी लागतील. मुलांची मनाजोगी प्रगती होईल.
- **मीन :** महत्त्वाची कामं मार्गी लागतील. उपजत कला–गुणांना वाव मिळेल. उत्कर्षाच्या संधी लाभतील.

### दिन विशेष — २१ जुलै

- **१९३५ :** मुंबई मराठी साहित्य संघाची स्थापना.
- **१९७७ :** नीलम संजीव रेड्डी यांची राष्ट्रपतीपदी निवड.
- **२०१३ :** लडाखमध्ये चीनी लष्कराची घुसखोरी.
- **२०१४ :** आसाममधल्या काँग्रेस आमदारांचे बंडखोर नेते शर्मा यांचा राजीनामा.
- **२०१७ :** शिराळ्यात जिवंत नागांची पूजा करण्यास न्यायालयाची मनाई.
- **२०१८ :** वस्तू आणि सेवाकर परिषदेने सर्वसामान्यांना दिलासा देत शंभर वस्तूंवरील कर कमी करण्याचा निर्णय घेतला.

### आरोग्यमंत्र — आहारात ताक हवं

रोजच्या आहारात ताकाचं महत्त्व अनन्यसाधारण आहे. आपल्या पोटात अनेक प्रकारचे सूक्ष्म जीव संचार करत असतात. त्यातले काही लाभदायी असतात तर काही नुकसान पोहोचवणारे असतात. नुकसानदायक जीव सक्रिय झाल्यास विविध प्रकारचे आजार होण्याची शक्यता असते. मळमळणं, अजीर्ण, ताप, थकवा, उलटी, पोटदुखी अशी लक्षणं जाणवू लागल्यास पोटातील आरोग्यास घातक असे सूक्ष्म जीव सक्रिय झाले आहेत असं समजावं. भूक न लागणं, पोटात वारंवार कळ येणं आदी लक्षणंही या जंतूंचं प्रमाण वाढल्यामुळेच जाणवतात. गोड आणि आम्ल पदार्थांचं जास्त सेवन करणं, भूक लागली नसताना जेवणं, शारीरिक श्रम न करणं यामुळेही पोटाचे विकार वाढत असतात. पोटाच्या अशा विविध व्याधींपासून आराम मिळावा म्हणून आपण लगेच मेडिकलमधून औषधं आणतो. औषधांमुळे तात्पुरता आराम पडतो. परंतु काही वेळानंतर स्थिती जैसे थे होते. म्हणूनच आयुर्वेदात अत्यंत महत्त्वाच्या मानल्या गेलेल्या ताकाच्या नियमित सेवनाने या तक्रारींचं निराकरण करणं शक्य आहे हे समजून घ्यावं. भाजलेलं जिरं, मीठ आणि बारीक केलेले मिरे टाकून तयार केलेलं ताक प्यायल्याने पोटविकारांपासून आराम मिळतो. अर्थात पोटाचे विकार असताना पचनक्रियेत अडथळा निर्माण होईल, असा कुठलाच पदार्थ खाऊ नये. अपचन आणि अजीर्ण झाल्यावर ताक हेच उत्तम औषध आहे. तसंच नियमीत ताक घेतल्याने पोट साफ रहातं.



### महत्त्वाचं काही... — ‘अर्थ ओव्हरशूट डे’ म्हणजे काय?

मित्रमैत्रिणींनो, आपल्या पृथ्वीवरचे नैसर्गिक साठे मर्यादित आहेत हे आपण जाणतो. पेट्रोल, डिझेलसह पृथ्वीच्या पोटात सापडणारी अनेक खनिजं आपण उपसत असतो. या जगाची लोकसंख्या खूप जास्त आहे. पृथ्वी आपल्या गरजा भागवू शकते पण आपली हाव काही केल्या संपत नाही. ही हाव भागवण्याची क्षमता पृथ्वीकडे नाही. ही जाणीव लोकांना व्हावी यासाठी ‘अर्थ ओव्हरशूट डे’ही संकल्पना राबवली जाते. विशेष म्हणजे हा दिवस दरवर्षी बदलत असतो. यावर्षी तो ३० जुलै रोजी आहे. ‘अर्थ ओव्हरशूट डे’ अलीकडे येत चालला आहे. ‘अर्थ ओव्हरशूट डे’ची संकल्पना आपण समजून घेऊ.

पृथ्वीच्या पोटात विविध खनिजांची, नैसर्गिक साधनसंपत्तीची पुनर्निर्मिती होत असते. मात्र याचा वेग कमी असतो. या साधनसंपत्तीच्या अतिवापरामुळे वर्षात एक दिवस असा येतो की पृथ्वीच्या पुनर्निर्मितीची क्षमता संपलेली असते. (क्रमश:)

### हेल्थ टॉक — आहारात हवं ‘क’ जीवनसत्त्व

ऋतुनुसार आहारात बदल करायला हवेत. पावसामुळे सुखद गारवा निर्माण झाला असला तरी या दिवसात जंतूसंसर्गाचा धोका वाढतो. विविध आजारांना निमंत्रण मिळतं. साचलेल्या पाण्यामुळे बरेच रोग पसरतात. मात्र आहारात ‘क’ जीवनसत्त्वयुक्त घटकांचा समावेश केल्यामुळे सर्दी, खोकला, फ्लूसारख्या आजारांपासून तुमचा बचाव होऊ शकतो. या दिवसात आहारात कोणत्या भाज्या आणि फळांचा समावेश करावा याविषयी...

✻ फ्लॉवरसारखी दिसणारी ब्रोकोली फारशी वापरली जात नाही. मात्र ही भाजी अनेकविध पोषणमूल्यांनी समृद्ध आहे. यात भरपूर प्रमाणात ‘क’ जीवनसत्त्व असतं. यामुळे जंतूसंसर्गाचा धोका कमी होतो.

✻ आवळ्यात ‘क’ जीवनसत्त्वाची अजिबात कमतरता नाही. यात फायबरचं प्रमाणही बरंच जास्त असतं. त्यामुळे आवळ्याचं सेवन पावसाळ्यात करायला हवं. (क्रमश:)

### पंचांग

**मंगळवार, २१ जुलै २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
आषाढ शु. ८, चंद्रराशी : कन्या,
नक्षत्र : चित्रा, योग : सिद्ध,
सूर्योदय ६.१४ सूर्यास्त ७.१६

### फॉरवर्ड्स

**अपनीं जड़ों को अपनीं ज़मीं में तलाश कर...**

**क़िरदार कहाँ तक़ साथ देंगें उधार के ...!**

### भटकंती

पावसाळ्यात या भागाचं सौंदर्य खूपच खुलतं. तुम्हीही पावसाच्या प्रेमात पडला असाल तर ओरछाला नक्की भेट द्या.

मध्य प्रदेशातल्या कोणत्याही शहरातून ओरछाला जाता येतं. ग्वाल्हेरच्या विमानतळापासून हे ठिकाण जवळ आहे. ओरछापासून १२३ किलोमीटर अंतरावर असलेल्या या ठिकाणापासून तुम्ही अगदी सहज ओरछाला पोहचू शकता. झांशी रेल्वेस्थानकावर उतरून ओरछाला जाता येईल. मान्सूनमधला आनंद लुटण्यासाठी स्वत:च्या वाहनानेही हा प्रवास करता येईल. ओरछा हा हटके अनुभव ठरेल.

### करिअरवाटा — वैद्यकीय सहाय्यक होताना...

सध्याच्या आधुनिक युगात वैद्यकीय सेवाही आधुनिक होत आहेत. उपचाराचं नवनवीन तंत्रज्ञान विकसित होत आहे. त्यामुळे डॉक्टरांना मदत करणाऱ्या अनेक तंत्रज्ञांची आवश्यकता भासत आहे. अशा तंत्रज्ञांमध्ये रेडिओलॉजिस्ट किंवा मेडिकल इमेजिंग टेक्निशियन यांची भूमिका निर्णायक ठरते. हल्ली रोगनिदानाच्या कामात एक्स–रे, होल बॉडी स्कॅनिंग, एमआरआय, सीटी स्कॅनिंग यांची मदत घेतली जाते. या तपासण्यांच्या साह्याने रोगनिदान नेमक्या पद्धतीने केलं जातं. त्याद्वारे परीक्षण करून दिलेली औषधं नेमकेपणानं लागू पडतात. त्यादृष्टीने डॉक्टरांना चांगले टेक्निशियन साह्यभूत ठरतात. एखादा एक्स–रे टेक्निशियन पेशंटला टेबलवर झोपवतो आणि अंतर्गत अवयवांचे फोटो स्पष्टपणे काढतो. त्याला या कामाचं प्रशिक्षण मिळालेलं असतंच पण अनुभवाच्या आधारेही काही युक्त्या करून तो नेमका फोटो काढू शकतो. वैद्यकीय व्यवसायात अशा टेक्निशियन्सना मोठी मागणी असते. शास्त्र शाखेतून बारावी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी रेडिओग्राफीच्या पदविका अभ्यासक्रमालाही प्रवेश घेऊ शकतात. हा अभ्यासक्रम पूर्ण करणारे उमेदवार रेडिओलॉजिस्ट डॉक्टरांच्या हाताखाली काम करू शकतात.



### खेचाखेची — वृद्धेची साखळी

एका ५१ वर्षीय महिलेला पत्रकाराने विचारले.
चोराने तुमच्या गळ्यातून सोन्याची साखळी खेचून नेली तेव्हा तुम्हाला कसे वाटले ?
**महिला:** सोन्याची साखळी चोरीला गेली होती, त्यापेक्षाही वर्तमानपत्रात ही बातमी छापून आल्यावर जास्त वाईट वाटले.
वर्तमानपत्रातली बातमी होती ...

चोरट्यांनी वृद्धेच्या गळ्यातली सोन्याची साखळी लांबवली...

### वेगळं काही!

एक नाणं जगातलं सर्वात मोठं सोन्याचं नाणं ठरलं असून गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डसमध्ये त्याची नोंद करण्यात आली आहे. जगातलं हे सर्वात मोठं आणि वजनदार नाणं एक टनाचं आहे. हे नाणं मध्यंतरी न्यूयॉर्क स्टॉक एक्स्चेंजमध्ये सादर करण्यात आलं. हे नाणं पर्थ मिंटने तयार केलं असून कंपनीच्या फिजिकल गोल्ड ईटीएफच्या लॉँचिंग निमित्ताने ते सादर करण्यात आलं. फक्त एकाच दिवसासाठी ते सादर करण्यात आलं होतं. हे नाणं ९९.९ टक्के शुद्ध सोन्यापासून तयार करण्यात आलं आहे. त्याची जाडी १२ सेंटीमीटर तर रूंदी ८० सेंटीमीटर आहे. हे सोन्याचं नाणं गुंतवणूकदारांमध्ये आकर्षणाचं केंद्र ठरलं.

### सौंदर्यसाधना — मुरुमांवर करा सोपा उपाय!

पावसाळी वातावरणात कधी संततधार पाऊस तर कधी रिपरिप अनुभवायला मिळते. या कुंद हवेमुळे त्वचेवरही परिणाम होतो. याचाच परिणाम म्हणून त्वचेवर पिंपल्स येतात. टुथपेस्ट लावल्याने मुरुमं निघून जातात असं काहींना वाटतं. पण हा समज तितकासा खरा नाही. पिंपल्सवर टूथपेस्ट लावल्याने काही काळासाठी त्यांची तीव्रता कमी झाल्यासारखी वाटत असली तरी वारंवार टूथपेस्टचा वापर त्वचेच्या आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतो. यामुळे त्वचा कोरडी पडतेच शिवाय रॅशेस उठण्याचीही शक्यता असते. त्यामुळे पिंपल्सवर टूथपेस्ट लावणं टाळा. तज्ज्ञांकडून तपासणी करून त्यांनी सांगितलेलं क्रीम लावणं हाच पिंपल्स घालवण्याचा खात्रीशीर उपाय आहे. त्वचा निस्तेज दिसत असेल तर मात्र काही घरगुती उपाय योजता येतील. उदाहरणार्थ पावसाळ्यात त्वचेची रोमछिद्रं उघडतात आणि त्यात घाण आणि धूळ साठते. या समस्येवर उपाय म्हणून चेहऱ्यावर लिंबू आणि अंड्याच्या पांढऱ्या भागाचं मिश्रण लावावं. टोमॅटोचा रसही फायदेशीर ठरतो. हा लेप कोमट पाण्याने धुवून टाकावा. त्यामुळे चेहऱ्यावर तकाकी येते.



दैनिक
महाभूमि
dainikmahabhoomi@gmail.com
मंगळवार, २१ जुलै २०२६

# बुलढाणा भूमि

**हवामान अंदाज**

सूर्योदय : ५.५२ सकाळी
सूर्यास्त : ७.०९ सायं.
तापमान
कमाल : ३३°
किमान : २४°

**सोने-चांदी**

| | |
|---|---|
| सोने (२२ कॅरेट प्रति तोळा) | १४०५९४ |
| सोने (२४ कॅरेट प्रति तोळा) | १४११५९ |
| चांदी (प्रति किलो) | २१८९६७ |

**दखल...**

### बरसला एकदाचा !

रोखुन धरला होता
आवेग पावसानं
त्यामुळे गुदमरला होता
जीव सृष्टीचा

जसं राक्षसानं माणसाला
पंजात धरुन दाबावं
तसचं काहीसं –
झालं होतं सृष्टीचं !

पण एकदाचा
तो मनसोक्त बरसला
अन् हायसं वाटलं जिवाला
जीवदान मिळालं आकस्मित
त्याचा आनंद मात्र शब्दातीत..!

■ प्रा. अशोक सारडा, मेहकर.
( ९४२१३९४३३९ )

**आदिवासीबहुल भिंगारा व चाळीस टपरी येथील ग्रामस्थ संतप्त**

# शिक्षकांसाठी पालकांचा विद्यार्थ्यांसह जिल्हा परिषदेत ठिय्या

**बुलढाणा/ प्रतिनिधी**

आमच्या मुलांना शिकविण्यासाठी शिक्षक द्या अन्यथा आम्ही इथून उठणार नाही, असा पवित्रा घेत, जळगाव जामोद तालुक्यातील आदिवासीबहुल भिंगारा व चाळीस टपरी येथील पालकांनी सोमवारी जिल्हा परिषदेत विद्यार्थ्यांसह ठिय्या मांडला. अचानक झालेल्या या आंदोलनामुळे जिल्हा परिषद प्रशासनामध्ये गोंधळ उडाला.

एकीकडे आदिवासीबहुल भागामध्ये शिक्षणाची गंगा पोहोचल्याचा दावा शासन, प्रशासनाकडून वारंवार केला जातो. मात्र प्रत्यक्षात चित्र वेगळेच आहे. आदिवासीबहुल भागात शाळा तर आहेत मात्र विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यासाठी शिक्षक नाहीत त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खेळखंडोबा होत आहे. जळगाव जामोद तालुक्यातील आदिवासीबहुल भिंगारा आणि चाळीस टपरी गावातील शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त गेल्या अनेक दिवसांपासून रिक्त आहेत. संबंधित शाळांमध्ये इयत्ता सहावी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी पुरेसे शिक्षक उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांचे प्रचंड शैक्षणिक नुकसान होत आहे. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण हीच भविष्याची आशा असताना प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे त्यांचे भवितव्य अंधारात ढकलले जात असल्याचा आरोप पालकांनी केला. शिक्षकांच्या मागणीसाठी यापूर्वी ग्रामस्थांनी जिल्हा परिषद शिक्षण विभागाला निवेदने दिली. मात्र या निवेदनाची दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे संतप्त पालक व ग्रामस्थांनी हें आंदोलन केले.







**आंदोलनाची दखल ; सहा शिक्षकांची नियुक्ती**

जिल्हा परिषद शिक्षण विभागाने या आंदोलनाची गंभीरतेने दखल घेतली असून सात शिक्षकांपैकी ६ शिक्षकांची या शाळांवर तात्पुरती नियुक्ती करण्यात आली आहे.
**– विकास पाटील,**
शिक्षणाधिकारी

**नीट है की चिट है.. शिक्षण वाचवा, भविष्य वाचवा..**




**बुलढाणा :** बुलढाणा : नीट परीक्षेतील गैरप्रकाराची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी या मागणीसाठी सोनम वांगचुक यांनी केलेल्या आंदोलनाला पाठींबा देत विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठी हल्ल्याचा सेव्ह वसुंधरा टीम व रमाई ग्रुपच्यावतीने हाताला काळ्या फित बांधुन निषेध करण्यात आला.
**(छाया : रविकिरण टाकळकर)**

## सिंदखेडराजात २५ जुलै रोजी विदर्भ राज्य निर्मिती जनसंकल्प मेळावा

**सिंदखेडराजा /प्रतिनिधी**

राजे लखुजीराव जाधवराव यांच्या स्मृतिदिनानिमित्त शनिवार, २५ जुलै रोजी येथील संत सावता माळी सभागृहात 'विदर्भ राज्य निर्मिती जनसंकल्प मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी ११ वाजता आयोजित या मेळाव्यामध्ये स्वतंत्र विदर्भाच्या निर्मितीची आवश्यकता, विकासाची दिशा, रोजगार, उद्योग, शेती, सिंचन, शिक्षण आणि पायाभूत सुविधांवरील प्रश्नांवर विचारमंथन होणार आहे. मेळाव्याला ज्येष्ठ पत्रकार व विदर्भवादी विचारवंत प्रकाश पोहरे उपस्थित राहणार असून, स्वतंत्र विदर्भ राज्याच्या संकल्पनेमागील भूमिका, भविष्यातील संधी आणि विकासाचा आराखडा याविषयी ते मार्गदर्शन करणार आहेत.

**न्यूज ब्रीफ**

### बिएलओंच्या घरभेटीबाबत नागरिकांच्या तक्रारी

**अंढेरा :** मतदार यादी विशेष पुनरावलोकन अभियानांतर्गत बूथ लेव्हल अधिकारी यांनी घराघरांत जाऊन मतदारांची माहिती संकलित करणे अपेक्षित आहे. देऊळगाव राजा तालुक्यातील काही भागांत घरभेटी अपेक्षित गतीने होत नसल्याच्या तक्रारी नागरिकांकडून पुढे येत आहेत. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रत्येक मतदाराची प्रत्यक्ष भेट घेऊन माहितीची पडताळणी करणे, आवश्यक कागदपत्रांची तपासणी करणे आणि आवश्यक बदलांची नोंद घेणे ही बिएलओ यांची जबाबदारी आहे. मात्र काही गावांतील नागरिकांनी अद्याप बिएलओ घरभेटीसाठी आले नसल्याच्या तक्रारी केल्या आहेत. त्यामुळे मतदार यादी विशेष पुनरावलोकनाच्या कामाच्या गतीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

### अवैध बांधकाम प्रकरणी मुख्याधिकाऱ्यांना नोटीस

**चिखली :** चिखली नगरपरिषदेच्या कारभारावर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने तीव्र ताशेरे ओढले आहेत. शहरातील एका बेकायदेशीर बांधकाम प्रकरणात तीन वर्षांपासून कोणतीही कारवाई न केल्याने संतप्त न्यायालयाने पालिका मुख्याधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावली असून मंगळवार २१ जुलै रोजी न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले आहेत.

## उपवर्गीकरण समर्थनार्थ मातंग बांधवांचा आक्रोश मोर्चा

**देऊळगावराजा /प्रतिनिधी**

उपवर्गीकरण तात्काळ लागू करावे या प्रमुख मागणीसह उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ सोमवारी सकल मातंग समाज बांधवांच्यावतीने आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.या मोर्चात हजारो महिला, पुरुष आणि युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

बाजार समिती परिसरातून सुरू झालेला हा मोर्चा शहरातील प्रमुख मार्गाने मार्गक्रमण करत बसस्थानक चौकात धडकला. आरक्षण आमच्या हक्काचे, नाही कोणाच्या बापाचे उपवर्गीकरण लागू करा, मातंग-वाल्मिकी समाजाला न्याय द्याअशा घोषणांनी संपूर्ण बालाजी नगरी दुमदुमून गेली होती. या मोर्चामध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नातू सचिन साठे, लहूजी शक्ती सेना संस्थापक विष्णू कसबे, भारतीय वंचित जन संसद अध्यक्ष डॉ.अंबादास सगट, क्रांतिगुरु लहूजी साळवे विकास परिषद संस्थापक उत्तमराव कांबळे, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे फोरम संस्थापक विजय अंभोरे ,भाजपा प्रदेश अ.जा.मोर्चाचे महामंत्री सर्जे राव जाधव, क्रांतीसेना अध्यक्ष राजेश घोडे, डीपीआय प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे, लहूशस्त्र सेनाप्रमुख संजय गायकवाड, मातंग समाज प्रबोधन परिषद अध्यक्ष संजय इंचे, क्रांतिगुरू लहुजी साळवे विकास परिषद प्रदेश अध्यक्ष प्रमोद कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.




## जुन्या वादातून मजुरावर हल्ला ; तिघांविरुद्ध गुन्हा

**देऊळगाव राजा /प्रतिनिधी**

शहरातील अहिंसा मार्ग परिसरात किरकोळ वादातून एका ५८ वर्षीय मजुरावर लाकडी काठीने हल्ला करून गंभीर मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकरणी देऊळगाव राजा पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

विनोद सोनाजी वाघमारे (वय ५८, व्यवसाय मजुरी, रा. व्यंकटेश कॉलेजच्या पाठीमागे, देऊळगाव राजा) यांनी याप्रकरणी फिर्याद दाखल केली आहे. फिर्यादीनुसार, १६ जुलै २०२६ रोजी रात्री सुमारे ९ वाजता ते अहिंसा मार्ग येथील तुकाराम राऊत यांच्या टपरीजवळ बसले असताना आरोपी सखाराम शाम वाघमारे तेथे आला. कोणतेही कारण नसताना त्याने फिर्यादीला शिवीगाळ करून तेथून निघून गेला. काही वेळानंतर सखाराम वाघमारे आणि गजानन शाम वाघमारे हे दोघे पुन्हा तेथे आले आणि फिर्यादीला शिवीगाळ केल्याचा जाब विचारू लागले. यावेळी फिर्यादीने सखाराम वाघमारे यालाच प्रथम शिवीगाळ केल्याचे सांगितले. त्यानंतर आरोपी सखाराम याने कुणाल आनंद वाघमारे याला फोन करून घटनास्थळी बोलावून घेतले. कुणाल हा हातात लाकडी काठी घेऊन आला आणि कोणतीही चर्चा न करता फिर्यादीच्या डोक्यावर, पाठीवर आणि डाव्या हातावर काठीने वार केले. या मारहाणीत फिर्यादी जखमी झाला.या प्रकरणी सखाराम शाम वाघमारे, गजानन शाम वाघमारे आणि कुणाल आनंद वाघमारे (सर्व रा. अहिंसा मार्ग, देऊळगाव राजा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महारक्तदान शिबिरात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : उगलमुगले

**सिंदखेडराजा /प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भाजपा साखरखेर्डा मंडळाच्या वतीने २१ जुलै रोजी महा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात मोठ्या संख्येने कार्यकर्ते व नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन भाजपा नेते शंकरराव उगलमुगले यांनी केले आहे.

रक्ताचे नाते माणसाला जोडते व मतभेदाच्या पलीकडे जाऊन केलेले रक्तदान हे माणसाचा जीव वाचवते. रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान या उक्तीप्रमाणे आपल्या नेत्याचा वाढदिवस हा सामाजिक कर्तव्याची जाणीव ठेवून साजरा करून एक नवा आदर्श निर्माण करण्यासाठी २१ जुलै मंगळवार सकाळी ९ वाजता एस इ एस शाळेसमोर रिंढे कृषी सुविधा केंद्र साखरखेर्डा येथे या महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



सर्व आजी-माजी पदाधिकारी, विविध आघाड्याचे प्रमुख, शक्ती केंद्रप्रमुख, बुथ प्रमुख आणि कार्यकर्ते यांनी आपापल्या गावात जास्तीत जास्त रक्तदात्याना या शिबिरात घेऊन यावे आणि तरुण मित्रमंडळी सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी या पवित्र कार्यात सहभागी होऊन हे महारक्तदान शिबिर यशस्वी करावे असे आवाहन शंकरराव उगलमुगले यांनी केले आहे.

## पिकअपमधून लोखंडी अँगलची वाहतूक ; एसटी बसचे नुकसान

**देऊळगाव राजा /प्रतिनिधी**

पिकअप वाहनातून कोणतीही सुरक्षितता न बाळगता लोखंडी अँगल वाहतूक केल्यामुळे एसटी बसच्या समोरील आणि बाजूच्या पाच काचा फुटून सुमारे २५ हजार रुपयांचे नुकसान झाल्याची घटना गजानन नगर परिसरात घडली. यामध्ये एसटीबसचे २५ हजारांचे नुकसान झाले असून या प्रकरणी देऊळगाव राजा पोलिसांनी पिकअप चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

संदीप दगडुबा म्हस्के (वय ४२, रा. जाफ्राबाद, जि. जालना) हे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसचे चालक असून त्यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, १८ जुलै रोजी सायंकाळी सुमारे ५.३० वाजण्याच्या दरम्यान ते एमएच-२० बीएल-२५६१ क्रमांकाची एसटी बस घेऊन जात असताना गजानन नगरजवळील उमेश अॅग्रोजवळ कटऑफ परिसरात समोरून येणाऱ्या एमएच-०४ जेके-५३६४ क्रमांकाच्या पिकअप वाहनातून सुमारे पाच ते सात फूट लांबीचे लोखंडी अँगल वाहनाच्या बाहेर आलेले होते.



संबंधित चालकाने अशा धोकादायक वाहतुकीबाबत कोणतीही खबरदारी अथवा सुरक्षिततेची उपाययोजना केली नव्हती. वाहनातून बाहेर आलेल्या लोखंडी अँगलचा एसटी बसला जोरदार धक्का बसल्याने बसची समोरील दर्शनी काच तसेच मागील बाजूच्या प्रवासी खिडक्यांच्या चार काचा फुटल्या.

या घटनेत एसटी महामंडळाचे अंदाजे २५ हजार रुपयांचे नुकसान झाले. या प्रकरणी सोपान कृष्णा गाडेकर (रा. वाघुळ, जि. जालना) याच्याविरुद्ध देऊळगाव राजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## एसआयआरचा सुधारित कार्यक्रम जाहीर

**अंतिम यादी १९ ऑक्टोबरला प्रसिद्ध होणार**

**बुलढाणा /प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमाचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे.

सुधारित कार्यक्रमानुसार, मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत गृहभेटीची मोहीम ३० जून ते ८ ऑगस्ट या कालावधीत राबविण्यात येणार असून, मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण व पुनर्रचना ८ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. त्यानंतर १७ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. १७ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर या कालावधीत मतदारांकडून दावे व हरकती स्वीकारण्यात येतील. तसेच १७ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर या कालावधीत नोटिसा देणे, सुनावणी घेणे आणि दावे-हरकतींचा निपटारा करण्याची प्रक्रिया पार पडेल. यानंतर १९ ऑक्टोबर २०२६ (सोमवार) रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. पात्र नागरिकांनी निर्धारित कालावधीत मतदार यादीत नाव समाविष्ट होण्यासाठी गणना प्रपत्र भरून देऊन निवडणूक प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी केले आहे.

**जिल्हास्तरीय सुब्रतो कप फुटबॉल स्पर्धा उत्साहात**

# जिल्ह्यातील १५ संघांचा सहभाग ; शारदा ज्ञानपीठचे दुहेरी विजेतपद

**बुलढाणा / प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि जिल्हा क्रीडा परिषद, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ६५ वी जिल्हास्तरीय सुब्रतो कप फुटबॉल स्पर्धा १७ ते १९ जुलै या कालावधीत सहकार विद्या मंदिर येथे पार पडली. तीन दिवस चाललेल्या या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध शाळांच्या १५ संघांनी सहभाग नोंदवून उत्कृष्ट क्रीडा कौशल्याचे प्रदर्शन केले.

स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाला जिल्हा क्रीडा अधिकारी भक्ती आंब्रे, बुलढाणा अर्बन चॅरिटेबल सोसायटीच्या अध्यक्षा कोमल झंवर, तालुका क्रीडा अधिकारी प्रशांत मडले, सहकार विद्या मंदिराचे प्राचार्य सामी, जिल्हा फुटबॉल संघटनेचे सदस्य मुकेश बाफना, क्रीडा शिक्षक, पंच, खेळाडू व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्पर्धेत १५ वर्षांखालील मुलांच्या गटात शारदा ज्ञानपीठ, बुलढाणा यांनी प्रथम क्रमांक पटकावत विजेतेपद मिळविले. विजेत्या व उपविजेत्या संघांना चषक आणि पदके प्रदान करून गौरविण्यात आले. प्रत्येक सामन्यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंनाही विशेष पारितोषिक देण्यात आले. स्पर्धेचे पंच म्हणून रमीज चौधरी, राहुल ओशलकर, निसार सय्यद, जावेद खान, प्रेम सोनवणे, अर्जुन दांडगे, साई टाके आणि प्रतीक किलबिले यांनी जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली.




**असे आहेत विजेते, उपविजेते संघ**

■ सहकार विद्या मंदिर, बुलढाणा उपविजेता ठरला, तर उर्दू हायस्कूल, बुलढाणा यांनी तृतीय क्रमांक मिळविला. १७ वर्षांखालील मुलांच्या गटातही शारदा ज्ञानपीठने आपले वर्चस्व कायम राखत विजेतेपद पटकावले. सहकार विद्या मंदिरने द्वितीय, तर ए. पी. जे. अब्दुल कलाम स्कूल, धाड यांनी तृतीय क्रमांक मिळविला. १७ वर्षांखालील मुलींच्या गटात सेंट जोसेफ स्कूल, बुलढाणा यांनी प्रथम क्रमांक मिळविला, तर शारदा ज्ञानपीठ, बुलढाणा उपविजेता ठरला.

## घरफोडींच्या घटनानंतर मोहल्ला सुरक्षा समितीची स्थापना

**चोरट्यांचे मनसुबे उधळण्यासाठी नागरिकांचे जागते रहो**

**बुलढाणा /प्रतिनिधी**

शहरातील खालीद बिन वलीद नगर परिसरात नुकत्याच झालेल्या घरफोडींच्या घटनांनंतर चोरट्यांचे मनसुबे उधडण्यासाठी रहिवासी नागरिकांनी एकत्र येत मोहल्ला सुरक्षा समितीची स्थापना करीत आपली सुरक्षा आपल्या हाती हा संदेश देत नागरिकांनी दररोज रात्री स्वयंस्फूर्तीने जागता पहारा देण्याचा निर्णय घेतला आहे.

काही दिवसांपूर्वी अज्ञात चोरट्यांनी एकाच रात्री खालीद बिन वलीद नगर परिसरातील ३ घरे फोडून दागिने व रोख रक्कम लंपास केली होती. या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी १९ जुलै रोजी परिसरातील नागरिकांनी बैठक बोलावून सर्वानुमते मोहल्ला सुरक्षा समिती स्थापन केली आहे. दररोज रात्री १ ते ५ वाजेपर्यंत मोहल्ला समितीतील चार जण परिसरात गस्त घालणार असून संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणार आहेत. बैठकीला परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नागरिकांनी परिसर सुरक्षित ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.



**संशयितांची माहिती देण्याचे आवाहन**

■ रात्री घरासमोरील लाईट सुरू ठेवणे, बाहेर गावी जाताना शेजाऱ्यांना किंवा विश्वासू व्यक्तींना माहिती देणे, घरावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे तसेच संशयास्पद व्यक्ती किंवा हालचाली आढळल्यास तात्काळ पोलिसांना याची माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## पहिलाच दिवस गोंधळात!

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विरोधी सदस्यांनी परीक्षांमधील कथित अनियमितता, राम मंदिरातील देणगी चोरी प्रकरण आणि इतर अनेक मुद्द्यांवरून गोंधळ घातला. ज्यामुळे पाच वेळा कामकाज तहकूब झाल्यानंतर दुपारी २:३० च्या सुमारास राज्यसभेचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करावे लागले. या गोंधळामुळे, वरिष्ठ सभागृहात प्रश्नोत्तराचा तास आणि शून्य प्रहर होऊ शकला नाही आणि कोणतेही कायदेशीर कामकाज होऊ शकले नाही. राष्ट्रीय राजधानीतील जंतर मंतर येथे सरन्यायाधीश जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील आंदोलन आणि आंदोलकांवर पोलिसांनी केलेल्या कथित बळाच्या वापराच्या मुद्द्यावरून सभागृहाचे कामकाज पाच वेळा विस्कळीत झाले. या मुद्द्यावरून झालेल्या गदारोळामुळे चार वेळा कामकाज तहकूब झाल्यानंतर सभा पुन्हा सुरू झाल्यावर, विरोधी पक्षांच्या सदस्यांनी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत विद्यार्थी आंदोलन आणि पोलीस कारवाईचा मुद्दा पुन्हा उपस्थित केला. सरकारविरोधात घोषणाबाजी करत विरोधी सदस्यांनी गोंधळ घालण्यास सुरुवात केली. उपसभापती हरिवंश यांनी सकाळपासून कोणतेही कामकाज झाले नसल्याचे सांगून सदस्यांना शांत राहण्याचे आवाहन केले. सभागृहाची प्रतिष्ठा राखणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. हे वरिष्ठ सभागृह आहे आणि अशा प्रकारचा व्यत्यय योग्य नाही. परंतु गोंधळ सुरूच असल्याचे पाहून, सभा सुरू झाल्याच्या एका मिनिटातच दिवसाचे कामकाज तहकूब केले. विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी नीट-यूजी २०२६ प्रश्नपत्रिका फुटीचा मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. हा लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न आहे, सध्या पेपरफुटीच्या या मुद्याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. हजारो विद्यार्थी जंतर मंतरवर पोहोचले असता त्यांच्यावर लाठीचार्ज करण्यात आला. सरकार हा मुद्दा दडपण्याचा प्रयत्न करत आहे का? असा प्रश्न आता विरोधकांकडून उपस्थित केला जात आहे. विरोधी पक्षाचे सदस्य आपापल्या जागेवरून उठले आणि "तुम्हाला लाज वाटली पाहिजे, तुम्हाला लाज वाटली पाहिजे!" अशा घोषणा देऊ लागले. गोंधळाच्या वातावरणात, अध्यक्ष राधाकृष्णन यांनी सभागृह दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब केले. तहकुबीनंतर दुपारी १२ वाजता सभागृह पुन्हा सुरू झाल्यावर, तेच दृश्य पुन्हा पाहायला मिळाले. अध्यक्षांनी प्रश्नोत्तराचा तास सुरू करण्याचा प्रयत्न केला, परंतु विरोधी सदस्यांनी फुटलेल्या नीट-यूजी २०२६ च्या प्रश्नपत्रिकेवरून गोंधळ घातला. गोंधळ सुरूच असल्याचे पाहून अध्यक्षांनी सभागृह १२:३० पर्यंत तहकूब केले. त्यानंतर सभागृह पुन्हा सुरू झाल्यावर विरोधी सदस्यांनी जंतर मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ आणि त्यांच्यावरील पोलीस कारवाईच्या विरोधात घोषणाबाजी सुरू केली. त्यांनी अयोध्येतील राम मंदिरासाठीच्या अर्पणाच्या कथित चोरीबाबतही घोषणाबाजी केली. द्रविड मुन्नेत्र कळघम (डीएमके) पक्षाच्या सदस्यांनी तामिळनाडू आणि कर्नाटक यांच्यातील पाणीवाटपाचा मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला आणि सभागृहात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. तथापि, अध्यक्ष राधाकृष्णन यांनी त्यांना तसे करण्यापासून रोखले. विरोधी सदस्यांच्या सततच्या गदारोळामुळे सभागृहाचे कामकाज पहिल्याच दिवशी वारंवार तहकूब करावे लागले. गदारोळामुळे संसदमधील कामकाज इतक्यावेळा थांबण्याची वेळ येणे ही मोठी नामुष्की म्हणावी लागेल. संसद ही चर्चा आणि संवादासाठी आहे, याचा विसर पडल्याचे याठिकाणी बघायला मिळते. संवाद किंवा चर्चा करण्यापेक्षा सभागृहात घोषणाबाजी करत गोंधळच जास्त होत असेल तर महत्त्वाच्या प्रश्नांवर तोडगा कसा निघणार? पहिल्याच दिवशी सकाळपासून कोणतेही कामकाज झाले नाही. त्याठिकाणी अशा प्रकारचा व्यत्यय योग्य नाही. सभागृहाची प्रतिष्ठा राखणे आणि शांततेने आपले मुद्दे मांडणे आवश्यक आहे.

# भारताच्या निर्यातीला युरोपचा आधार

**परामर्श**
**- हेमंत देसाई,**
ज्येष्ठ पत्रकार

रशिया-युक्रेन युद्ध, पश्चिम आशियातील संघर्ष, पुरवठा साखळीतील अडथळे, आणि चीनमधील आर्थिक मंदीमुळे जगभरातील व्यापाराचे समीकरण बदलले आहे. अशा परिस्थितीत भारताच्या निर्यात क्षेत्राने युरोपीय बाजारपेठेत आपले स्थान अधिक मजबूत केले आहे. मात्र युरोपमधून भारतात होणाऱ्या आयातीतही लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे व्यापार वाढत असला तरी व्यापार संतुलनाचा प्रश्न गंभीर बनत आहे.

युरोपकडे वाढणाऱ्या निर्यातीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेला अनेक स्तरांवर लाभ होत आहेत. उत्पादन क्षेत्र मजबूत झाल्यास भारताचा आर्थिक विकास अधिक शाश्वत होऊ शकतो. सेवाक्षेत्रानंतर उत्पादन क्षेत्र निर्यातीचा प्रमुख आधार बनू लागल्याची चिन्हे दिसत आहेत; मात्र या यशाच्या चित्रात काही गंभीर प्रश्नही दडलेले आहेत. युरोपमधून भारतात होणाऱ्या आयातीतही सातत्याने वाढ होत आहे. यंत्रसामग्री, औद्योगिक उपकरणे, वैद्यकीय तंत्रज्ञान, संरक्षण साहित्य, विमान उद्योगासाठी आवश्यक घटक, उच्च तंत्रज्ञानाची उत्पादने आणि विशेष रसायने यांची आयात मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. भारताचा औद्योगिक विकास वेगाने होत असला, तरी अनेक महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये आपण अजूनही परदेशी तंत्रज्ञानावर अवलंबून आहोत. त्यामुळे निर्यात वाढत असली तरी आयातीचे बिलही त्याच वेगाने वाढत आहे. औषध उद्योगाने युरोपमध्ये विश्वासार्ह पुरवठादार म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. कोविडनंतर जगाने भारताच्या औषधनिर्मिती क्षमतेचा अनुभव घेतला आणि त्यानंतर भारतीय औषधांना युरोपमध्ये अधिक मागणी निर्माण झाली. त्याचबरोबर इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनातील वाढ, मेक इन इंडिया उपक्रम, उत्पादनाशी निगडित प्रोत्साहन योजना आणि जागतिक कंपन्यांची चीनवरील अवलंबित्व कमी करण्याची रणनीती याचा थेट फायदा भारतीय निर्यातीला होत आहे. युरोपमधील ग्राहकांमध्ये पर्यावरणपूरक आणि गुणवत्तापूर्ण उत्पादनांची मागणी सातत्याने वाढत आहे. भारतीय कंपन्यांनीही हरित उत्पादन, कार्बन उत्सर्जन कमी करणे, गुणवत्ता मानके आणि डिजिटल ट्रेसिबिलिटी यावर भर दिल्यामुळे त्यांना युरोपमध्ये अधिक संधी उपलब्ध होत आहेत.

भारताची उत्पादनक्षमता आणि तुलनेने स्पर्धात्मक किंमत हे देखील महत्त्वाचे बलस्थान ठरत आहे. विशेषतः उच्च मूल्याच्या यंत्रसामग्री आणि प्रगत तंत्रज्ञानासाठी युरोपवरील अवलंबित्व कायम आहे. भारतीय उद्योगांच्या आधुनिकीकरणासाठी ही आयात आवश्यक असली तरी दीर्घकालीन दृष्टीने देशांतर्गत संशोधन, तंत्रज्ञान विकास आणि उत्पादन क्षमता वाढवणे तितकेच गरजेचे आहे. अन्यथा, व्यापारातील तूट कायम राहण्याचा धोका आहे. भारत आणि



युरोपीय महासंघ यांच्यात सुरू असलेल्या मुक्त व्यापार कराराच्या (एफटीए) वाटाघाटी या पार्श्वभूमीवर अधिक महत्त्वाच्या ठरतात. हा करार झाल्यास भारतीय उत्पादनांना युरोपमध्ये अधिक सुलभ प्रवेश मिळेल. अनेक उत्पादनांवरील आयात शुल्क कमी होईल आणि भारतीय उद्योगांची स्पर्धात्मकता वाढेल. त्याचवेळी युरोपियन कंपन्यांनाही भारतात मोठी बाजारपेठ उपलब्ध होईल. त्यामुळे व्यापाराचा विस्तार निश्चित होईल; मात्र भारतीय उद्योगांचे हित जपणाऱ्या अटींसह हा करार होणे अत्यावश्यक आहे.

युरोप आता केवळ व्यापार भागीदार राहिलेला नाही. हवामानबदल, हरित ऊर्जा, डिजिटल अर्थव्यवस्था, कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर, स्वच्छ तंत्रज्ञान आणि शाश्वत विकास या क्षेत्रांमध्येही भारत आणि युरोपमधील सहकार्य वाढत आहे. त्यामुळे व्यापाराला नव्या स्वरूपाची जोड मिळत आहे. मात्र युरोपने लागू केलेला 'कार्बन बॉर्डर अ‍ॅडजस्टमेंट मेकॅनिझम' (सीबीएएम) भारतीय निर्यातदारांसाठी भविष्यात मोठे आव्हान ठरू शकते. स्टील, अ‍ॅल्युमिनियम, सिमेंट यांसारख्या उत्पादनांच्या निर्यातीवर अतिरिक्त कार्बन खर्च लागू होऊ शकतो. त्यामुळे भारतीय उद्योगांना हरित उत्पादन प्रक्रियेकडे वेगाने वळावे लागेल. युरोपकडे निर्यात वाढत असताना भारताने काही बाबींवर विशेष भर देणे आवश्यक आहे. उत्पादनखर्च कमी करणे, लॉजिस्टिक्स अधिक कार्यक्षम करणे, बंदरांची क्षमता वाढवणे, गुणवत्ता प्रमाणपत्रांची प्रक्रिया सुलभ करणे आणि सूक्ष्म, लघु तसेच मध्यम उद्योगांना (एमएसएमई) युरोपियन बाजारपेठेतील नियम समजावून देणे ही काळाची गरज आहे.

निर्यात वाढवायची असेल तर केवळ मोठ्या उद्योगांवर अवलंबून राहून चालणार नाही. लघुउद्योगांना जागतिक मूल्यसाखळीत सामील करणे आवश्यक आहे. त्याच वेळी आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी देशांतर्गत उत्पादनाला अधिक चालना देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. संशोधन आणि विकासासाठी अधिक गुंतवणूक, उच्च तंत्रज्ञानाचे स्थानिकीकरण, कौशल्य विकास आणि नवोन्मेष यांना प्राधान्य दिल्याशिवाय भारत दीर्घकालीन व्यापार संतुलन साधू शकणार नाही. भारताची निर्यात वाढत असणे ही नक्कीच समाधानाची बाब आहे. युरोपसारख्या विकसित बाजारपेठेत भारतीय उत्पादनांना मिळणारा प्रतिसाद हा भारतीय उद्योगांच्या क्षमतेचा पुरावा आहे. **(क्रमशः)**

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

# मोकाट गुरांसाठी उपाययोजना केव्हा ?

**- रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९**

आपण पहातो ही, राज्यातील अनेक शहरांमध्ये गुरेढोरे लावारीस मोकाट फिरतांना दिसतात किंवा रस्त्यावर मोकाट जनावरांचा ठिय्या दिसून येतो. यामुळे वाहनचालकांचा किंवा जनावरांचा अपघात होऊन जीव धोक्यात येऊ शकतो आणि अशा अनेक दुर्घटना झाल्या सुध्दा आहेत व ही बाब सर्वांनाच ग्यात आहे. तरीही सरकार किंवा प्रशासन याकडे जातीने लक्ष देत नाही हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.

आपल्या हिंदू संस्कृतीमध्ये गायीला अत्यंत मोलाचे आणि महत्त्वाचे स्थान आहे त्यामुळे तीला गोमाता म्हणून संबोधले जाते. परंतु आज मोठ्या प्रमाणात गायी (गुरेढोरे) रस्त्याच्या कडेला किंवा रस्त्यावर किंवा मुलांच्या खेळण्याच्या ग्राऊंडमध्ये बसलेले दिसतात आणि आपल्या आहारासाठी व विसाव्यासाठी भटकत असतात. त्याचप्रमाणे गायी जेव्हा रस्त्यावर किंवा वस्तीमध्ये फिरतात तेव्हा त्यांचा झुंड कचऱ्याच्या ढीगाऱ्याकडे जातांना जास्त दिसते कारण त्यांना आशा असते की, इथे मला काही तरी नक्कीच खायला मिळेल परंतु याठिकाणी त्यांच्या दृष्टीने संपूर्ण विषेली पदार्थ असतात.

अशा परिस्थितीत गुरेढोरे जहरील्या वस्तू खातात; ज्या त्यांच्या शरीराला घातक असतात. उदाहरण द्यायचे झाले तर, प्लास्टिक, कपडा किंवा प्लॅस्टिकमध्ये इंजेक्शन किंवा ब्लेड किंवा विषेली पदार्थ सुद्धा असू शकतात; त्या जर त्यांच्या पोटात चुकीने गेल्या तर त्यांच्या जिवाला मोठा धोका निर्माण होऊ शकतो यालाही नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत



मनपा प्रशासन व नगरसेवकांचे दायित्व असते की, गोरक्षाच्या माध्यमातून प्रत्येक जनावरांचा जीव वाचविला पाहिजे. परंतु त्यांची रक्षा न करता त्यांना वाऱ्यावर सोडल्याचे चित्र नागपूरसह राज्यातील अनेक शहरांमध्ये मोकाट फिरणाऱ्या गुराढोरांवरून लक्षात येते. उदाहरण द्यायचे झाले तर, नागपूर येथील प्रभाग क्रमांक ३१ मध्ये राजीव गांधी पार्क या ठिकाणी बास्केट बॉल ग्राउंड आहे. परंतु या ग्राउंडमध्ये मोठ्या प्रमाणात गुरेढोरे जमा होतात. अशा परिस्थितीत ते आपसात भिडतात व त्यांची टक्कर होते अशा परिस्थितीत बास्केटबॉल खेळणाऱ्या खेळाडूंचा अपघात होऊ शकतो.

या संपूर्ण बाबींचा विचार करून मनपा प्रशासनाने आणि नगरसेवकांनी यावर तोडगा काढुन गुराढोरांसाठी योग्य जागा उपलब्ध करावी किंवा मोकाट जनावरांना गोशाळेत स्थान द्यावे. कारण गुरेढोरे रस्त्याच्या कडेला किंवा रस्त्यावर बसले असतात तेव्हा त्यांचा किंवा मानवी अपघात सुध्दा होऊ शकतो यालाही नाकारता येत नाही. याकरीता मोकाट फिरणाऱ्या जनावरांच्या पुनर्वसनासाठी प्रशासनाने पुर्वनीयोजीत उपाययोजना करणे गरजेचे आहे. मोकाट जनावरांचा सर्वसामान्यांना त्रास नाहीच परंतु त्यांच्या खानपानात विषेली वस्तू जाने किंवा कळतनकळत रस्त्यावर बसलेल्या जनावरांचा किंवा मानवी अपघात होने ही दुःख बाब आहे. मुसळधार पाऊस, निसरडे रस्ते, रस्त्यावरील खड्डे, कमी झालेली दृश्यमानता आणि त्यातच अचानक समोर येणारे मोकाट जनावरे नागपूरकर वाहनचालकांसाठी हा अनुभव रोजचाच झाला आहे आणि हिच स्थिती राज्यातील अनेक शहरांमध्ये असु शकते. अशाप्रकारे पावसाळ्यात रस्त्यावर वाढलेल्या मोकाट जनावरांच्या वावरामुळे अपघातांचा धोका वाढला आहे. नागपूरसह राज्यातील अनेक शहरांमध्ये वर्षांगणिक मोकाट जनावरांचा प्रश्न अधिक गंभीर होत असल्याचे दिसून येते. मोकाट जनावरांचा किंवा मोकाट जनावरांमुळे होणाऱ्या मानवी दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने या जनावरांचा कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता आहे. यामुळे मोकाट जनावरांची रहाण्याची, खानपानची योग्य सुविधा उपलब्ध होईल.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

## 'गजानन रत्नमाला जनार्दन धांडे'...

# वाणी अन् लेखणीची श्रीमंती लाभलेला निष्ठावान माणूस



**पॉलिटीकल आयकार्ड**
**- राम हिंगे**
**उपसंपादक, बुलढाणा**

'एक तरी अंगी असू दे कला, नाही तर काय फुका जन्मला' हा वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा उपदेश माणसांच्या आयुष्यातील कलागुणांचे महत्व अधोरेखित करतो. समाजात एखादी कला, ध्यास घेऊनही जीवन जगणाऱ्या माणसांचे प्रमाण ढासळत असताना गजानन रत्नमाला जनार्दन धांडे' यांसारखी माणसे एकापेक्षा अधिक क्षेत्राला न्याय देत जीवन जगत आहे, याचे अनेकांना नेहमीच अप्रुप वाटते. हातात पेन घेऊन पत्रकारितेची सुरुवात करणाऱ्या गजुदादाने पुढे वारकऱ्यांचा टाळ विणा, निवेदनाचा माईक, शिवसेना पक्षाचा निष्ठेचा झेंडा, कला, क्रीडा साहित्य व सत्कर्माच्या व्यासंगाने आपले जीवन विविधांगी बनवल्याचे पाहायला मिळते. नुकतीच त्यांची शिवसेना उबाठा पक्षाच्या बुलढाणा जिल्हा समन्वयकपदी झालेली निवड त्यांच्या यशस्वी प्रवासाची साक्ष देवून जाते.

गजानन धांडे यांनी शालेय जीवनात खोखो मध्ये राष्ट्रीय तर क्रिकेटमध्ये राज्यस्तरावर आपल्या क्रीडा गुणांचे कसब दाखविले. त्यातही त्यांना करिअरच्या वाटा शोधता आल्या असता... मात्र 'बुडती हे जन न देखावे डोळा' हा तुकाराम महाराजांचा कळवळा त्यांनी अंगिकारत सन २००३ पासून पत्रकारितेला सुरुवात केली. तब्बल २३ वर्षाच्या पत्रप्रपंचात त्यांनी प्रखड आणि निर्भीडपणे हाताळलेले विविध विषय, त्यांची प्रभावी राजकीय सामाजिक मांडणी समाजाला नवी दिशा देणारी ठरली. एका वृत्तवाहिनीत सलग १५ वर्षे वृत्तनिवेदना सोबत मोठमोठ्या राजकीय सभा व कार्यक्रमांचे त्यांनी निवेदन केले. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, कवी कुमार विश्वास यांच्या कार्यक्रमाचे त्यांनी केलेले निवेदन तर अविस्मरणीय ठरले.

लोणार व सिंदखेडराजा विकास आराखड्यावरची त्यांची लेखमाला तर विशेष दखलपात्र... पर्यटन विभागाने विकास आराखडा नाकारल्यामुळे त्यांनी केलेल्या वृत्तांकनाचे यश म्हणून तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी जिल्हा दौरा केला होता. महाराष्ट्र शासनाच्या तंटामुक्त गाव या मोहिमेवर वास्तव व पथदर्शी लिखाण केल्याबद्दल सन २००७ मध्ये बुलढाणा जिल्ह्यातील पहिल्या विभाग स्तरीय पुरस्काराचे ते मानकरी ठरले. विविध सामाजिक संघटनांनी त्यांच्या



पत्रकारितेतील योगदानाबद्दल त्यांचा विशेष गौरव केला आहे. आनंदीबाई जोशी, तंटामुक्त मूल्यमापन, दत्तकग्राम या शासकीय समित्यांवरही त्यांनी आपल्या कार्यशैलीची चुणूक दाखवल्याचे सर्वश्रुत आहे.

कमालीचे संवेदनशील व कुटुंबवत्सल असणारे गजानन धांडे यांचे राजकारणासोबतच साहित्य, कला, क्रीडा, संस्कृती सहकार, वैद्यकीय तसेच सामाजिक क्षेत्रातील दिग्गजांसोबत जिव्हाळ्याचे संबंध... चांद्यापासून ते बांद्यापर्यंत त्यांचा वावर असल्यामुळे त्यांची नाळ मातीची घट्ट कायम असून प्रश्नांची व समस्यांची उकल करण्यात त्यांची विशेष हातोटी आहे.

त्यांच्या प्रामाणिक आणि स्पष्टवक्तेपणामुळे त्यांच्याकडे काम घेऊन येणारी माणसेही तेवढीच निर्मळ आणि निकोप मनाची असतात. त्यामुळे सातत्यपूर्ण पाठपुरावा करून गजानन धांडे त्यांचे प्रश्न मार्गी लावतात. 'माऊली'...आमचे काम झाले हा कृतज्ञपूर्वक भाव घेऊन त्यांना भेटायला येणाऱ्या सर्वसामान्य माणसांच्या चेहऱ्यावरचे समाधान त्यांच्या निस्वार्थी कार्याची पावती देते.

त्यांना दररोज येणाऱ्या शेकडो फोन मधील पाच ते सहा फोन हे रुग्णालयाच्या कामाचे असतात, अशा वेळी गजानन धांडे हे जातीने लक्ष घालून रुग्णांना भेटून त्यांची विचारपूस करतात. त्यांच्याकडून होईल ते सहकार्य करुन नातेवाईकांच्या जेवणाची व्यवस्था करतात. खऱ्या अर्थाने माणसात देव शोधणाऱ्या गजानन धांडे यांना सर्वजण माऊली या नावाने संबोधितात, हे विशेष..!

जिल्हाप्रमुख बुधवत यांच्या सोशल इंजिनिअरिंगमधून शिवसेनेत नवीन चेहरे राजकीय पटलावर येत आहे. त्यातीलच एक अग्रगण्य नाव म्हणजे गजानन धांडे.

**शिवसैनिक ते जिल्हा समन्वयक पदापर्यंतचा प्रवास -**

आता कुठे तिरंगा लक्षात राहतो, मी शेकडो ध्वजांच्या देशात राहतो, सगळ्या विचारधारा केल्यात पाठ मी, सोयीनुसार सगळ्या पक्षात राहतो.. या गझलकार सुधीर मुळीक यांच्या ओळी वर्तमान राजकीय परिस्थितीवर भाष्य करतात. तत्व आणि निष्ठा घेऊन चालणारी माणसं राजकारणातून नामशेष होता की काय ? अशा विपरीत परिस्थितीत गजानन धांडे एक आश्वासक चेहरा म्हणून उभे राहतात. शिवसेनेत उभी फूट पडल्यानंतर या माणसालाही सत्ताधारी शिवसेनेसोबत जाता आले असते मात्र विचारधारा, जीवनमूल्ये, तत्वांशी या माणसाने कधीच प्रतारणा केली नाही. ज्या तालुक्यात शिवसेनेची पाळंमुळे रुजली आणि जिल्हाभर विस्तारली त्याच मेहकर तालुक्यातून गजानन धांडे यांना शिवसेना विचारांचा वडिलोपार्जित वारसा लाभाला. शिवसेनेला परिवाराचा प्राधान्यक्रम देऊन १८ वर्षाच्या सक्रिय राजकारणात गजानन धांडे यांनी जिल्हा प्रसिद्धी प्रमुख ते पक्षाच्या संघटनात्मक पातळीवर जिल्हाप्रमुख जालिंधर बुधवत यांच्या खांद्याला खांद्या लावून अनेक पदांना न्याय दिला. त्यांच्या कल्पक नियोजनातून झालेली आंदोलने व मोर्चे विशेष लक्षवेधी ठरली. आता पक्षाने त्यांची जिल्हा समन्वयक पदावर केलेली नियुक्ती त्यांच्या १८ वर्षाच्या राजकीय कामाचे परिपाक असल्याचे दिसून येते. पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे तसेच वरिष्ठ नेते आणि जिल्हाप्रमुख जालिंधर बुधवत यांच्या विश्वासाला सार्थ ठरवत आगामी काळात गजानन धांडे राजकारणातील एक आश्वासक चेहरा असेल ही काळ्या दागडावरची पांढरी रेघ! **(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

# लढतोय उपाशी पोटी.. तुमच्याच लेकरांसाठी.!



**॥ भोवताल - ४९ ॥**
**- प्रमोद पवार**
**मो.नं.८९७५३७१००३**

'सोनम वांगचुक" यांचे उपोषण हे लोकशाहीतील न्याय मागण्यासाठी चे एक प्रमुख आयुध आहे. हे आत्मक्लेष आंदोलन कोणाचा द्वेष करण्यासाठी नसून, शिक्षण दोषमुक्त होण्यासाठी आहे. मुद्दा- मतभेद- मागणी यावर उपाय असतो, संवाद -चर्चा- मांडणी. त्यासाठी आवश्यक असते संवेदना! शासन सुसंवादी असावे, यासाठी जनता देखील संवेदनशील असली पाहिजे! जागृतीने- जबाबदारीने वागली पाहिजे!

तो लढतोय उपाशीपोटी, तुमच्याच लेकरांसाठी.. उद्या पिढीचे पोट भरावे, म्हणून घास अडला ओठी.! आपण का? कसे जेवू? तो उपाशी असताना..

ताटात कशी भाकरी ठेवू, कारकीर्द माती होताना.! उगाच अफवा नको विषारी, त्याची मागणी गैर काय? तो तळमळतो देशासाठी, त्याचे कुणाशी वैर काय.? त्याच्याशी बोललं पाहिजे, न ठेवता मनात अढी.. तोडगा काय? तर शिक्षण वाचवा, सुरक्षित ठेवण्या तरुण पिढी.! काही घरातील जीव गेलेत, लाखो स्वप्नांची राख.. षंढ मनाला आग लावा, लोकशाहीची ऐका हाक.!

या देशाच्या मातीचा इतिहास, गौरवाचा व शौर्याचा आहे. स्वैराचारी नंदराज्य घालवणाऱ्या, चाणक्य व चंद्रगुप्त मौर्याचा आहे! जग कल्याणास्तव वैभव त्यागणाऱ्या सिद्धार्थाचा.. हा देश बंधुप्रेमास्तव सन्यस्त अशा भरताचा.! संधी-तह-शांती प्रस्ताव देणाऱ्या सर्वज्ञ श्रीकृष्णाचा.. देश हा, कुरुक्षेत्रावर अधर्म नाशक सारथी आणि पार्थाचा.! वेळ आली आहे हा वारसा आठवण्याची.. जनतेने उज्वल इतिहास स्मरून पेटण्याची.! राजकारणात समोपचार साधला पाहिजे. मान पानाच्या पलीकडे मुद्देसूद उपचार शोधला पाहिजे. परंतु लोकशाहीचा गळा घोटताना दिसल्यावर, जनतेने बोललं पाहिजे.. लेकरांच्या भविष्यात अंधार होत असताना, संघर्षाची मशाल घेऊन चाललं पाहिजे.! वांगचूक यांची चूक काय? तर त्यांच्यासाठी देश सर्वोच्च आहे.. ते काळजापासून काळजी करतात!

प्रत्येकाने स्वतःला प्रश्न विचारा, "मी त्या काळात असतो तर कोणासोबत असतो?" जर शिवकाळात असतो तर वतन लोभी होऊन फितूर झालो असतो? की स्वराज्यास्तव जगण्या मरण्याला आतुर झालो असतो.! विचारा स्वतःला, न्यायासाठी संघर्षाची वाट निवडून "शिवरायांच्या संगती" झुंजुलो असतो? की ऐशोआरामी शोकापाई, मोगली दरबारात रमलो असतो.!? तुमचे उत्तर "मावळा बनून जगलो असतो", हे असेल तर.. आज वेळ आहे "शिव संदेशाच्या अंमलबजावणीची.." कोणाच्या बाजूने असतो मी? स्त्री शिक्षण, अस्पृश्य निवारणार्थ चंदन होऊन, आयुष्य उगाळून घेणाऱ्या महात्मा फुल्यांसोबत? की धर्मा च्या आडून समाजाचे शोषण करणाऱ्या, स्वयंघोषित उच्चभ्रू मवाल्यांसोबत.? जर उत्तर.. "ज्योती-साऊ सोबत", असे असेल.. तर आज वेळ आली आहे, शिक्षणासाठी रस्त्यावर उतरण्याची.. प्रत्येक पुरुषाने ज्ञानज्योती पेटवून- प्रत्येक स्त्रीने सावित्री होण्याची.!

भीमराव हवा आहे, ज्याने संविधानातून समता-न्यायाची, मतपेटीतून राजा निवडण्याची तजवीज करून ठेवली.. की जातीभेद- वर्णव्यवस्थेतून शूद्रता लादणारी रावशाही मनुस्मृती हवी आहे.? मानवता हवी असेल तर आज वेळ आली आहे.. कायदा सुव्यवस्था राखण्यास्तव दोन पाऊले चालण्याची.. हक्काचा आवाज होऊन बोलण्याची.! विचारा मनाला की, इंग्रजांचे गुलाम होतो, तेव्हा कोण असता तुम्ही? शहीद भगतसिंग- रामप्रसाद बिस्मिल- राजगुरू- चंद्रशेखर आझाद प्रितीलता वड्डेदार.. असे असता "क्रांतिकारी"? की स्वीकारली असती इंग्रजांचे हस्तक बनून वावरणारी "लाचारी"? रईसी सोडून फकीरी स्वीकारलेल्या, उच्चशिक्षित तरीही नैतिक जबाबदारी स्वीकारून, कर्तव्याची वाट धरून चालणाऱ्या अर्ध नग्न महात्मा गांधींचे अनुयायी बनून

राहणारे, "सत्याग्रही" असता? की तुम्ही इंग्रजी सत्तेच्या दडपशाहीतून, चाकरीच्या असहायतेतून लाठी हल्ला करणारे "दुराग्रही" असता? उघड्या-निधड्या छातीने "चले जाव" सांगण्याचे काळीज बाळगणाऱ्या "रघुपति राघव राजाराम", गाणाऱ्या सोबत असता? की देशभक्त छातीवर गोळ्या झाडणाऱ्या, इंग्रजांपुढे लाळ घोटणाऱ्या "नथुराम" सोबत?? जर तुमचे उत्तर असेल की, "मी अहिंसक सत्याग्रही अथवा सशस्त्र लढवय्या क्रांतिकारी असतो".. तर आज वेळ आली आहे, क्रांतीची.! सत्याचा आग्रह धरण्याची.! तुमचा राजकीय पक्ष कोणताही असो, तुमचा नेता कुणीही असो, तुमची जात, तुमचा धर्म कोणताही असो, आधी तुम्ही लेकरांचे मायबाप आहात.! यासाठी तरी मृतप्राय होऊ पाहणारा आत्मा जागी करा. तुम्ही आधी देशाचे नागरिक आहात, हे राष्ट्र तुमची जबाबदारी आहे, यासाठी तरी बोलते व्हा.. लढते व्हा.!

प्राण कधीतरी जाणारच आहेत. पण प्रामाणिकतेचा प्रण राहिला पाहिजे! मरणे अटळ आहे पण जिवंत आहोत तोपर्यंत असे जगू की, जगण्याचा साज दिसला पाहिजे.. स्वाभिमानाचा आनंद असला पाहिजे.! NEET, नीट "न" झाल्याने बाधित झालेल्या लाखो घरातील आई-बाबांनो.. लोकशाहीची विटंबना मुकाट पाहणाऱ्या नागरिकांनो.. उद्या तुमची लेकरं विचारतील, "त्या पडत्या- घडत्या काळात तुम्ही किमान धडपडला? लढला? की आंधळे मुके बहिरे होऊन धाकाला बळी पडला?.. तर उत्तर काय द्याल!?

जब भी आईना देखो खुद पर फक्र हो.. कोई दुवा करे तो, उस मे हमारा भी जिक्र हो.. इस तरह जिओ मरने से पहले, की मरो तो, मिली जिंदगी का शुक्र हो.! लक्षात ठेवा तो उपाशी आहे.. त्याला भूक आहे, पाठिंब्याची.. चला बाहेर पडू! लढू!

**ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**


हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक **सुरेश बाबुराव देवकर** यांनी भास्कर प्रकाशन प्रा.लि.प्लॉट नं. टी ५१, फेज नं.४ एमआयडीसी ग्रोथ सेंटर अकोला येथे मुद्रित करुन दैनिक महाभूमि मुख्य कार्यालय, बी.के. कॉम्प्लेक्स, धाड नाका, बुलढाणा- ४४३००१ येथे प्रसिद्ध केले.मुख्य संपादक- **सुरेश बाबुराव देवकर** कार्यकारी संपादक-**ब्रह्मानंद रुपराव जाधव** (पीआरबी कायद्यानुसार मजकुराच्या निवडीची जबाबदारी यांची) आर.एन.आय.नं. MAHMAR/२०२३/८९१४८ पोस्टल नं.बीएलडी /२३९/२०२५-२७ ईमेल-**dainikmahabhoomi@gmail.com.** कार्यालय मोबा. **8960040018/19** (बुलढाणा न्यायालय कक्षेत)

दैनिक महाभूमि

This newspaper is printer, publisher and editor and Owner by **Suresh Baburao Deokar** Printed at Bhaskar Prakashan Pvt.Ltd Plot no.T-51, Phase No.4 MIDC Growth Center Akola (Maharashtra) Published at Head Office : DAINIK MAHABHOOMI B.K.Complex, Dhad Naka, Buldhana-443001, (M.S.) Executive Editor : **Bramhanand Ruprao Jadhao** RNI No.MAHMAR/2023/89148 POSTAL NO.BLD/239/2025-27

छत्रपती संभाजीनगर भूमि

मंगळवार, २१ जुलै २०२६ mahabhoomimarathwada@gmail.com

## न्यूज ब्रीफ

### देऱ्हळ येथे पीक पाहणी उत्साहात

**लासूर स्टेशन :** गंगापूर तालुक्यातील देऱ्हळ येथे सचिन शेतकरी उत्पादक कंपनीच्या वतीने शेतकऱ्यांसाठी पीक पाहणी आणि शेती कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत परिसरातील शेतकरी उपस्थित होते. यावेळी कृषी तज्ञांनी पिकाची वाढ, खत व्यवस्थापन, कीड-रोग नियंत्रण आणि उत्पादन वाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन केले. शेतात जाऊन प्रत्यक्ष पीक पाहणी करून शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. शेती शाळेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना कमी खर्चात अधिक उत्पादन कसे घेता येईल याबाबत माहिती देण्यात आली.

### दारू विकणाऱ्यावर कारवाई

**वैजापूर :** अवैधरित्या देशी दारुचा साठा करुन विक्री करणाऱ्या सुरेश गोपीनाथ खिल्लारी, रा. नादी, ता. वैजापूर यांच्यावर गुरुवार, १६ जुलै रोजी विरगाव पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी सुरेश खिल्लारी यांच्या ताब्यातून १२०० रुपये किंमतीच्या देशी दारूच्या १० बाटल्या जप्त केल्या आहेत. याप्रकरणी पोलिस अंमलदार संजय गंगावणे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन सुरेश खिल्लारी यांच्याविरुद्ध विरगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने ; सरकारविरोधात घोषणाबाजी

# केंद्रीय शिक्षणमंत्र्याच्या राजीनाम्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस आक्रमक

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी




नीट आणि टीईटी पेपर फुटीमुळे देशातील आणि राज्यातील लाखो विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्याचा आरोप करीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा या मागणीसाठी सोमवार, २० जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने आंदोलन करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केंद्र व राज्यसरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करीत परिसर दणाणून सोडला होता. धरणे आंदोलनानंतर शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांना आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले.

देशात अलीकडच्या काळात २० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याच्या दुर्दैवी घटना घडल्या आहेत. तसेच, विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांवर शिक्षणतज्ञ सोनम वांगचुक यांनीही दिल्लीतील जंतर-मंतर येथे उपोषण केले. मात्र, या गंभीर प्रश्नांकडे केंद्र व राज्य सरकार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असून केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याचा घणाघाती आरोप आंदोलकांनी यावेळी केला. विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात असताना सरकारची ही प्रवृत्ती अतिशय असंवेदनशील आणि दिम्म असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग तांगडे पाटील यांनी सांगितले. नीट, टीईटी पेपरफुटी सारख्या गंभीर घटना घडूनही नैतिक जबाबदारी न स्वीकारणाऱ्या केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा तात्काळ राजीनामा घेण्यात यावा, विद्यार्थीविरोधी धोरणे राबवणे बंद करण्यात यावे आदी मागण्यांचे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर झालेल्या निदर्शने आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाअध्यक्ष पांडुरंग तांगडे पाटील, प्रदेश उपाध्यक्ष डॉ. भीमराव हत्तिअंबीरे, माजी आमदार संजय वाघचौरे, शहराध्यक्ष ख्वाजा शरफोद्दीन मुल्ला, प्रदेश सरचिटणीस प्रा. सलीम शेख, जिल्हाकार्याध्यक्ष विश्वजीत चव्हाण, शहर कार्याध्यक्ष आशिष पवार, तालुकाध्यक्ष प्रसन्ना पाटील, राजेंद्र पाथ्रीकर, प्रकाश ढुबे, जुबेर मोतीवाला, शेख शफीक, अजित पाटील, सतीश देशमुख, अशोक बनकर, उद्धव बनसोडे, प्रशांत जगताप, सुशील बोर्डे, प्रकाश इंगळे, राकेश कांबळे, रवी खिल्लारे, अय्युब खान, अनिल सुरडकर, प्रा.सुनील मगरे, अजय बोडखे, शैलेंद्र देहाडे, आनंद मगरे, संतोष दांडगे, आशिष इंगळे, हर्षल निकम, अनिल डोंगरे, ऋतुजा खिल्लारे, ललिता मगरे, अनुराधा सोनपसारे, स्मिता पालवे, सिद्धार्थ गुट्टेकर, ओम जिते आदी सहभागी झाले होते.

### विद्यार्थी हितासाठी लढा सुरुच राहणार

देशातील आणि राज्यातील विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांकडे सरकार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाअध्यक्ष पांडुरंग तांगडे पाटील यांनी केला आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्या असंवेदनशील सरकारचा यावेळी निषेध करीत, विद्यार्थी हितासाठी यापुढेही लढा सुरुच ठेवण्याचा निर्धार त्यांनी यावेळी बोलून दाखवला.

# सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ तरुणाई रस्त्यावर

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी






केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा या मुख्य मागणीसह विद्यार्थ्यांच्या इतर प्रलंबित मागण्यासाठी सोनम वांगचुक यांनी नवी दिल्लीतील जंतर-मंतर मैदानावर गेल्या महिनाभरापासून आमरण उपोषण सुरु केले आहे. सोमवार, २० जुलै रोजी संसदेवर काँक्रोच जनता पार्टीच्या वतीने काढण्यात आलेल्या मोर्चावर लाठीमाराच्या घटनेनंतर सोनम वांगचुक यांच्या समर्थनाथ तरुणाई रस्त्यावर उतरली आहे.

नीट, टीईटी पेपरफुटी सारख्या गंभीर घटना घडूनही नैतिक जबाबदारी न स्वीकारणाऱ्या केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा तात्काळ राजीनामा घेण्यात यावा या मुख्य मागणीसह इतर मागण्यासाठी सोनम वांगचुक यांनी नवी दिल्लीतील जंतर-मंतर मैदानावर गेल्या महिनाभरापासून आमरण उपोषण सुरु केले आहे. परंतु केंद्र सरकार त्यांच्या आंदोलन गांभीर्याने घेत नसल्यामुळे तरुणाईत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ तसेच आपल्या मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधून घेण्यासाठी काँक्रोच जनता पार्टीच्या वतीने सोमवारी संसदेवर मोर्चा काढण्यात आला होता.

यावेळी मोर्चेकऱ्यांवर दिल्ली पोलिसांनी लाठीचार्ज करीत अश्रुधुराचा मारा केला. यामध्ये शेकडो विद्यार्थी जखमी झाले आहेत. दिल्लीतील या घटनेनंतर देशभर संतापाचे वातावरण निर्माण झाले असून सोमवारी क्रांतीचौक परिसरात आणि शहागंज परिसरातील गांधीपुतळा येथे एक दिवसीय लाक्षणीक उपोषण करुन सोनम वांगचुक यांना समर्थन देण्यात आले.

### क्रांतीची सुरुवात झाली : आ दानवे

दिल्लीत ज्या पद्धतीने देशातील तरुणांचे आंदोलन सुरू झाले आहे, मला असे वाटते की ही क्रांतीची सुरुवात झाली आहे. परंतु, या तरुणांच्या मागणीसाठी ज्याचा काही संबंध नाही, त्या जयप्रकाश नड्डांना भेटायला पाठवत आहेत. ही कोणती पद्धत आहे. लोकशाही पूर्णपणे दाबण्याचा हा प्रयत्न असल्याचा आरोप शिवसेना (उबाठा) नेते आमदार अंबादास दानवे यांनी केला आहे. तसेच विद्यार्थ्यांवर अश्रू धूर सोडला जात आहे. देशाचे पंतप्रधान दुसऱ्या देशात जातात, तिथल्या मुलांच्या डोक्यावरून हात फिरवतात. पण इथे आपल्याच लेकरांवर गोळ्या झाडल्या जातात. आपल्याच लेकरांवर अश्रू धूर सोडला जातो, त्यांचेशी बोलले जात नाही. म्हणजे मला असे वाटते की अशा पद्धतीने वागणारा पंतप्रधान, अशा पद्धतीने लोकशाहीची चेष्टा या देशात होते. या हुकुमशाहीला हटवण्यासाठीचा एल्गार देशात आता सुरु झाला असल्याचे त्यांनी सांगितले.

# शिवराणा सेवा संघातर्फे गुणवंतांचा सत्कार

पाचपीरवाडी / प्रतिनिधी



शिवराणा सेवा संघ महाराष्ट्र व नागरी विकास सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने वीर शिरोमणी महाराणा प्रताप गुणवंत सन्मान पुरस्कार वितरण सोहळा रविवार, १९ जुलै रोजी उत्साहात पार पडला. यावेळी दहावी, बारावी परीक्षेत ७० टक्क्यापेक्षा अधिक गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांना तसेच विविध स्पर्धा परीक्षेत यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांना पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

पुंडलिकनगर परिसरातील तिरुमला मंगल कार्यालयात रविवारी शिवराणा सेवा संघ महाराष्ट्र व नागरी विकास सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने वीर शिरोमणी महाराणा प्रताप गुणवंत सन्मान पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी पालकमंत्री संजय शिरसाट, शिवराणा सेवा संघाचे अध्यक्ष एल.टी. ताटू. अंजली कोकुल्डे, सुभाष राजपूत, काळूसिंग नागलोत, विनोद परदेशी आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना शिवराणा सेवा संघाचे अध्यक्ष एल.टी. ताटू यांनी राजपूत समाजाच्या वैद्यता प्रमाणपत्राचा प्रश्न, स्पर्धा परीक्षेसाठी अभ्यासिका तसेच महाराणा प्रताप सिंग वास्तुसंग्रहालयासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली. यावर पालकमंत्री शिरसाट यांनी स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक कोटी रुपयांचा निधी अभ्यासिकेसाठी देण्याचे जाहिर केले.

या कार्यक्रमात एमपीएससी, यूपीएससी परीक्षेत यशस्वी झालेल्या १८५ गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तर समाजभूषण पुरस्कार कल्याण कोतवाल, डॉ लक्ष्मण महेर, विठ्ठल राणा ठाकूर, संतोष महेर, मंगल सिंगल, सुनील राजपूत, विनोद परदेशी, चंदनसिंग राजपूत, देवेंद्र राजपूत, दीपक राजपूत यांना प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद परदेशी यांनी केले. तर उपस्थितांचे आभार अंजली कोकुल्डे यांनी मानले.

### अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

**सिल्लोड :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त शनिवार, १८ जुलै रोजी अण्णाभाऊ साठे चौक येथे अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी साहित्यिक प्रा डॉ अंबादास सगट यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे यांना प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी अण्णा भाऊ साठे संघर्ष सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष साहेबराव दणके, अण्णाभाऊ साठे युवा मंच अध्यक्ष डॉ. सचिन साबळे, भारतीय दलित संसदेचे जिल्हाध्यक्ष शिवराम कांबळे, अण्णाभाऊ साठे संघर्ष सेनेचे उपाध्यक्ष त्रिंबक शेजुळ, शशिकला सगट, एकनाथ आगम, कैलास पाचुंदे, गणेश कांबळे, मच्छिंद्र काकडे, रोहित कांबळे, सुभाष कांबळे सुरेश कांबळे, समाधान गायकवाड आदींची उपस्थिती होती.

# जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदी आमदार विलास भुमरे यांची निवड

### उपाध्यक्षपदी रामराव शेळके यांची वर्णी

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी



तब्बल ३ हजार ४९३ कोटींच्या ठेवी असलेल्या औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी पैठणचे शिवसेना (शिंदे गट) आमदार विलास भुमरे तर उपाध्यक्षपदी भाजपचे रामराव शेळके विराजमान झाले. दोन्ही पदासाठी एक-एकच अर्ज दाखल झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक समृत जाधव यांनी निवड बिनविरोध झाल्याचे सोमवार, २० जुलै रोजी घोषित केले. दरम्यान, निकाल घोषित होताच महायुतीच्या कार्यकर्त्यांनी ढोल-ताशाच्या गजरात ठेका धरत आणि गुलालाची उधळण करत एकच जल्लोष केला.

जिल्हा बँकेच्या २० पैकी १९ संचालक हे शेतकरी विकास पॅनलचे आहेत. या पॅनलमध्ये शिवसेना (उबाठा) पक्षाचे आमदार अंबादास दानवे यांचा अपवाद वगळता महायुतीचे नेते, पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे. यात पालकमंत्री संजय शिरसाट, ओबीसी कल्याण मंत्री अतुल सावे, आ. अनुराधा चव्हाण, आ. रमेश बोरनारे, आ. विलास भुमरे, आ.रंजना जाधव आदींचा समावेश आहे. तर भूमिपुत्र शेतकरी सहकार बँक बचाव पॅनलचे खासदार डॉ. कल्याण काळे हे एकमेव संचालक आहेत. परंतु महायुतीला स्पष्ट बहुमत मिळूनही अध्यक्षपदासाठी भाजप आणि शिवसेनेत मोठी रस्सीखेच सुरू होती. या तिढ्यावर तोडगा काढण्यासाठी बैठकांचे सत्र पार पडले आणि त्यात पहिली दोन वर्ष अध्यक्षपद शिवसेनेकडे तर उपाध्यक्षपद भाजपकडे असेल, असा फॉर्म्युला निश्चित करण्यात आला आहे. बँकेच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडीसाठी सोमवारी निवडणूक निर्णय अधिकारी समृत जाधव यांच्या अध्यक्षतेखाली बँकेच्या सभागृहात सोमवारी सकाळी अकरा वाजता बैठकीला सुरुवात झाली. अध्यक्षपदासाठी आमदार विलास भुमरे यांचा एकमेव तर उपाध्यक्षपदासाठी भाजपचे रामराव शेळके यांचा अर्ज दाखल झाला होता.

### बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविणार

औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक नावारुपास यावी, यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत. शेतकऱ्यांची ही बँक असून शेतकऱ्यांचे हित जोपासणे आणि त्यांच्या अडीअडचणी बँकेच्या माध्यमातून सोडविण्यावर भर असेल असे नवनिर्वाचित अध्यक्ष विलास भुमरे यांनी निवडीनंतर पत्रकारांशी बोलताना सांगितले. तसेच बँकेत ऑनलाइन प्रणालीवर जास्तीत जास्त भर देण्यात येईल असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

# सावळदबारा सर्कलच्या समस्या सोडविण्यासाठी कटीबध्द : मुलतानी



सावळदबारा / प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांनी सावळदबारा पंचायत समिती. गणातील कार्यकर्त्यांची बैठक रविवार, १९ जुलै रोजी घेतली. यावेळी त्यांनी आगामी काळात पक्ष, संघटना मजबूत करण्यावर भर दिला. तसेच सावळदबारा सर्कलमधील समस्या सोडविण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. बैठकीच्या प्रारंभी भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी इद्रीस मुलतानी यांचे स्वागत करीत त्यांचा सत्कार केला.

सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथील भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांच्या संपर्क कार्यालयात सावळदबारा पंचायत समिती गणातील भाजपा कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. या बैठकीस भाजपचे सोयगाव तालुका अध्यक्ष संजय पाटील, ब्रिजेंटनटीचे प्रदेश उपाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण, जिल्हा चिटणीस सुनिल गावडे, भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते, पंचायत समिती सभापती उत्तम चव्हाण, पंचायत समिती. सदस्य राहुल राठोड, शिवाजी बुढाळ, गणेश लोखंडे, भावराव कोलते, एन. आर. कोलते, अनिल राठोड, लवकेश जाधव, वर्धन चव्हाण, प्रमोद पाटील, माजी सरपंच आज्ञासिंग चव्हाण, संजय चव्हाण, प्रभाकर बडे, प्रदिप चव्हाण, रहिम पठाण, दिपक मानकर, मुकुंदा गायकवाड, कैलास शेळके, गजानन चव्हाण, शांताराम खराटे, स्वराज डापके, अतुल चव्हाण, देवआप्पा पधाडे, बेलआप्पा पधाडे, एकनाथ सपाटे आदींची उपस्थिती होती.

### वृद्धेच्या गळ्यातील पेंडन्ट हिसकावले

**छत्रपती संभाजीनगर :** मैत्रिणीसोबत पायी घरी जाणाऱ्या ७५ वर्षीय वृद्धेच्या गळ्यातील सोन्याचे पेंडन्ट चोरट्यांनी लंपास केले. ही घटना जालना रोडलगतच्या श्रीनाथनगर संतपुरे हॉस्पिटलजवळ घडली. याप्रकरणी जिन्सी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विजया ओमप्रकाश सोमदाणी (७५ वर्ष) रा. श्रीनाथनगर यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार १८ जुलै रोजी संध्याकाळी सव्वा सहा वाजेच्या सुमारास फिर्यादी मैत्रिण उर्मिला लोया यांच्यासोबत जात असताना संतपुरे हॉस्पिटलजवळ चोरट्याने अचानक ४० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे पेंडट हिसकावून धूम ठोकली.

# सुमित शिंदे यांच्या तर्फे चिकलठाणा गौशाळेत चारा वाटप

लासूर स्टेशन / प्रतिनिधी



येथील सामाजिक कार्यकर्ते सुमित शिंदे यांच्या वतीने गुरुवार, १६ जुलै रोजी चिकलठाणा परिसरातील श्री महावीर जैन गौ-शाळेत चारा वाटप करण्यात आले. यावेळी सुमित शिंदे मित्र मंडळाच्या वतीने गायींना हिरवा चारा भरवून गौ-रक्षणाचा संदेश देण्यात आला.

लासूर स्टेशन येथील सामाजिक कार्यकर्ते सुमित शिंदे यांच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून गुरुवारी चिकलठाणा येथील श्री महावीर जैन गौ-शाळेत चारा वाटप करण्यात आला. यावेळी सुमित शिंदे मित्र मंडळाच्या सचिन भोले, अमोल गायकवाड, रवी सूर्यनारायण, अज्ज दोखले, अक्षी गायकवाड, अनुराग दाभाडे, आदित्य खंडागळे, विनोद सोनवणे आदींच्या हस्ते गायींना हिरवा चारा भरवून गौ-रक्षणाचा संदेश देण्यात आला. सुमित शिंदे मित्र मंडळाने राबविलेल्या या सामाजिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

### स्वामी समर्थ मंदिरात चोरी

**छत्रपती संभाजीनगर :** वाळूज एमआयडीसी बजाजनगरातील स्वामी समर्थ मंदिरात चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. चोरट्यांनी दागिन्यांसह तीन दानपेट्या लांबविल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली आहे. सिडको परिसरातील नर्मदेश्वर महादेव मंदिरात चोरी झाली होती. ही घटना ताजी असतानाच बजाजनगरातील स्वामी समर्थ मंदिरात चोरीची घटना उघडकीस आली. गुरूवार, १७ जुलै रोजी सकाळी भाविक दर्शनासाठी आल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. चोरट्यांनी चांदीच्या पादुका, सोन्याची साखळी आणि ३ दानपेट्या लंपास केल्या. याप्रकरणी एमआयडीसी वाळूज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### जिल्ह्यांतील ३४ गावांत १०२० लाभार्थ्यांचा समावेश

# घरकुलासाठी जागा नसलेल्या लाभार्थ्यांना जिल्हा प्रशासन देणार जमीन

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी




ग्रामीण भागातील गरीब कुटुंबाना घरकूल मंजूर होऊनही स्वतःच्या मालकीची जागा नसलेल्या जिल्ह्यातील ३४ गावांतील १०२० लाभार्थ्यांना जिल्हा प्रशासन जागा उपलब्ध करून देणार आहे. आठ दिवसात ही प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. राजस्व अभियानात लाभार्थ्यांना जागा मंजुरीचे पत्र दिले जाणार असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांनी सांगितले.

स्वतःचे घर नसलेल्या जिल्ह्यातील गरीब कुटुंबांना विविध योजनांतर्गत घरकूल मंजूर केले. परंतु अनेक लाभार्थ्यांच्या नावावर जागाच नसल्याने घरकूल उभारणीचे अडचणी येत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली. त्यामुळे २३ मार्च २०२६ रोजी जी.आर. काढून अशा लाभार्थ्यांना शासकीय जागा देण्याचा निर्णय शासनाने घेतला. या निर्णयानुसार जिल्हा परिषदेने प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण), रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना तसेच इतर योजनांतील घरकूल मंजूर लाभार्थ्यांची जागेअभावी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाकडे सादर केला. यामध्ये ३४ गावांतील १०२० लाभार्थ्यांचा समावेश आहे. या लाभार्थ्यांना जवळपास ३ लाख चौरस फूट शासकीय जमीन घरकुलासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. संबंधित गावांमधील उपलब्ध गायरान, महसुली व इतर शासकीय जमिनींची पाहणी करून पात्र लाभार्थ्यांना नियमानुसार त्या जागा वाटप करण्यात येणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांनी दिली आहे.

दरम्यान, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या आढावा बैठकीत घरकुलाच्या जागेबाबत चर्चा करण्यात आली. वन विभाग, नोंदणी विभाग, उपविभागीय अधिकारी कार्यालय, महानगर प्राधिकरण, भूमी अभिलेख विभागाकडून संबंधित गावातील गटांबाबत सविस्तर अहवाल मागविण्यात आला आहे. जिल्ह्यात तब्बल ४ हजार ७५१ लाभार्थी हे भूमीहीन आहेत. त्यापैकी २७०५ लाभार्थ्यांनी गायरान तर ३९५ लाभार्थ्यांनी गावठाण जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

### राजस्व अभियानात मिळणार लाभ

विविध विभागांकडून संबंधित गावातील संबंधित गटांबाबत सविस्तर अहवाल मागविला आहे. जमिनीच्या सर्वेक्षणाला सुरुवातही झाली आहे. पुढील आठ दिवसात सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. त्यानंतर राजस्व अभियानात या लाभार्थ्यांना जागा वाटपाचे पत्र देण्यात येणार आहे. त्यानंतर ते त्या जागेवर घरकूल बांधू शकतील अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांनी दिली आहे.

# तीन अपत्ये अन् अतिक्रमण प्रकरणात नोटीस बजावणार

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

महापालिकेच्या निवडणुकीत विजयी २० ते २५ नगरसेवकांच्या विरोधात तीन अपत्ये, अनधिकृत बांधकामे, अतिक्रमण करणे या स्वरूपाच्या तक्रारी आल्या. प्रशासनाने आलेल्या तक्रारींची चौकशी करून अहवाल मागविला आहे. काही प्रकरणांत अहवाल येणे बाकी असून, ते आल्यावर एकाच वेळी सर्वांना नोटीस देण्यात येईल, असे मनपा आयुक्त अमोल येडगे यांनी सांगितले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १० (ड) (१) नुसार दोनपेक्षा जास्त अपत्ये असणे, अनधिकृत बांधकाम करणे, तसेच सरकारी जागेवर अतिक्रमण करणे, आदी प्रकरणात तथ्य आढळून आल्यास नगरसेवकाचे पद रद्द करण्याची तरतूद आहे. त्यानुसार विरोधी पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आपल्या प्रभागातून विजयी झालेल्या २०-२५ नगरसेवकविरोधात तक्रारी दाखल केल्या. एमआयएम नगरसेवकांसह सत्ताधारी भाजप-शिवसेना पक्षाच्या नगरसेवकांचाही समावेश आहे. दरम्यान, कारवाई न केल्यास उपोषण करण्याचा इशारा तक्रारदारांनी आयुक्तांना दिला आहे.

## न्यूज ब्रीफ

### कल्पना बनकर यांचा सत्कार

**अकोलादेव :** जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर अकोलादेव परिसरातील चिमुकली विद्यार्थिनी कल्पना निवृत्ती बनकर हिने जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवत गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या कल्पना बनकर हिचा नुकताच सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सुनील बनकर यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांत गुणवत्ता असून त्यांना योग्य संधी मिळावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

### तंबाखू विकणाऱ्या दोघांवर कारवाई

**वैजापूर :** शाळा परीसरात टपरीवर तंबाखू विकणाऱ्या दोन टपरी चालका विरूद्ध विरगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई शनिवार, १८ जुलै रोजी वैजापूर तालुक्यातील वांजरगाव येथे करण्यात आली आहे. संजय रंगनाथ लुटे व राहुल पंढरीनाथ पोटे असे आरोपी टपरी चालकांचे नाव आहे. दोघेही शाळेत विद्यार्थी जाण्या येण्याच्या मार्गावर तंबाखू विक्री करत होते. त्यांच्या ताब्यातून प्रत्येकी २५० रुपये किंमतीची तंबाखू जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणी पोलिस अंमलदार चंद्रकांत बावचे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दोन्ही आरोपी विरूद्ध विरगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### रक्तदान शिबिराचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्ताने देवगिरी महाविद्यालयात येत्या, २२ जुलै रोजी सकाळी नऊ ते दुपारी चार या वेळेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिराचे उद्घाटन मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. रक्तदान शिबिरात दात्यांनी सहभागी होऊन रक्तदान करावे असे आवाहन, देवगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवी पाटील, उपप्राचार्य डॉ. गणेश मोहिते, उपप्राचार्य डॉ. अपर्णा तावरे, कुलसचिव डॉ. दर्शना गांधी, आदींनी केले आहे.

---

नाथसागराच्या पाणलोट क्षेत्रात पावसाची दडी; दीड महिन्यात तीन टक्के पाण्याची आवक

# मराठवाड्यावर 'पाणीटंचाईचे संकट' : जायकवाडीत ३१.२४ टक्के जलसाठा

पैठण / प्रतिनिधी



मराठवाड्याची जीवनवाहिनी असलेल्या नाथसागर (जायकवाडी) जलाशयाच्या पाणलोट क्षेत्रात यंदा पावसाने मोठी दडी मारली आहे. पावसाळ्याचा दीड महिना उलटूनही जलाशयात केवळ ३ टक्के पाण्याची आवक झाली असून, मराठवाड्याच्या पिण्याच्या पाण्यासह शेती आणि सिंचनाची चिंता वाढली असून मराठवाड्याच्या पाणी टंचाईचे संकट घोंगावत आहे.

सह्याद्री डोंगररांगा परिसरासह गोदावरी खोऱ्यात अपेक्षित पाऊस न झाल्याने नाथसागरमध्ये येणाऱ्या पाण्याचा प्रवाह मंदावला आहे. परिणामी जलाशयातील पाणीसाठ्यात अपेक्षित वाढ झालेली नाही. तसेच पैठण तालुक्यातील लहान मोठे तलाव अद्यापही कोरडे ठणठणीत आहेत. यंदाच्या पावसाच्या कमतरतेचे चित्र जलाशयातील पाणीसाठ्यावरही स्पष्टपणे दिसून येत आहे. १९ जुलै २०२५ रोजी नाथसागर जलाशयात ७७.६१ टक्के पाणीसाठा होता. मात्र, सोमवार, २० जुलै रोजी हा जलसाठा केवळ ३१.२४ टक्क्यांवर आला आहे. पैठण तालुक्यात फक्त ७३ मिमी पाऊस पडला आहे.अवघ्या एका वर्षात पाणीसाठ्यात झालेली ही मोठी घट मराठवाड्यासाठी चिंतेचा विषय ठरली आहे. पावसाने दीर्घकाळ दडी मारल्याने पैठण तालुक्यातील खरीप पिके करपू लागली आहेत. सुरुवातीच्या पावसावर शेतकऱ्यांनी केलेल्या पेरण्या आता ओलाव्याअभावी संकटात सापडल्या आहेत. अनेक ठिकाणी उगवलेली पिके वाळू लागली असून शेतकऱ्यांसमोर दुबार पेरणीचे मोठे संकट उभे ठाकले आहे.

दरम्यान, अतिरिक्त खर्च, बियाण्यांची उपलब्धता आणि पावसाची अनिश्चितता यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. तसेच नाथसागर जलाशयावर संपूर्ण मराठवाड्याचे पिण्याचे पाणी, सिंचन आणि औद्योगिक वापर अवलंबून असल्याने प्रशासनाचीही चिंता वाढली आहे. आगामी काही दिवसांत नाथसागराच्या पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस झाला नाही, तर पिण्याच्या पाण्याबरोबरच खरीप आणि रब्बी हंगामावरही गंभीर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांसह सर्वांचे लक्ष पावसाच्या पुनरागमनाकडे लागले आहे.

#### वरच्या धरणातून आवक मंदावली

जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात नाशिक, अहिल्यानगर जिल्ह्यात झालेल्या जोरदार पावसामुळे जायकवाडी धरणात पाण्याची आवक काही प्रमाणात वाढली होती. परंतु गेल्या दहा ते बारा दिवसापासून पावसाने दडी मारल्याने वरच्या धरणातून होणाऱ्या पाण्याची आवक मंदावली असल्याची माहिती जायकवाडी धरणाचे कार्यकारी अभियंता प्रशांत संत यांनी दिली आहे.

---

## बहरलेली पिके सुकायला लागल्याने शेतकरी हवालदिल

पिंपळगाव रेणुकाई / प्रतिनिधी



मागील आठ ते दहा दिवसांपासून भोकरदन तालुक्यात पावसाने दडी मारली आहे. सोयाबीनसह मूग, उडीद, तूर आणि कापूस पिकांना सध्या ओलाव्याचा अभाव जाणवत असून, अनेक ठिकाणी पिके कोमेजत आहेत. पावसाच्या भरवशावर खरीप हंगामाची लागवड करणाऱ्या कोरडवाहू शेतकऱ्यांपुढे आता संकट उभे ठाकले आहे. माळरानावरील, तसेच हलक्या प्रतीच्या जमिनींमध्ये ओलावा कमी झाल्याने सोयाबीनची पाने सुकू लागली असून, रोपांनी अक्षरशः माना टाकल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

सकाळ-संध्याकाळ शेतात फेरी मारणाऱ्या शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर चिंतेच्या रेषा अधिक गडद होत आहेत. विहीर, बोअरवेल किंवा इतर सिंचनाची सुविधा उपलब्ध असलेले शेतकरी पीक वाचविण्यासाठी स्प्रिंकलरच्या सहाय्याने सिंचन करत आहेत. मात्र कोरडवाहू शेतकऱ्यांकडे कोणताही पर्याय नसल्याने त्यांची नजर केवळ आकाशाकडे लागली आहे. पुढील काही दिवसांत पाऊस झाला नाही, तर पिकांची वाढ खुंटण्याबरोबरच उत्पादनावरही गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. गेल्या आठवड्याभरापासून पावसाने दडी मारल्याने शेतकरी चिंतेत आहेत.

आगामी दिवसात पाऊस न झाल्यास उत्पादन घटण्याची भीती पिंपळगाव रेणुकाई येथील शेतकरी विजय देशमुख, जळगाव सपकाळ येथील शेतकरी गोकुळ पाटील सपकाळ, सावंगी (आवघडराव) येथील शेतकरी विठ्ठल जंजाळ, अरुण सोनुने आदींनी व्यक्त केली आहे. तसेच शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट आले असल्याचे त्यांनी सांगितले.

---

## पैठण येथील संतपीठ पूर्ण क्षमतेने सुरु करण्याची मागणी

पैठण / प्रतिनिधी



येथे उभारण्यात येणाऱ्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संतपीठाच्या उभारणीसाठी चाळीस वर्षांहून अधिक काळ लोटल्यानंतर अखेर २०२१ पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अधिपत्याखाली संतपीठाचा प्राथमिक अभ्यासक्रम टप्प्याटप्प्याने सुरू झाली आहे.

महायुती सरकारचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार विलास भुमरे, आमदार श्रीकांत भारतीय, आमदार अंबादास दानवे आदी लोकप्रतिनिधींनी लक्ष घातल्यामुळे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ प्रशासनाने सहकार्याची भूमिका घेतल्यामुळे संतपीठाचे अभ्यासक्रम सुरू झाल्याबद्दल वारकरी संप्रदायाने समाधान व्यक्त केले आहे.

पैठण येथील सर्व सुविधा असलेल्या जागेवर संतपीठाच्या आवश्यक तेवढ्या इमारती ही लवकरात लवकर उभ्या कराव्यात तसेच संतपीठ पूर्ण क्षमतेने सुरु होण्यासाठी उच्च शिक्षण विभागाने तातडीने आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी आषाढी महोत्सवानिमित्त सामाजिक कार्यकर्ते विष्णू ढवळे, दिनेश पारीख, रमेश लिंबोरे, अंबादास ढवळे, रमेश शेळके, महेश जोशी, दिलीप पोहेकर, राहुल पगारे, प्रसाद खिस्ती, रमेश पाठक, रमेश खांडेकर, कमलेश देशपांडे, शिवाजी तुपे, विलास मोरे, लक्ष्मण चौरे आदींनी केली आहे.

---

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

**जालना:** रोहणवाडी येथील डॉ. सुभाषराव ढाकणे महाविद्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त शनिवार, १८ जुलै रोजी अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रशासकीय अधिकारी प्रा. शरद कवानकर यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी प्रा. विठ्ठल मैंद, डॉ. पवन खरात, प्रा. सुभाष बोर्डे, प्रा. संदेश तुपे, प्रा. गजानन काकडे, यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

---

## मेणबत्तीऐवजी दिवा लावून वाढदिवस साजरा करा : महेशगिरी महाराज

जाफ्राबाद / प्रतिनिधी



वाढदिवस साजरा करताना आपल्या मुलांचे औक्षण करून मेणबत्त्या विझवण्याऐवजी दिवा लावून साजरा करावा. मुलांचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी मेणबत्ती विझवण्याची पद्धत बंद करणे आवश्यक आहे, असे विवेचन महेशगिरी महाराज यांनी केले आहे.

जाफ्राबाद तालुक्यातील गोंधनखेडा येथील गौरीशंकर महादेव मंदिर परिसरात प.पू. महेशगिरी महाराज यांचे प्रवचन व महाप्रसादाचा कार्यक्रम नुकताच आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी बोलताना महाराजांनी पालकांनी आपल्या मुलांवर योग्य संस्कार कसे करावेत, त्यांचे भविष्य उज्ज्वल कसे घडवावे याबाबत मार्गदर्शन केले. आपल्या संस्कृतीत दिवा लावणे हे शुभतेचे आणि सकारात्मक ऊर्जेचे प्रतीक आहे. त्यामुळे वाढदिवसासारख्या आनंदाच्या क्षणी दिवा लावून साजरा करणे अधिक योग्य आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.

---

## टेंभुर्णी येथे जगन्नाथ रथयात्रा महोत्सव उत्साहात

टेंभुर्णी / प्रतिनिधी



येथील इस्कॉन सेंटरच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री जगन्नाथ रथयात्रा महोत्सव गुरुवार, १६ जुलै रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. हरे कृष्ण, हरे रामा च्या जयघोषाने आणि टाळ-मृदंगाच्या गजराने टेंभुर्णी शहर दुमदुमून गेले होते. या रथयात्रेमध्ये परिसरातील भाविकांनी सहभागी होऊन भगवान जगन्नाथाचे दर्शन घेतले.

श्री जगन्नाथ रथाची आकर्षक सजावट करण्यात आली होती. रथात भगवान जगन्नाथ, बलदेव आणि सुभद्रा माता यांच्या मूर्ती विराजमान होत्या. महोत्सवाच्या सुरुवातीला इस्कॉनच्या मुख्य पुजाऱ्यांच्या हस्ते महाआरती आणि विधीवत पूजा करण्यात आली. त्यानंतर परंपरेनुसार रथाच्या मार्गावर सोन्याच्या झाडूने रस्ता स्वच्छ करून रथयात्रेला सुरुवात झाली. शहराच्या मध्यवर्ती भागातून निघालेली रथयात्रा शहरातील प्रमुख मार्गावरून फिरवण्यात आली. रथयात्रेच्या मार्गावर ठिकठिकाणी स्थानिक नागरिकांनी आणि विविध मंडळांनी रांगोळ्या काढून आणि पुष्पवृष्टी करून रथाचे स्वागत केले. मिरवणुकीत भक्तांनी केलेले पारंपारिक नृत्य आणि कीर्तन सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. रथयात्रेच्या समारोपानंतर इस्कॉन सेंटरच्या वतीने भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

---

## बोगस जन्म प्रमाणपत्र प्रकरणी गुन्हा दाखल

**छत्रपती संभाजीनगर :** घाटीत जन्म झाल्याचे बनावट जन्म प्रमाणपत्र बनविल्या प्रकरणी एकावर बेगमपुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुनिल छबू भालेराव (३६ वर्ष), रा. मिसारवाडी असे आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी घाटीचे डॉ. गणेश श्रीहरी लोखंडे, रा. नंदनवन कॉलनी यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार आरोपीने २ मार्च २०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील सेतू सुविधा केंद्रात मुलीच्या जन्माचे बोगस प्रमाणपत्र दाखल करून शासनाची फसवणूक केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

---

## नगरसेविकेचे मंगळसूत्र हिसकावले

सिल्लोड / प्रतिनिधी

शहरात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून, आता थेट लोकप्रतिनिधीही सुरक्षित राहिलेल्या नाहीत. शुक्रवार, १७ जुलै रोजी सायंकाळी पावणेआठ वाजेच्या सुमारास महाराणा प्रताप नगर भागात दुचाकीवरून आलेल्या दोन चोरट्यांनी शिवसेना (शिंदे गट) नगरसेविका सविता मनोज झंवर यांच्या गळ्यातील १ लाख ३० हजार रुपये किमतीचे साडेतीन तोळ्यांचे मंगळसूत्र हिसकावून पोबारा केला. सविता झंवर या आपल्या मैत्रिणीसोबत जात असताना हा प्रकार घडला. सविता झंवर यांच्या फिर्यादीवरून सिल्लोड शहर पोलिस ठाण्यात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक शामसुंदर कौठाळे पुढील तपास करत आहेत. शहरात मागील पंधरा ते वीस दिवसांत सलग ७ ते ८ घरफोडीच्या घटना घडल्या आहेत. तीन दिवसांपूर्वीच शिवसेना तालुकाप्रमुख केशवराव तायडे यांच्या घरीही चोरी झाली होती. या सलगच्या चोऱ्यांमुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, चोरट्यांनी पोलिसांना एकप्रकारे खुले आव्हान दिले आहे. या वाढत्या चोरीच्या आणि लुटमारीच्या घटनामुळे सिल्लोड शहरातील नागरिकांमध्ये भीतीचे व संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

---

## जि.प. शाळेच्या रस्त्याची शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्षांनी केली दुरुस्ती

वालसावंगी / प्रतिनिधी



भोकरदन तालुक्यातील वालसावंगी येथील जिल्हा परिषद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या रस्त्यावर पाऊस पडल्यामुळे चिखल झाला होता. शाळेत विद्यार्थ्यांना चिखल तुडवतच जावे लागत होते. चिखलामुळे विद्यार्थ्यांचे हाल होत असल्याचे लक्षात आल्यावर शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष समाधान खडके यांनी स्वःखर्चातून शाळेकडे जाणाऱ्या रस्त्यावर दगड व माती टाकून रस्ता दुरुस्त केला.

भोकरदन तालुक्यातील वालसावंगी येथे जिल्हा परिषदेची माध्यमिक शाळा असल्याने या शाळेत इयत्ता पाचवीपासून बारावीपर्यंतचे विद्यार्थी शिक्षण घेतात. परंतु शाळेकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरुस्ती न झाल्याने रस्त्यावर काही दिवसापूर्वी झालेल्या पावसामुळे चिखल झाला होता. तसेच रस्त्याच्या कडेला घरगुती वापराचे नागरिक कचरा आणून टाकत असल्याने विद्यार्थ्यांना दुर्गंधीचा त्रास सहन करत चिखलातून वाट काढावी लागत होती. दुर्गंधीमुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले होते. दरम्यान, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष समाधान खडके यांनी स्वःखर्चातून शाळेकडे जाणाऱ्या रस्त्यावर दगड, माती आणि मुरुम टाकून रस्त्याची दुरुस्ती केली. जिल्हा परिषद शाळेकडे जाणारा रस्ता सिमेंट कॉंक्रिटचा करण्यात यावा अशी मागणी समाधान खडके यांनी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारीया यांच्यासह संबंधित विभागातील अधिकाऱ्यांकडे केली आहे.

---

## गजानन नगरात घरफोडी

**छत्रपती संभाजीनगर :** बंद घराचे लॉक तोडून चोरट्यांनी ७६ हजार रुपयांचे दागिने लंपास केले. याप्रकरणी पुंडलिकनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महेश सुरेश सदावर्ते, रा. गजाननगर, गारखेडा परिसर यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार १९ जुलै रोजी दुपारी दीड वाजेच्या सुमारास चोरट्यांनी घराचे लॉक तोडून आत प्रवेश केला. कपाटातील ५० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मिनी गंठण, २५ हजार रुपये किंमतीचे कानातील रिंग, १ हजार रुपये रोख असा ७६ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला.

---

## पंचायत समिती सदस्यांनी दत्तक घेतली २७ बालके

सिल्लोड / प्रतिनिधी



तालुक्यातील बाल विकास प्रकल्प-२ अंतर्गत कुपोषणमुक्तीसाठी एक कौतुकास्पद पाऊल उचलण्यात आले आहे. तालुक्यात आढळलेल्या २७ तीव्र कुपोषित बालकांना कुपोषणाच्या चक्रातून बाहेर काढण्यासाठी पंचायत समिती सदस्यांनी दत्तक घेतले आहे. गेल्या वर्षी तालुक्यातील अंगणवाड्यांमधील १२ हजार बालकांची तपासणी केली असता, ५९ बालके तीव्र कुपोषित आढळली होती.

एकात्मिक बाल विकास योजना आणि बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्या अथक प्रयत्नांमुळे ही संख्या लक्षणीयरीत्या घटली. आता उर्वरित २७ बालकांना पूर्णपणे सुदृढ करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., बाल विकास प्रकल्प अधिकारी शिवाजी वने आणि जिल्हा कार्यक्रम अधिकारी डॉ. मंगल पांचाळ यांच्या संकल्पनेतून हा दत्तक उपक्रम राबविण्यात आला. लोकप्रतिनिधींच्या या थेट सहभागामुळे सिल्लोड लवकरच कुपोषणमुक्त होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. सिल्लोड पंचायत समितीच्या सदस्यांनी २७ कुपोषित बालकांना दत्तक घेतल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

---

## वाळू वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर पकडले; गुन्हा दाखल

वैजापूर / प्रतिनिधी

येथील शिवना नदीपात्रातून अवैधरित्या वाळूची वाहतूक करणाऱ्या दोन ट्रॅक्टरांवर वैजापूर पोलिसांनी शुक्रवार, १७ जुलै रोजी लासूरगाव शिवारात कारवाई करून सुमारे १४ लाख १६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी गणेश जाधव व विक्रम साळुंके (दोघे, रा. लासूरगाव) यांच्याविरुद्ध वैजापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिवना नदीपात्रातून दोन ट्रॅक्टरद्वारे अवैध वाळूची वाहतूक सुरू असल्याची माहिती मिळाली होती. शुक्रवारी दुपारी सुमारे ३ वाजेच्या सुमारास वाळूने भरलेले दोन ट्रॅक्टर अडवून त्यांची तपासणी करण्यात आली. चौकशीदरम्यान चालकांनी आपली नावे योगेश जाधव व विक्रम साळुंके अशी सांगितली. त्यांनी शिवना नदीपात्रातून वाळू भरून घेऊन वैजापूरच्या दिशेने जात असल्याचे पोलिसांना सांगितले. यावेळी पोलिसांनी रॉयल्टी व इतर वैध कागदपत्रांची मागणी केली असता चालकांना कोणतेही कागदपत्र सादर करता आले नाही. पोलिसांनी वाळूची अवैधरित्या वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर आणि त्यातील वाळू साठा असा एकूण १४ लाख १६ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी दोन्ही आरोपी ट्रॅक्टरचालकांविरुद्ध वैजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

पावसाअभावी धावडा परिसरातील पिके संकटात; शेतकऱ्यांचे डोळे आकाशाकडे

# पावसाची दडी : खरीप हंगामातील पिकांवर तुषार सिंचनाद्वारे पाणी

हरिदास गवळी

**वालसावंगी :** भोकरदन तालुक्यातील धावडा व परिसरात गेल्या महिनाभरापासून पावसाने उघडीप दिल्यामुळे मका, सोयाबीन, मिरची, कपाशी आदी पिके उन्हाच्या चटक्यामुळे करपत आहे. तसेच त्याची वाढ खुटत असल्याने शेतकऱ्यांनी विहिरीत साठलेल्या थोडाफार मुबलक पाणी साठ्यावर खरीप हंगामातील पिकावर तुषार सिंचनाच्या आधारे पाण्याची फवारणी करीत आहेत. पावसाअभावी खरीप हंगामातील पिके पूर्णपणे संकटात येत असल्याचे चित्र भोकरदन तालुका व परिसरात दिसून येत आहे.

पावसाळ्याचा जून महिना पूर्णपणे कोरडा केल्याने शेतकऱ्यांपुढे मोठे संकट उभे राहिले आहे.त्यातच आता सध्या जुलै संपत असल्याने पावसाळ्याचा दीड महिना पूर्णपणे शेतकऱ्याच्या हातातून गेला असताना सुद्धा शेतकरी खरीप हंगामातील पिके जमिनीपासून अद्यापही उगम शक्तीनुसार उगलेली नाही. अनेक शेतकऱ्यांना दुबार पेरणी करून खरीप हंगामातील पिकांची काळजी घेऊन उगवावी लागली. त्यातच गेल्या वर्षी पेक्षा पावसाने उशिरा आगमन केल्याने खरीप हंगामातील पिके धोक्यात आली आहे. त्यातच नदी, नाले, तलाव, विहिरी अद्यापही कोरडे आहे. विहिरींनी पूर्णपणे तळ गाठला असल्याने अनेक शेतकऱ्यांना विकतचे पाणी टाकून टँकरव्दारे मिरची जगवावी लागली. त्यातच मिरची पिकावर कोकडा रोगाचा प्रादुर्भाव पडल्याने अनेक शेतकऱ्यांना मिरचीवर महागडी औषधी फवारणी करावी लागली. त्यातच रोगाचे थैमान न थांबल्याने अक्षरशः मिरचीचे पीक शेतकरी उपटून फेकत आहेत.



मात्र सावकारी व्याजाने खरीप हंगामाच्या पेरणीसाठी शेतकऱ्यांनी काढलेले व्याजाने पैसे कसे भरावे हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे. जर दोन ते तीन दिवसात पाऊस न झाल्यास धावडा वालसावंगी, पारध, पिंपळगाव रेणुकाई, अन्वा जळगाव सपकाळ आदी परिसरात शेतकऱ्यांना दुबार पेरणी करण्याची वेळ येणार असल्याचे चित्र भोकरदन तालुक्यातील विविध गावात दिसून येत आहे.

#### पिके जगविण्याची धडपड

धावडा परिसरात सुरुवातीपासून जोरदार पाऊस न पडल्याने खरीप हंगामातील पिके पूर्णपणे करपत आहे. तसेच पिकांची वाढ खुटत आहे. सुरुवातीपासूनच अनेक ठिकाणी दुबार पेरणी करावी लागली. मात्र पावसाने उघडीप दिल्याने मोठे संकट ठाकले आहे. जर दोन ते तीन दिवसात पाऊस न आल्यास खरीप हंगामातील पेरणी पूर्णपणे धोक्यात येणार आहे. त्यामुळे थोड्याफार पिकावर तुषार सिंचन द्वारे पाणी देऊन पिके जगविण्याचा प्रयत्न करीत असल्याचे धावडा येथील शेतकरी सोमनाथ घोडकी यांनी सांगितले.

## न्यूज ब्रीफ

### विजेच्या धक्क्याने युवकाचा मृत्यू

**अमरावती :** दर्यापूर तालुक्यातील हुसेनपूर (कान्होली) शेत शिवारात विजेचा धक्का लागून एका ३० वर्षीय युवकाचा मृत्यू झाला. ही घटना रविवारी सकाळी सात वाजताच्या सुमारास घडली. जीवन नारायण डवंगे असे मृत युवकाचे नाव आहे. जीवन डवंगे नेहमीप्रमाणे सकाळी शेतात गेला होता. या परिसरात वन्य प्राण्यांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात असल्याने शेताचे रक्षण करणे शेतकऱ्यांसाठी एक मोठे आव्हान बनले आहे. याच प्रयत्नात असताना जीवनला विजेचा धक्का बसला आणि त्यात त्याचा दुर्दैवी अंत झाला.मृत जीवन डवंगे अविवाहित होता. त्याच्या पश्चात आई, वडील आणि दोन बहिणी असा परिवार आहे. या घटनेमुळे डवंगे कुटुंबावर मोठा आघात झाला आहे.

### अविश्वास ठरावासाठी बैठक

**अमरावती :** दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील गावंडे यांच्यावर अविश्वास ठराव आणण्याची तयारी सुरू झाली आहे. १८ पैकी १२ संचालकांनी त्यांच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त करत जिल्हाधिकाऱ्यांकडे अविश्वास ठरावासाठी बैठक घेण्याची मागणी करणारे पत्र दिले. शुक्रवारी सायंकाळी डीपीसीची बैठक संपल्यानंतर हे पत्र सादर करण्यात आले. यामुळे दर्यापूरच्या राजकीय वर्तुळात सध्या वेगवान हालचाली सुरू आहेत.बाजार समितीची सार्वत्रिक निवडणूक मे २०२३ मध्ये पार पडली होती. विद्यमान सभापती सुनील गावंडे हे संचालकांना विश्वासात न घेता कामकाज करत असल्याचा आरोप या १२ संचालकांनी केला. त्यांच्या कार्यपद्धतीमुळे नाराजी वाढल्याने अविश्वास ठराव आणण्याचा निर्णय घेण्यात आला.

### कार अपघातात वकील जखमी

**डोणगाव :** मेहकर ते डोणगाव मार्गावर हिवरा साबळे फाट्याजवळ आयशर टेम्पोने समोरून येणाऱ्या कारला जोरदार धडक दिल्यामुळे झालेल्या भीषण अपघातात कारचालक वयोवृद्ध वकील जखमी झाले. अपघातात कारचे सुमारे ४ ते ५ लाख रुपयांचे नुकसान झाले. ही घटना १८ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता घडली. मिळालेल्या माहितीनुसार, सुरेशराव काशीनाथ वानखेडे (वय ७५ वर्षे, रा. शिवाजी नगर, ता. मेहकर ) हे कारने बेलगाव येथे जात होते. दरम्यान, हिवरा साबळे फाट्यावरून मेहकर च्या दिशेने भरधाव वेगाने जाणाऱ्या आयशर कंपनीच्या वाहनाने कारला समोरून जोरदार धडक दिली. या अपघातात सुरेशराव वानखेडे यांच्या छातीला मार बसला. याप्रकरणी वानखेडे यांनी दिलेल्या तोंडी रिपोर्टवरून डोणगाव पोलीस ठाण्यात आयशर चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवला.

राज्य मराठी विकास संस्थेच्या नियामक मंडळाच्या बैठकीत सूचना

# नाट्यपरंपरेच्या जतनासाठी गडचिरोलीत नाट्य संकुल गरजेचे

**गडचिरोली / वृत्तसंस्था**




पुस्तकांचे गाव आणि पेटी वाचनालय उपक्रमांचा विस्तार करून आदिवासी व सीमावर्ती भागातील मराठी शाळांपर्यंत दर्जेदार साहित्य पोहोचविणे आवश्यक आहे. भारुड, गोंधळ, पोवाडा यांसारख्या लोककलांच्या माध्यमातून मराठीचा वारसा जपला गेला पाहिजे. झाडीबोली आणि पूर्व विदर्भातील नाट्यपरंपरेच्या जतनासाठी गडचिरोली-वडसा परिसरात नाट्य संकुल उभारणे गरजेचे आहे, आदी सूचना राज्य मराठी विकास संस्थेच्या नियामक मंडळाच्या सदस्यांनी मांडल्या.

सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मराठी विकास संस्थेच्या नियामक मंडळाची बैठक झाली. या बैठकीत सदस्यांनी मराठी भाषा आणि विविध बोलींच्या संवर्धनासाठी अनेक महत्त्वपूर्ण सूचना मांडल्या. या सर्व सूचनांचा सकारात्मकतेने विचार करण्यात येणार असल्याची मुख्यमंत्र्यांनी ग्वाही दिली. यावेळी मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत, मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी, राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. श्यामकांत देवरे, साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ.सदानंद मोरे, भाषा संचालक अरुण गीते बैठकीस उपस्थित होते. फडणवीस म्हणाले की, संस्थेचा गेल्या काही वर्षांचा प्रशासकीय व वैधानिक अनुशेष पूर्ण झाल्याने संस्थेची प्रशासकीय रचना अधिक सक्षम झाली आहे. आता मराठी भाषेचा प्रचार, प्रसार, संशोधन आणि संवर्धन यासाठी ठोस धोरणे राबविण्यावर भर देणे आवश्यक आहे. संस्थेच्या कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्नही सकारात्मक भूमिकेतून सोडविण्यात येतील. मंत्री सामंत यांनी सांगितले की, मराठी भाषेचा जागतिक स्तरावर प्रसार करण्यासाठी ७५ आंतरराष्ट्रीय बृहन्महाराष्ट्र मंच उभारण्याची प्रक्रिया सुरू आहे. जवाहरलाल नेहरू विद्यापीठात कुसुमाग्रज यांच्या नावाने अध्यासन केंद्र; तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्यावर पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. विविध भारतीय आणि जागतिक भाषांतील दर्जेदार साहित्य मराठीत उपलब्ध करून देण्यासाठी यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने 'अनुवाद समिती' स्थापन करण्याचाही निर्णय घेण्यात आला.

### जागतिक मराठी केंद्राच्या कामाबाबत चर्चा

मराठी भाषा, साहित्य आणि बोलींच्या जतन आणि संवर्धनासाठी प्रभावी कृती आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करावी. राज्य मराठी विकास संस्थेच्या कामकाजात सातत्य, पारदर्शकता आणि परिणामकारकता यावी यासाठी वर्षभरातील सर्व वैधानिक बैठकींचे वेळापत्रक आगाऊ निश्चित करावे, असे निर्देश मुख्यमंत्री यांनी दिले.तंजावर येथील मोडी लिपीतील सुमारे १५ लाख ऐतिहासिक कागदपत्रांच्या डिजिटायझेशन प्रकल्पाच्या प्रगतीचा मुख्यमंत्री फडणवीस यांनी आढावा घेतला. लंडन येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने उभारण्यात येणाऱ्या जागतिक मराठी केंद्राच्या कामालाही गती देण्याबाबत यावेळी चर्चा झाली.

## पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांना सुवर्णपदक

**रिसोड / प्रतिनिधी**



यवतमाळ येथे आयोजित करण्यात आलेल्या पोलीस कर्तव्य मेळावा२०२६ मध्ये अमरावती परिक्षेत्रातून वाशीम जिल्हा पोलीस दलाने उल्लेखनीय कामगिरी करत उपविजेतेपद पटकावले. 'क्राईम इन्व्हेस्टिगेशन, फौजदारी कायदे, नियम, कार्यपद्धती व न्यायालयीन निर्णय' या विषयावरील लेखी स्पर्धेत पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांनी उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक मिळवले.

पोलीस निरीक्षक तथा वाशीम जिल्हा संघप्रमुख व समन्वय अधिकारी रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली जिल्ह्याच्या पथकाने विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत एकूण १८ पदकांची कमाई केली.या स्पर्धेत वाशीम जिल्ह्याने ६ सुवर्ण, ८ रौप्य आणि ४ कांस्य अशी एकूण १८ पदके मिळवून अमरावती परिक्षेत्रात आपला ठसा उमटविला. तसेच वाशीम जिल्ह्यातील आणखी १७ पोलीस अधिकारी व अंमलदारांनी विविध स्पर्धांमध्ये पदके मिळवून जिल्ह्याच्या यशात मोलाचे योगदान दिले.

## मोठ्या भावाने शेतीवर ताबा केल्याची तक्रार

**चिखली / प्रतिनिधी**

तालुक्यातील काटोडा येथील सतीश धोंडगे यांनी गट क्रमांक ८ मधील त्यांच्या भाऊ शेतकरी रविंद्र वसंत धोंडगे यांच्या शेतजमिनीवर ताबा केल्याची तक्रार रविंद्र धोंडगे यांनी केली आहे.

काटोडा शिवारामधील रवींद्र धोंडगे यांच्या मालकी हक्काच्या संपूर्ण शेतजमिनीवर सतीश धोंडगे यांनी मोबाईलद्वारे मोजणी करून, दमदाटी व धारदार शस्त्रांची भीती दाखवून ताबा मिळविला.

त्या जमिनीत पेरणी केली आहे. तसेच, सतीश धोंडगे यांनी कोणतीही अधिकृत मोजणी व पूर्वकल्पना न देता हा ताबा केला आहे. या वादावर तोडगा काढण्यासाठी गावातील प्रतिष्ठित ग्रामस्थांच्या सल्ल्यानुसार सतीश धोंडगे यांनी सुरुवातीला खाजगी मोजणीस होकार दिला. त्यानुसार रविंद्र धोंडगे यांनी मोजणी अधिकाऱ्यांची फी भरून मोजणीची व्यवस्था केली. मोजणीची तारीख दोन दिवस आधी कळविण्यात आली होती.

मात्र, अधिकारी मोजणीसाठी आल्यानंतर राजू धोंडगे यांनी मोजणी करण्यास नकार दिला, त्यामुळे मोजणी होऊ शकली नाही. तसेच सतीश धोंडगे मोजणीवेळी उपस्थित राहिले नाहीत, असे त्यांनी सांगितले. या प्रकरणी तहसीलदार यांच्याकडे तक्रार अर्ज देऊनही अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याचे त्यांनी सांगितले. सदर जमीन त्यांच्या आजोबांनी बक्षीसपत्राद्वारे दिलेली असून तिची ई-पीक पाहणी, पीक विमा व शेतीची मशागत तेच करतात. मात्र, जमिनीवर ताबा झाल्यामुळे पेरणीची वेळ निघून गेली असून त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आल्याचे त्यांनी म्हटले आहे. प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन चौकशी करून न्याय द्यावा, अशी मागणी शेतकरी रवींद्र धोंडगे यांनी केली आहे.

## तरुणावर बेळीने हल्ला; गुन्हा दाखल

**अंढेरा / प्रतिनिधी**

चिखली तालुक्यातील कवठळ येथे घराजवळ टाकलेल्या काड्या काढण्याच्या कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर मारहाणीत झाले. या घटनेत एका तरुणाच्या डोक्यावर व हातावर बेळीने वार करून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी अंढेरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी भगत पंजाबराव साबळे (वय २७, रा. कवठळ, ता. चिखली) हे २० जुलै रोजी सकाळी शेतात जात होते. घराजवळ टाकलेल्या काड्या काढून घेण्यास त्यांनी आरोपी भारत मधुकर साबळे (रा. कवठळ) याला सांगितले. याच कारणावरून आरोपी संतापला.

## दुहेरी हत्याकांडाने वलगाव परिसर हादरला

**अमरावती / प्रतिनिधी**

जिल्ह्यातील वलगाव येथे मध्यरात्री एका भीषण दुहेरी हत्याकांडाने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. वलगाव बसस्थानक परिसरात अज्ञात हल्लेखोरांनी दोन तरुणांची अत्यंत निर्घृणपणे हत्या केली . या घटनेमुळे शहरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून, पोलीस फरार आरोपींच्या मागावर आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संजोग जोशी (वय २४) आणि ऋतिक पंडित (वय २५) अशी या घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या दोन तरुणांची नावे आहेत. मध्यरात्रीच्या सुमारास हे दोघे वलगाव बसस्टँड परिसरात असताना अज्ञात आरोपींनी त्यांच्यावर अचानक जीवघेणा हल्ला चढवला. हा हल्ला इतका भयानक आणि क्रूर होता की, संजोग आणि ऋतिक या दोघांचाही जागीच मृत्यू झाला. ऐन तारुण्यात मुलांची अशाप्रकारे हत्या झाल्याने दोन्ही कुटुंबांवर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला आहे.या दुहेरी हत्याकांडामागे नेमके काय कारण आहे, हे अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही. हा हल्ला एखाद्या जुन्या वादातून झाला आहे, वैयक्तिक वैमनस्यातून झाला आहे, की यामागे आणखी काही मोठे कारण आहे? याचा उलगडा अद्याप झालेला नाही. घटनेची माहिती मिळताच वलगाव पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला आणि दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवून दिले.

### माजी सैनिकांसाठी विशेष गौरव पुरस्कार

**बुलढाणा :** राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या माजी सैनिक, त्यांच्या पत्नी व पाल्यांना सैनिक कल्याण विभागामार्फत विशेष गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह १० सप्टेंबरपर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात अर्ज सादर करावेत.

## राधेश्याम चांडक यांच्या हस्ते वृक्षारोपण

**मासरूळ / प्रतिनिधी**



बुलडाणा अर्बनचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक यांच्या हस्ते वरुड येथील पेनगंगा साखर कारखाना परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. पहिल्या टप्प्यात १,००१ वृक्षारोपण मोहिमेचा प्रारंभ झाला असून, भविष्यात संपूर्ण परिसर हिरवागार, प्रदूषणमुक्त आणि पर्यावरणपूरक करण्याचा संकल्प करण्यात आला.

राधेश्यामजी चांडक यांच्या पुढाकारातून समाजकारण, शिक्षण, सहकार, उद्योग, आरोग्य व पर्यावरण संवर्धन अशा विविध क्षेत्रांत देश पातळीवर मोलाचे योगदान देण्यात येत आहे. ग्रामीण भागात उद्योग उभे राहावेत, शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम, सुखी व संपन्न व्हावेत आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळून जिल्ह्यातील तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या व्यापक उद्देशाने त्यांनी पेनगंगा साखर कारखान्यास महत्त्वपूर्ण आर्थिक पाठबळ दिले, असे कारखान्याचे चेअरमन अनिल गुंजाळ यांनी सांगितले. शेतकरी, उद्योग आणि रोजगार यांचा समतोल साधत त्यांनी विकासाचा आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या विचारधारेचा वारसा जपत पेनगंगा साखर कारखाना हरित क्रांतीच्या दिशेने ठामपणे पाऊल टाकत आहे.

हरित पर्यावरण हीच भावी पिढ्यांसाठीची अमूल्य ठेव आहे. विकासाबरोबरच पर्यावरण संवर्धनाचा वसा जपत प्रत्येकाने वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनासाठी पुढाकार घेणे, हीच काळाची खरी

## जन्म-मृत्यूचे चार हजारांवर दाखले प्रलंबित

शैक्षणिक कामे खोळंबली; नागरिकांमध्ये संताप

**अमरावती / प्रतिनिधी**

शहरात दिवसाला जन्म-मृत्यूच्या दाखल्यांसाठी १५० अर्ज मनपा मुख्यालयात सादर केले जात असताना जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडून केवळ ७० दाखलेच एका दिवसात मंजूर होत आहेत. त्यामुळे गेल्या दोन महिन्यांपासून ४ हजारांवर दाखले प्रलंबित आहेत.दाखले मिळण्याच्या संथगतीमुळे विद्यार्थी, पालक, सर्वसामान्यांची शैक्षणिक व इतर आवश्यक कामे खोळंबली असून संताप व्यक्त केला जात आहे.

मनपा प्रशासन, पदाधिकाऱ्यांवर नागरिकांचा दबाव वाढला आहे. त्यांनी जास्तीत जास्त दाखल्यांना मंजुरी मिळावी यासाठी शासन, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा सुरू केला आहे. तरीही अद्याप यश आलेले नाही.दहावी, बारावीचे निकाल लागले आहेत. विद्यार्थ्यांसह पालक व सर्वसामान्यांना प्रवेश, विविध प्रमाणपत्रे तयार करून घेणे, शैक्षणिक तसेच इतर आवश्यक कामांसाठी जन्म-मृत्यूच्या दाखल्यांची आवश्यकता भासत आहे. ज्यांच्याकडे जन्म-मृत्यू प्रमाणपत्रे नाहीत, अशांची चांगलीच तारांबळ उडाली आहे. दाखले मिळवण्यासाठी मनपा मुख्यालयात दररोज मोठी गर्दी होत आहे. दिवसाला ८० दाखले प्रलंबित राहत असल्याची माहिती मिळाली. जन्म-मृत्यू दाखले मिळवण्यासाठी महानगरपालिकेत १५० अर्ज येतात. डीएचओंकडे एका दिवशी ७० दाखले मंजूर करण्याचीच आयडी आहे. महिनाभरात मनपाकडे ४ हजार ५०० अर्ज येतात. त्यापैकी २ हजार १०० दाखलेच मिळतात.

अर्थात दिवसाला ८०, म्हणजे महिन्याला २ हजार ४०० दाखले प्रलंबित राहतात. प्रलंबित दाखल्यांची संख्या ४ हजार ८०० वर पोहोचली आहे.२०१६ च्या आधी ज्यांचा जन्म झाला आहे, त्यांना जन्माचे प्रमाणपत्र मिळवण्यात अडचणी येत आहेत. काही उपाययोजना कराव्यात, म्हणून महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या नेतृत्वात उपमहापौर सचिन भेंडे, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, सभागृह नेते गावंडे, गटनेते डॉ. राजेंद्र तायडे, नगरसेवक ॲड. प्रशांत देशपांडे यांनी भेट घेतली.

### कार्यालयीन चौकशीत ताशेरे

बोगस जन्म-मृत्यू प्रमाणपत्र प्रकरणी चौकशीचे आदेश महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत महापौरांनी बोगस जन्म-मृत्यू प्रमाणपत्र देण्यासाठी जबाबदार असलेले मनपा वैद्यकीय आरोग्य अधिकारी तथा निबंधक तसेच आरोग्य अधिकारी तथा निबंधकांची विभागीय चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. कारण कार्यालयीन चौकशीत या दोघांवरही ताशेरे ओढण्यात आले आहेत.

## सुशीलाताई जाधव विद्यानिकेतनमध्ये पालक सभा

**वाशिम / प्रतिनिधी**




विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्यासाठी आणि पालकांशी संवाद साधण्यासाठी सुशीलाताई जाधव विद्यानिकेतन येथे १८ जुलै रोजी पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी पालक आणि शिक्षक यांच्यातील समन्वय महत्त्वाचा असल्याचे प्रतिपादन प्रमुख पाहुण्या नीता सुर्वे यांनी केले.

सभेच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती भाकरे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून नीता सुर्वे आणि धनंजय विखे उपस्थित होते.पालकांना मार्गदर्शन करताना नीता सुर्वे म्हणाल्या, आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणे पुरेसे नाही. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देणे, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे आणि शैक्षणिक गुणवत्ता सातत्याने वाढविणे आवश्यक आहे. सुशीलाताई जाधव विद्यानिकेतन ही शाळा प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देऊन त्याच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न करत असल्याचे त्यांनी सांगितले.या पालक सभेला पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. पालकांनी आपल्या पाल्यांच्या शैक्षणिक प्रगतीबाबत शिक्षकांशी सविस्तर चर्चा केली. तसेच शाळेचे व्यवस्थापन आणि शिक्षक विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी घेत असलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले.मुख्याध्यापिका ज्योती भाकरे यांनी शाळेच्या आगामी शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन रघुनाथ करवते यांनी केले, तर हिप्पी

## एनएमएमएस अर्ज प्रलंबित ठेवल्यास कारवाई

**वाशिम / प्रतिनिधी**

राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीच्या एनएमएमएस शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांचे फ्रेश व रिन्यूअल अर्ज भरण्याच्या प्रक्रियेत अनेक शाळांकडून अपेक्षित गती दिसून येत नसल्याची गंभीर दखल शिक्षण विभागाने घेतली आहे. पात्र विद्यार्थ्यांचा एकही अर्ज प्रलंबित राहू नये, यासाठी शिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे यांनी १७ जुलै रोजी सर्व मुख्याध्यापक व प्राचार्यांना कडक निर्देश देत हलगर्जीपणा झाल्यास शिस्तभंगात्मक कारवाईचा इशारा दिला आहे.

जिल्ह्यातील सर्व एनएमएमएस पात्र शाळांना याबाबत पत्र पाठविण्यात आले आहे. राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलवर फ्रेश व रिन्यूअल अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू असतानाही अनेक शाळांनी अर्जांची पडताळणी व ऑनलाइन सादरीकरण पूर्ण केले नसल्याचे निदर्शनास आले आहे. पात्र विद्यार्थ्यांचा अर्ज वेळेत न भरल्यामुळे एखादा विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक, प्राचार्य आणि वर्गशिक्षकांवर राहणार असल्याचे पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नसल्याचा इशाराही शिक्षणाधिकाऱ्यांनी दिला आहे. तांत्रिक अडचणी किंवा अन्य कारणे पुढे करून होणारा विलंब ग्राह्य धरला जाणार नाही. अंतिम मुदत संपल्यानंतर कोणत्याही अर्जाचा विचार केला जाणार नसल्याचे सांगण्यात आले.

'महाराष्ट्र दर्शन' सहलीतून अनुभवले भावविश्व

# शेगाव संस्थानातील सेवाभावाने भारावले आत्मसमर्पित नक्षलवादी

**नागपूर / वृत्तसंस्था**



अनेक दशके घनदाट जंगलात घालवल्यानंतर ऑक्टोबर २०२५ मध्ये आत्मसमर्पण केलेल्या ६१ नक्षलवाद्यांसाठी आयोजित करण्यात आलेली 'महाराष्ट्र दर्शन' सहल त्यांच्या आयुष्याला नवी दिशा देणारी ठरली. शेगाव संस्थानातील अलौकिक स्वच्छता, चोख शिस्त आणि भक्तिपूर्ण वातावरण पाहून या माजी नक्षलवाद्यांच्या मनात अत्यंत आपुलकी आणि श्रद्धाभाव दाटून आला. तिथली स्वच्छता पाहून सर्वजण मनापासून भारावून गेले.

आत्मसमर्पित नक्षलवादी यांच्यासाठी शासनाने 'महाराष्ट्र दर्शन' सहल आयोजित केली होती. यावेळी त्यांना विविध गोष्टी अनुभवायला मिळाल्या.विशेष म्हणजे, यातील ५५ आत्मसमर्पित नक्षलवाद्यांनी आयुष्यात पहिल्यांदाच बाहेरील जगात पाऊल ठेवले होते. ज्यांनी आतापर्यंत रेल्वे फक्त बोर्डवरील चित्रांमध्ये पाहिली होती, त्यांनी बल्लारशा स्थानकावर जेव्हा प्रत्यक्ष 'गंगा कावेरी एक्सप्रेस' धावताना पाहिली, तेव्हा त्यांचे डोळे आश्चर्याने दीपून गेले. सीपीआय (माओवादी) केंद्रीय समितीचा ज्येष्ठ माजी नेता मल्लोजुला वेणुगोपाल राव उर्फ अभय, भूपती यांच्यासह मुख्य प्रवाहात आलेल्या या नक्षलवाद्यांच्या प्रवासादरम्यान सुरक्षेसह सर्वांच्या खाण्यापिण्याची उत्तम सोय करण्यात आली होती. सुरक्षा रक्षकांसह १०९ लोकांच्या ताफ्यासाठी दोन प्रवासी व्हॅन आणि एक विशेष किचन व्हॅन सोबत होती.

नक्षलवादाची हिंसक वाट सोडून मुख्य प्रवाहात आलेल्या या आत्मसमर्पित नक्षलवाद्यांसाठी ही सहल नवीन आयुष्याची सकारात्मक सुरुवात ठरली आहे. हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरल्याने, आता आत्मसमर्पित नक्षलवाद्यांची अशीच दुसरी 'महाराष्ट्र दर्शन' ट्रिप येत्या २६ जुलै रोजी रवाना होणार आहे.

### या ठिकाणी दिल्या भेटी

या सहलीत दीक्षाभूमी, लोणार सरोवर, ऐतिहासिक अजंठा-वेरूळ लेणी, दौलताबादचा किल्ला, बीबी का मकबरा आणि वर्धा येथील सेवाग्राम आश्रम यांसारख्या प्रमुख ठिकाणांना आत्मसमर्पित नक्षलवाद्यांनी भेटी दिल्या.या प्रवासातील सर्वात खास आणि भावूक क्षण शेगावात अनुभवायला मिळाला. सहलीदरम्यान इतर सर्व ठिकाणी पोलीस विश्रामगृहात राहाण्याची व्यवस्था करण्यात आली होती, मात्र शेगावात या सर्वांची मुक्कामाची व्यवस्था थेट भक्त निवासात केली होती. संस्थानातील सेवाभाव पाहून सर्वजण भारावले.



## चोपडे कुटुंबीयांचे खा.देशमुख यांनी केले सांत्वन

**रिसोड :** लडाख येथे झालेल्या अपघातात मृत्यू झालेल्या युवा ॲड. कुणाल चोपडे यांच्या कुटुंबीयांची खासदार संजय देशमुख यांनी १७ जुलै रोजी रिसोड येथे भेट घेऊन सांत्वन केले. त्यांनी चोपडे यांच्या निवासस्थानी जाऊन कुटुंबीयांची विचारपूस केली.

१२ जुलै रोजी लडाख येथे झालेल्या अपघातात ॲड. कुणाल चोपडे यांचे निधन झाले होते. यावेळी खासदार देशमुख यांनी त्यांच्या अकाली निधनाबद्दल दुःख व्यक्त करून कुटुंबीयांना धीर दिला.

सांत्वन भेटीदरम्यान दिवंगताचे वडील संतोष चोपडे, काका सतीश चोपडे, आई व इतर कुटुंबीय उपस्थित होते. तसेच इंजिनीयर बाळासाहेब देशमुख, माजी नगराध्यक्ष यशवंत देशमुख, वाशिमचे माजी नगराध्यक्ष लक्ष्मण इंगोले, माजी नगराध्यक्ष दीपकराव भांदुर्गे, प्रतापराव देशमुख, सुभाष केदार व स्थानिक नागरिक उपस्थित होते.

## न्यूज ब्रीफ

### अण्णाभाऊंना स्मृतिदिन निमित्त अभिवादन



**चिखली :** साहित्यसम्राट लोकशाहीर आणाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त उदयनगर येथे अभिवादन कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या प्रारंभी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवरांनी आदरांजली अर्पण केली. यावेळी माजी सरपंच प्रदीप अंभोरे, लहुजी आखाड्याचे अध्यक्ष अमोल साबळे, शुभम साबळे, कुणाल हातागळे, रोहन सपकाळ, कार्तिक गुडेकर, लालाभाई सपकाळ, दिलीप हातागळे, सचिन गुडेकर, अश्विन गुडेकर, किशोर सपकाळ, वैभव सपकाळ, यांच्यासह महिला भगिनी व परिसरातील नागरिक उपस्थित होते. यावेळी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, समाजप्रबोधन, परिवर्तनवादी विचाराचे स्मरण करत त्यांच्या कार्याचा आदर्श नव्या पिढीने जोपासण्याचे आवाहन करण्यात आले.

### जि. प. शाळेत स्वछता किटचे वाटप



**मासरूळ :** येथील जि. प. मराठी शाळेत माजी विद्यार्थी यांच्या सारथी ग्रुपने विद्यार्थ्यांना स्वच्छता किट वाटप केली. संबंधित किटमध्ये ब्रश, टूथपेस्ट, कंगवा, हातरुमाल, नेलकटर या साहित्याचा समावेश होता. कार्यक्रमप्रसंगी विनोद जाधव यांनी विद्यार्थ्यांना वैयक्तिक स्वच्छतेचे महत्त्व सांगितले. विद्यार्थ्यांनी सुद्धा उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शाळेचे मुख्याध्यापक पवार, शिक्षक चिंचोले, शेळके, पवार, उबाळे यांनी सारथी ग्रुपचे कौतुक केले. या कार्यक्रम प्रसंगी शाळेचे माजी विद्यार्थी सुगदेव नरवाडे, हरिदास राऊत, अंबादास वाघ, भगवान भगत, किरण उगले, दिनेश पवार, शंकर नरवाडे, बबन राऊत आदी वर्गमित्र उपस्थित होते.

## मोबाईलच्या अतिवापराने वाचनाकडे पाठ..

# चोखंदळ वाचकांच्या प्रतीक्षेत चिखलीतील वाचनालये ओस!

**अंकुश पाटील**



**चिखली :** तंत्रज्ञानाच्या झपाट्याने होत असलेल्या प्रगतीमुळे आज प्रत्येकाच्या हातात स्मार्टफोन आला आहे. इंटरनेट, सोशल मीडिया आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात माहिती मिळवण्याची पद्धत पूर्णपणे बदलली आहे. काही सेकंदांत कोणतीही माहिती उपलब्ध होत असल्याने पुस्तक वाचनाची सवय दिवसेंदिवस कमी होत आहे. परिणामी विद्यार्थी, युवक, अभ्यासक, ज्येष्ठ नागरिकांनी गजबजलेली सार्वजनिक वाचनालये आता वाचकांच्या प्रतीक्षेत ओस पडत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

एक काळ असा होता की, गावातील वाचनालय म्हणजे ज्ञानाचे केंद्र मानले जात असे. सकाळपासून सायंकाळपर्यंत विद्यार्थी अभ्यासासाठी व स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे युवक संदर्भग्रंथांसाठी वाचनालयात गर्दी करत होते. ज्येष्ठ नागरिक वर्तमानपत्रे, मासिके वाचण्यासाठी येत होते. साहित्य, इतिहास, विज्ञान, कृषी, अर्थशास्त्र, धर्म, चरित्रे, कादंबऱ्या आणि विविध विषयांवरील पुस्तकांचा अभ्यास करून अनेकांनी आयुष्याला दिशा दिली. मात्र डिजिटल युगाच्या वाढत्या प्रभावामुळे ही संस्कृती आता मागे पडताना दिसत आहे. आजच्या पिढीचा बराचसा वेळ मोबाइलवर रील्स पाहणे, सोशल मीडियावर स्क्रोल करणे, गेम खेळणे, चॅटिंग करण्यात जात आहे. सखोल वाचन, चिंतन, मनन करण्याची सवय कमी होत आहे. मोबाइलवर मिळणारी माहिती बहुतेक वेळा अल्पकालीन असते. ती तुकड्यांत मिळते.

पुस्तक वाचन व्यक्तीच्या विचारशक्तीला चालना देते. भाषेची समृद्धी वाढवते. व्यक्तिमत्त्व घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. समाज घडवण्यासाठी वाचनालयांकडे पुन्हा पावले वळण्याची गरज आज अधिक प्रकर्षाने जाणवत आहे.

### अनुदानित वाचनालयांनी उपक्रम राबवावे

■ सार्वजनिक वाचनालय चळवळीला मोठा इतिहास आहे. अनेक नामवंत ग्रंथालयांनी समाजात ज्ञानाचा प्रसार करण्याचे मोठे कार्य केले आहे. शासनाकडून सार्वजनिक वाचनालयांना अनुदान दिले जाते. अ वर्गासाठी ११ लाख ५२ हजार, ब वर्ग ३ लाख ९० हजार, क वर्ग १ लाख ५३ हजार आणि ड वर्गासाठी ४८ हजार रुपयांचे अनुदान देण्यात येते. तसेच विविध योजना राबविल्या जातात. तज्ज्ञांच्या मते, शाळा– महाविद्यालयांमध्ये वाचन प्रेरणा अभियान, एक महिना एक पुस्तक', कुटुंब वाचन उपक्रम, ग्रंथ प्रदर्शन, लेखक भेट यांसारखे कार्यक्रम राबवण्यात आले तर विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होऊ शकते.

### जिल्ह्यात सर्वाधिक वाचनालये चिखलीत

■ बुलढाणा जिल्ह्यात एकूण ३३७ वाचनालये आहेत. यापैकी सर्वात जास्त ५६ वाचनालये चिखली तालुक्यात आहेत. खामगाव ३२, जळगाव जामोद ११, देऊळगाव राजा २६, नांदुरा १२, बुलढाणा ३५, मलकापूर १६, मेहकर ३२, मोताळा ११, लोणार १८, शेगाव २५, सिंदखेड राजा ७ तर संग्रामपूर तालुक्यात २६ ग्रंथालये आहेत. केवळ वाचनालये असून चालत नाही तर वाचकांची संख्या वाढवण्यावर भर द्यावा लागेल. विशेष मोहिम आयोजित करुन वाचनाची गोडी लावण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

## संस्थेचे कर्मचारी ही माझी प्रॉपर्टी : संदीप शेळके

**लोणार/प्रतिनिधी**



आधारवड भाऊसाहेब शेळके यांनी संस्थेचे रोपटे लावले. आज या रोपट्याचा वटवृक्ष झाला आहे. या यशस्वी वाटचालीमध्ये स्थानिक संचालक, खातेदार, ठेवीदार, हितचिंतक, मार्गदर्शक यांचा मोलाचा सहभाग आणि सहकार्य लाभले. तसेच संस्थेचे अधिकारी, कर्मचारी यांची निष्ठा, परिश्रम आणि सेवाभाव हा सुद्धा तितकाच महत्वाचा आहे. संस्थेचा प्रत्येक कर्मचारी ही माझी प्रॉपर्टी आहे. येणाऱ्या काळात अधिक सरस कामगिरी करुन संस्थेचा नावलौकिक वाढवावा. मी कायम तुमच्या पाठीशी आहे, असा विश्वास संदीप शेळके यांनी व्यक्त केला.

एमटीडीसी रिसॉर्टमध्ये १९ जुलै रोजी एकदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते. संस्थाध्यक्षा मालती शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती. राजर्षी शाहू मल्टिस्टेटच्या मेहकर विभागाने १०० कोटींच्या ठेवींचा टप्पा यशस्वीरित्या पूर्ण केला. संस्थापक अध्यक्ष संदीपदादा शेळके यांनी या उपलब्धीनिमित्त स्थानिक संचालक, खातेदार, ठेवीदार, हितचिंतक, मार्गदर्शकांचे आभार व्यक्त करीत अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. सकाळी दहा वाजता कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रारंभी दीपप्रज्वलन करण्यात आले. संदीपदादा शेळके यांची कन्या गार्गी हिच्या हस्ते सर्व कर्मचाऱ्यांना भेटवस्तू देण्यात आली. तज्ञ मार्गदर्शक तुषार डोडिया यांनी बँकिंगबाबत सर्व कर्मचाऱ्यांची कार्यशाळा घेतली. प्रशिक्षणातील ताण हलका करण्यासाठी त्यांनी विरंगुळात्मक खेळ घेऊन वातावरण निर्मिती केली. संस्थाध्यक्षा मालतीताई शेळके यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सरव्यवस्थापक दिलीप चव्हाण, सुशील गुळवे, कृष्णा सावळे, पवन सावळे, अमोल सुसर यांची उपस्थिती होती. संचालन विभागीय व्यवस्थापक गोविंद येवले यांनी केले तर आभार रवींद्र चव्हाण यांनी मानले.

## देवखेड ते रुम्हणा बससेवा सुरु करण्याची मागणी

**सिंदखेडराजा/प्रतिनिधी**




तालुक्यातील देवखेड येथील ५० हून अधिक शाळकरी मुलींना रुम्हणा येथील शाळेत सुरक्षितपणे ये–जा करता यावी, यासाठी तात्काळ बस उपलब्ध करून देण्याची मागणी लोकजागर परिवाराचे विश्वस्त प्रवीण गीते, क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष सहदेव लाड तसेच ग्रामस्थांनी गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

देवखेड ते रुम्हणा हे अंतर सुमारे साडेतीन किलोमीटर असून देवखेड गावात प्रामुख्याने शेतकरी व शेतमजूर कुटुंबे वास्तव्यास आहेत. आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे मुलींच्या दैनंदिन प्रवासासाठी खाजगी वाहनांचा खर्च पालकांना परवडत नाही. परिणामी, अनेक मुलींना दररोज पायी शाळेत जावे लागते. दररोज एवढ्या अंतराचा पायी प्रवास करावा लागत असल्याने त्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. विद्यार्थिनींचे शिक्षण अखंडित राहावे आणि त्यांना सुरक्षित वाहतुकीची सुविधा मिळावी, यासाठी शिक्षण विभागाने तातडीने शालेय बसची व्यवस्था करावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.प्रशासनाने या मागणीकडे तात्काळ सकारात्मक दखल न घेतल्यास लोकजागर परिवार, क्रांतिकारी शेतकरी संघटना व ग्रामस्थांच्यावतीने तीव्र लोकआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. यावेळी प्रवीण गीते, सहदेव लाड, संदीप भोसले, प्रकाश खरात, अधिकार खरात, संजय खरात, पंजाब खरात, सतीश खरात, पंकज खरात, अंकुश काकडे, कुंदन खरात, लखन खंडागळे यांच्यासह ग्रामस्थ हजर होते.

## तलवारबाजी स्पर्धेत सुप्रिया इंगळेची बाजी

**हिवरा आश्रम/प्रतिनिधी**



यशाची तलवार नेहमी जिद्द, शिस्त आणि अथक परिश्रम यांच्या धारेवर घडत असते. या उक्तीची प्रचिती देत विवेकानंद कृषी महाविद्यालयाची विद्यार्थिनी सुप्रिया प्रभाकर इंगळे हिने नागपूर येथील कृषी महाविद्यालयात आयोजित आंतरमहाविद्यालयीन तलवारबाजी स्पर्धेत सेबर प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला. या यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

नागपूर येथील कृषी महाविद्यालयात पार पडलेल्या या स्पर्धेत डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अंतर्गत व उद्यानविद्या महाविद्यालयांतील ४५ विद्यार्थिनी व ४५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. कृषी महाविद्यालय, नागपूर, शिवाजी कृषी महाविद्यालय, अमरावती, शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालय, भाऊसाहेब फुंडकर शासकीय कृषी महाविद्यालय बुलढाणा, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,अकोला, जळगाव जामोद येथील उद्यानविद्या महाविद्यालय तसेच इतर महाविद्यालयांतील खेळाडूंमध्ये अत्यंत चुरशीच्या लढती रंगल्या.तलवारबाजी या क्रीडा प्रकारात एपी, सेबर आणि फॉइल असे तीन प्रकार असतात. यापैकी सेबर प्रकारात विवेकानंद कृषी महाविद्यालयातून एकमेव स्पर्धक म्हणून उतरलेल्या सुप्रिया इंगळे हिने आपल्या चपळ हालचाली, अचूक वार, संतुलित बचाव आणि आत्मविश्वासपूर्ण खेळाच्या जोरावर सर्व प्रतिस्पर्ध्यावर मात करत प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या यशामुळे विवेकानंद कृषी महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील नावलौकिकात भर पडली आहे. या स्पर्धेसाठी महाविद्यालयाच्या संघ प्रशिक्षक व व्यवस्थापक म्हणून प्रा. सोनल खवणे यांनी विद्यार्थिनीला मार्गदर्शन केले.

त्यांच्या सातत्यपूर्ण प्रशिक्षणामुळे आणि योग्य मार्गदर्शनामुळे सुप्रियाने हे उल्लेखनीय यश संपादन केले. सुप्रिया इंगळे हिच्या या यशाबद्दल विवेकानंद आश्रमाचे अध्यक्ष आर. बी. मालपाणी, उपाध्यक्ष अशोक थोरहाते, सचिव संतोष गोरे, सहसचिव आत्मानंद थोरहाते यांच्यासह आश्रमाचे पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष कालवे, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी तसेच विवेकानंद आश्रम परिवाराने कौतूक केले आहे.

## दैनिक महाभूमि शब्दसंगम 1034



–: आडवी विधाने :–

2) जोडा पादत्राण
4) पावेतो
6) वशिला,नोकरीसाठी मोठया व्यक्तीने एखाद्या उमेदवाराची केलेली तारीफ
9) रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या वाहनांवर आकारण्यात येणारा कर
10) मस्तक, कपाळ
12) पिठाची चक्की, यंत्राने चालणारा कारखाना, 13) मोठया प्रमाणात वस्तू उत्पादित करण्याचे ठिकाण
15) प्रधान
16) मन, अंत:करण
18) आकाश, आभाळ
20) आवेग, चीड
21) एखाद्याला मान देणे
22) पशुपक्ष्यां मधील स्त्री जाती
23) थाटमाट, सोबत असलेले गाडया, घोडे, सामान, नोकर वगैरे
25) पातक
26) रामायणात दशरथ राजाची एक पत्नी
27) मनातल्या मनात केलेले चिंतन
28) हेर, खंदक
29) ताप देणारा सूर्य
32) एक रंग प्रकार
33) मंदिराचे शिखर
34) फळाच्या आतील रसाळ भाग
35) शेती मोजण्याचे परिणाम
36) आंधळा
37) मंगल प्रसंगी वाजविण्यात येणारे वाद्य
39) प्राचीन इतिहास व चरित्रपर गोष्ट
40) एक विदेशी मद्य प्रकार
41) गीर, मगज, विष
42) पुण्यभूमी, देह, जागा
43) खेडेगावात गाई घरी परततांना त्यांच्या पायांची जी धूळ उडते ती वेळ, सायंकाळ
46) शर्विलक
47) करंगळीच्या शेजारचे बोट
48) रात्रीच्या भोजनानंतर थोडया वेळ पायी फिरणे
50) पैसे देऊन विकत घेतलेले दास
51) दोन हातांनी वाजते ती
52) लहान तंबू
54) मनुष्याच्या जन्मकाळाच्या ग्रहस्थितीवरून तीन गण करतात. त्यापैकी शेवटचा गण
55) नाकाने हुंगण्याची पूड
57) थोडे, लहान, जास्त नव्हे ते
59) चतकोर, चतुर्थांश
60) गोष्ट कहाणी
62) व्यवस्था, तजवीज
65) धारदार, प्रखर
66) टवाळकी करणारा
69) बारा राशींपैकी एक राशी
71) लहान, छोटे
72) चूक, अपराध
73) तरूण, सैनिक
74) डाळ, द्विदल धान्य
75) क्रोध, संताप
76) स्पष्ट, उघड, दिसण्यासारखे
77) जीभ, जिव्हा

–: उभी विधाने :–

1) माफी मागणे, क्षमायाचना
2) लाक्षणिक अर्थाने दगडी मनाचा
3) लवकर, जलद
4) विष्णू, ज्याच्या नाभीतून कमळ उगविले आहे असा
5) संपूर्ण व विस्तृत, साद्यंत
6) नेटाचे प्रयत्न
7) पुष्कळ, खुप
8) देवळासमोर भजन, कीर्तन, प्रवचनासाठी बांधलेले सभागृह
11) वाईट सवय किंवा छंद
13) एक प्रश्नार्थक अव्यय
14) कुटूंब, कुळ
15) मद्य प्राशन करणे
17) मूल्य, दाम
19) जमिनीवर विचरण करणारा
21) ग्रहण करणे, जाणीव
22) मानलेला मुलगा
24) हरविणे, पराभूत करणे
26) श्रीशंकराचे निवासस्थान
27) अंगावर जमलेली धूळ, घाण
30) उत्कृष्ट, अत्युच्च, अतिशय
31) खालचा आठ
34) नातेवाईक
36) अंगावरचा कपडा
38) अगदी अल्पसंख्या (एक वाक्प्रचार)
44) मऊ व चापट पदार्थाचा आघात
45) सानिध्य, निकटपणा
47) ज्याला वार्धक्य किंवा मरण नाही असा
48) दाबणे, शांत करणे
49) मनुष्याला त्रास देणारे दोन ग्रह
50) जिने गुणावयाचे ती संख्या
53) ऋणको
56) प्रभात, पहाट
58) कमी, थोडे, अल्प
61) डौल, शोभिवंत दिसण्यासारखी रचना
63) पाठवणी, रवाना करणे
64) निश्चयी, दणकट, मजबूत
67) तुफान, वायूचा क्षोभ
68) चांदी
70) पराकाष्ठा, कमाल, शिखर
71) उच्च प्रतिचा एक लाकूड प्रकार

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर



uday munde - 8446302691

### लसीकरण शिबिराला शेतकऱ्यांचा प्रतिसाद



**बुलढाणा :** पावसाळ्यातील आजारांवर नियंत्रणासाठी तालुक्यातील सव येथे डॉ. राजेंद्र गोडे कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्यावतीने जनावरांच्या आरोग्यासाठी १९जुलै रोजी लसीकरण शिबिर घेण्यात आले. शिबिराला शेतकऱ्यांनी प्रतिसाद दिला. यावेळी डॉक्टरांनी शेतकऱ्यांना जनावरांच्या आरोग्याबाबत मार्गदर्शन केले. तसेच वेळोवेळी करावयाच्या लसीकरणाचे महत्त्व पटवून दिले. उपक्रमामुळे परिसरातील जनावरांचे आरोग्य सुधारण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले. या लसीकरण शिबिरात निशा काळे, आरती मिसाळ, रोशनी ढांडेराव, श्वेता मनवर, विशाखा सुरुशे या विद्यार्थिनींनी सक्रिय सहभाग घेतला.

### पळसखेड शिवारात बिबट्या जेरबंद



**चिखली :** तालुक्यातील पळसखेड दौलत शिवारात बिबट्याचा मुक्त संचार दिसून आल्याने परिसरात खळबळ उडाली. बिबट्या दिसल्याची माहिती मिळताच चिखली पोलिसांसह बुलढाणा वन विभागाचे अधिकारी आणि रेस्क्यू पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. अनेक तास चाललेल्या शर्तीच्या मोहीम नंतर अखेर नियोजनबद्ध बिबट्याला सुरक्षितपणे जेरबंद करण्यात यश आले. बिबट्या बघण्यासाठी परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

दैनिक महाभूमि

मंगळवार । २१ जुलै २०२६

mahabhoomiakolawashim@gmail.com

# अकोला भूमि

## न्यूज ब्रीफ

### एसएओंनी घेतला कामाचा आढावा

**अकोला :** जिल्ह्यातील सोयाबीन उगवले नसल्याच्या तक्रार निवारण कामाचा आढावा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांनी (एसएओ) शुक्रवारी घेतला. यंदाच्या खरीप हंगामात पेरणीनंतर सोयाबीन बियाणे उगवले नसल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर होत आहेत. त्यानुषंगाने तालुकास्तरीय तक्रार निवारण समित्यांकडून तपासणी सुरू करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर तपासणीसह नुकसानाची माहिती संकलित करण्याच्या कामाचा आढावा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी डॉ. मुरली इंगळे यांनी घेतला.

### शहरात रिमझिम पावसाची हजेरी

**अकोला:** शहरात शनिवारी रात्री रिमझिम पावसाने हजेरी लावली. गेल्या वीस दिवसांपासून जिल्ह्यात सार्वत्रिक जोरदार पाऊस बरसला नाही. पावसाने दांडी मारल्यामुळे उगवलेली खरीप पिके धोक्यात सापडल्याने, सार्वत्रिक दमदार पाऊस बरसण्याची प्रतीक्षा जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून केली जात असताना शनिवारी सकाळपासून जिल्ह्यात बगाळ वातावरण पसरले होते. रात्री ९ ते ९:३० वाजण्याच्या सुमारास अकोला शहरात रिमझिम पावसाने हजेरी लावली. पावसामुळे वातावरणात काहीसा गारवा निर्माण झाल्याने अकोलेकरांना दिलासा मिळाला. तसेच शेतकरी वर्गही सुखावल्याचे चित्र दिसून आले.

## निधन वार्ता

### रमेश जायले



**अकोट :** स्थानिक मलकापूर (अकोला) येथील रहिवासी रमेश माणिकराव जायले यांचे सोमवार २० जुलै रोजी निधन झाले. त्यांची अंत यात्रा २१ जुलै २०२६ रोजी डॉक्टर कॉलनी मलकापूर अकोला येथून सकाळी १० वाजता निघणार आहे.

### सोनम वांगचूक यांच्या समर्थनार्थ भाकपचा मोर्चा

# विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांवर अकोल्यात आंदोलनांचा एल्गार

**अकोला / प्रतिनिधी**

विद्यार्थी, युवक आणि शिक्षण क्षेत्राशी संबंधित विविध प्रश्नांवर सोमवारी अकोल्यात दोन वेगवेगळी आंदोलने झाली. भारतीय कम्युनिस्ट पक्ष, आयटक व युथ फेडरेशन यांनी लडाखचे पर्यावरणवादी व सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांच्या आंदोलनाला पाठिंबा देत जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला, तर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार पक्ष) यांनी नीटसह पेपरफुटी, भरती घोटाळे आणि ऑनलाइन परीक्षा व्यवस्थेतील त्रुटींविरोधात आंदोलन करून शासनाचा निषेध नोंदविला.

दोन्ही आंदोलने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पार पडली असून, शासनाने मागण्यांवर तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला. भाकपच्या आंदोलनात दिल्लीतील आंदोलनाला पाठिंबा देत 'मोदी सरकार घाबरले', ''भ्याड दंडेलशाहीचा धिक्कार असो'', 'धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना नुकसानभरपाई द्यावी, आंदोलनकर्त्यांवरील कारवाई थांबवून संवादातून प्रश्न सोडवावेत, अशी मागणी करण्यात आली. सोनम वांगचूक यांना जबरदस्तीने रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचा तसेच दिल्लीतील आंदोलनात सहभागी विद्यार्थ्यांवर लाठीमार करून एआयएसएफसह विद्यार्थी व युवकांची धरपकड केल्याचा आरोप आंदोलकांनी केला. केंद्र सरकारने दडपशाहीऐवजी संवादाचा मार्ग स्वीकारावा, अशी भूमिका भाकपने मांडली.




### आंदोलनांतील प्रमुख मागण्या

- केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा.
- पेपरफुटी व भरती घोटाळ्यांची निष्पक्ष व कालबद्ध चौकशी करावी.
- दोषींवर कठोर कारवाई करून परीक्षा व्यवस्था पारदर्शक करावी.
- विद्यार्थी व युवकांच्या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा.

## पेपर फुटीप्रकरणी दोषींवर कारवाईची मागणी

**अकोला / प्रतिनिधी**

शिक्षण बचाव कृती समितीने नीट व टीईटी पेपरफुटी प्रकरणांमुळे विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर गंभीर परिणाम होत असल्याचा आरोप करत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले. पेपरफुटी प्रकरणांची निष्पक्ष व उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

समितीने नवी दिल्ली येथे सोनम वांगचूक आणि अभिजित दिपके यांनी लोकशाही, शांततापूर्ण व अहिंसात्मक मार्गाने सुरू केलेल्या आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला. तसेच परीक्षा गैरव्यवहारात सहभागी असलेल्या परीक्षा केंद्रे, प्रिंटिंग प्रेस, एजन्सी, अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर कोणत्याही राजकीय अथवा प्रशासकीय दबावाशिवाय कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली. समितीने संवाद, संविधानिक प्रक्रिया, वैज्ञानिक दृष्टिकोन, पारदर्शकता आणि लोकशाही मूल्यांच्या आधारेच विद्यार्थ्यांना न्याय मिळू शकतो, असे नमूद करत पेपरफुटी प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करून परीक्षा व्यवस्थेवरील विद्यार्थ्यांचा विश्वास पुनर्स्थापित करण्याची मागणी केली. समितीच्या प्रमुख मागण्या पेपरफुटी प्रकरणांची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी. संबंधित अधिकारी, संस्था व एजन्सींवर कठोर कारवाई. दोषी संस्था व एजन्सींना काळ्या यादीत टाकावे.



## शहर स्वच्छतेवर महापौरांचा कडक इशारा

### ट्रान्सफर स्टेशनचे काम पूर्ण करण्याचे निर्देश

**अकोला / प्रतिनिधी**

शहरातील स्वच्छता व्यवस्थेतील त्रुटींवर महापालिका प्रशासनाला चांगलेच धारेवर धरत महापौर शारदा रणजीत खेडकर यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी स्वच्छता विभागाची आढावा बैठक पार पडली. स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी शहरातील स्वच्छतेबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत, यापुढे कोणताही हलगर्जीपणा किंवा कामचुकारपणा सहन केला जाणार नसल्याचा स्पष्ट इशारा दिला.

बैठकीत शहरातील चारही झोनमधील दैनंदिन स्वच्छता, प्रभागनिहाय साफसफाईची कामे तसेच कचरा ट्रान्सफर स्टेशनच्या कामाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. स्वच्छता व्यवस्थेतील संथ गती आणि नियोजनातील त्रुटींवर महापौर व सभापती यांनी अधिकाऱ्यांना जाब विचारला. ट्रान्सफर स्टेशनचे काम युद्धपातळीवर पूर्ण करावे, काम पूर्ण होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात कचरा साठवण्यासाठी पर्यायी जागा निश्चित करावी, घंटागाड्या व ट्रॅक्टरमधील कचरा त्या ठिकाणी उतरवून, भाडेतत्त्वावरील टिप्परद्वारे ट्रान्सफर स्टेशनवर पोहोचविण्याची व्यवस्था करावी. स्वच्छता विभागाने परस्पर समन्वय साधून प्रभावी आणि नियोजनबद्ध कामकाज करावे. ट्रॅक्टर दोन शिफ्टमध्ये चालवून किमान सहा फेऱ्या पूर्ण होतील, असे नियोजन करावे. असा कडक इशाराही सभापती विजय अग्रवाल यांनी अधिकाऱ्यांना दिला. बैठकीस उपमहापौर अमोल गोगे, सभागृह नेते पवन महल्ले, नगरसेवक धनंजय धबाले, अमोल मोहोकार, शरद तुरकर यांच्यासह सहायक आयुक्त गणेश शहाणे, राजेश सरप, देविदास निकाळजे, अनिल बिडवे तसेच सर्व स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते.

## नातीवर अत्याचाराचा आरोप ; ५७ वर्षीय आजोबाला अटक

**मुर्तिजापूर / प्रतिनिधी**

तालुक्यातील माना पोलीस स्टेशन हद्दीतील एका गावात नातेसंबंधाला काळिमा फासणारी धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. ५७ वर्षीय आजोबानेच आपल्या तीन वर्षीय नातीवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप असून, या प्रकरणी माना पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ५७ वर्षीय व्यक्ती काही खासगी कामानिमित्त आपल्या मूळ गावी आला होता. याच दरम्यान त्याने आपल्या तीन वर्षीय नातीला चॉकलेटचे आमिष दाखवून घराबाहेर नेल्याचा आरोप आहे. त्यानंतर चिमुकलीवर लैंगिक अत्याचार झाल्याचे समोर आले. हा प्रकार उघडकीस येताच कुटुंबीयांनी तातडीने माना पोलीस स्टेशन गाठून तक्रार दाखल केली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी त्वरित तपास सुरू केला. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन माना पोलिसांनी आरोपीला अटक केली. आरोपीविरुद्ध कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## चान्नी सबस्टेशनचा भोंगळ कारभार : शेतकऱ्यांचा ठिय्या

**पातूर / प्रतिनिधी**

तालुक्यातील चान्नी (सस्ती) वीज उपकेंद्राच्या भोंगळ कारभारामुळे वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याने १७ गावांतील नागरिक त्रस्त झाले आहेत. याच्या निषेधार्थ श्री शेतकरी राजा ग्रुप व ग्रामस्थांनी चान्नी सबस्टेशनवर तब्बल तीन तास ठिय्या आंदोलन करून महावितरणच्या कारभाराविरोधात तीव्र संताप व्यक्त केला.



गेल्या चार-पाच दिवसांपासून चान्नी, उमरा, राहेरसह परिसरातील १७ गावांमध्ये सायंकाळच्या वेळेस नियमित भारनियमन केले जात असून, अनेकदा दिवसभरातही तीन ते चार तास वीजपुरवठा खंडित केला जात आहे. यामुळे शेतकरी, विद्यार्थी, महिला तसेच व्यावसायिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. वारंवार होणारी वीज कपात तातडीने बंद करून सुरळीत वीजपुरवठा करण्यात यावा, अन्यथा महावितरणविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा आंदोलकांनी दिला. शेतकऱ्यांच्या दैनंदिन कामांवरही या भारनियमनाचा मोठा परिणाम होत आहे. सायंकाळच्या वेळेस जनावरांचे दूध काढणे, कडबाकुट्टी करून चारा तयार करणे तसेच शेतीची विविध कामे विस्कळीत होत आहेत.

### रात्री १२ ते ३ वाजेपर्यंत ठिय्या आंदोलन

- उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पातूर) रंगारी यांच्याशी मोबाईलवर चर्चा झाल्यानंतर वीजपुरवठा सुरू होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार रात्री १२ ते पहाटे ३ वाजेपर्यंत चान्नी सबस्टेशनमध्ये श्री शेतकरी राजा ग्रुप व ग्रामस्थांनी ठिय्या आंदोलन केले. वीजपुरवठा सुरू झाल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

> चान्नी सबस्टेशन परिसरातील नागरिकांना वारंवार वीज खंडित होण्याचा त्रास सहन करावा लागत आहे. दररोज दोन ते तीन तास वीज बंद राहत असून सकाळ-संध्याकाळ लोडशेडिंगमुळे परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे. ग्रामीण भागातील नागरिकांनाही शहराप्रमाणे अखंड वीज मिळाली पाहिजे. दोन दिवसांत वीजपुरवठा सुरळीत न झाल्यास अकोला येथील कार्यकारी अभियंता कार्यालयावर तीव्र आंदोलन करण्यात येईल.
>
> – **सदाशिव घोरे**, श्री शेतकरी राजा ग्रुप, पातूर तालुका

## श्री संत वासुदेव महाराज पुण्यतिथी महोत्सव

**अकोट / प्रतिनिधी**

श्री संत वासुदेव महाराज संस्था ज्ञानपीठ आकोट द्वारा आयोजित सदगुरु श्री संत वासुदेव महाराज १७ व्या पुण्यतिथी महोत्सवांतर्गत विविध धार्मिक,आध्यात्मिक,सामाजिक, प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे २२ ते २९ जुलै दरम्यान श्री क्षेत्र श्रद्धासागर येथे आयोजन करण्यात आले आहे.

या निमित्त ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी व श्रींच्या चरित्राचे सामूहिक पारायण,प्रवचन,कीर्तन, अखंड हरिनाम सप्ताह आदी कार्यक्रम पार पडणार आहेत.श्रींचा पुण्यतिथी उत्सव शुक्रवारी आषाढ शुद्ध दशमी २४ जुलैला आहे.या दिवशी सकाळी ६ वाजता महाअभिषेक सकाळी १० ते १२ या वेळेत श्री.ह.भ.प. गोपाळ महाराज उरळकर यांचे कीर्तन,दुपारी १ ते ३ महाप्रसाद सायंकाळी हरिकीर्तन,रात्री ९.४५ वाजता महाआरती व दीपोत्सवाने श्रींचे पुण्यस्मरण करण्यात येणार आहे.



आषाढी एकादशी निमित्त २५ जुलै रोजी यात्रा महोत्सव व २९ जुलैला गुरुपौर्णिमा उत्सव होईल. कार्यक्रमाचे व्यासपीठ नेतृत्व ह भ प अनंत महाराज अवारे यांचेकडे असून या महोत्सवात सर्व ह. भ. प. हरिभाऊ महाराज वसु, अनंत महाराज अवारे, गणेशराव महाराज अंबाडकर,विजय महाराज चिंचोळकर, दिपक महाराज मेंढे,भुषण महाराज सांगुनवेढे,डॉ.गोपाल महाराज झामरे यांची प्रवचन सेवा तसेच सर्वश्री ह.भ.प.रवींद्र महाराज वानखडे, अजाबराव महाराज वहिले, अनंत महाराज अवारे,डॉ. दीनदयाल महाराज ठाकरे, एकनाथ महाराज पाचमासे,निवृत्ती महाराज मानकर,वासुदेवराव महाराज महल्ले यांची कीर्तन सेवा व २९ जुलैला ज्ञानेशप्रसाद महाराज पाटील यांची काल्याच्या कीर्तनाची सेवा होईल.यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम संपन्न होईल.या भक्ती सोहळ्याला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## अखेर ग्रामसेवक मानकर यांची बदली

**मुर्तिजापूर / प्रतिनिधी**

तालुक्यातील ग्राम पारद येथील ग्रामसेवक एस डब्लू मानकर यांची तक्रार गटविकास अधिकारी मूर्तिजापूर यांच्याकडे सरपंच, उपसरपंच, व ग्रामपंचायत सदस्य यांनी केली होती बऱ्याच कालावधी नंतर त्यांची बदली करण्यात आली.

सरपंच तथा सदस्य यांना विश्वासात न घेणे, महापुरुष यांच्या जयंती पुण्यतिथी आदी कार्यक्रमाला न येणे तसेच मनमानीपणे कारभार करणे अशा आशयची तक्रार गटविकास अधिकारी मूर्तिजापूर यांच्याकडे सरपंच, तथा ग्रामपंचायत सदस्य यांनी केली होती.

## विजय नगरातील पाण्याची टाकी बनली शोभेची वस्तू !

### नागरिकांना प्यावे लागते दुषीत पाणी !

**अकोट / प्रतिनिधी**

तालुक्यातील वणी गट ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या अकोट अकोला मार्गावरील विजय नगर येथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने पाण्याची टाकीचे बांधकाम काम अद्यापपर्यंत पूर्ण न झाल्याने येथील जनतेला क्षारयुक्त दुषीत पाणी प्यावे लागत आहे.

या ठिकाणी जलजिवन अंतर्गत ८४ खेडी पाणी पुरवठा योजनेचे माध्यमातून गेल्या दिड वर्षापासुन टाकी बांधकाम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग अकोट यांच्या माध्यमातून करण्यात आले मात्र या टाकीचे बांधकाम पूर्ण न झाल्यामुळे येथील नागरिकांनी दुषित क्षार युक्त पाणी प्यावे लागत आहे. सदर क्षारयुक्त दुषीत पाणी पिल्याने येथील नागरीकांचे आरोग्य धोक्यात येऊ लागले आहे.त्याच प्रमाणे मुख्य जलवाहिनी वरुन अद्याप पर्यंत हि टाकी पर्यंत जलवाहिनी टाकण्यात आली नाही. तसेच या टाकीला सुद्धा पाईप लाईन जोडणीच करण्यात आली नसल्याने गेल्या दिड वर्षापासुन येथील टाकी शोभेची वस्तू बनली आहे.या बाबतीत येथील नागरिकांनी वणी ग्रामपंचायत चे सरपंच व ग्रामसेवक यांना या बाबतीत सांगीतले व सदर ग्रामपंचायत चे सरपंच व ग्रामसेवक यांनी महाराष्ट्र जिवन प्राधिकरण च्या उपविभागीय अधिकारी यांना माहिती दिली तरी पण येथील नागरिकांच्या समस्यांकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण च्या उपविभागीय अधिकारी यांनी दुर्लक्ष केले आहे. त्या मुळेच येथील नागरिकांना दुषित क्षार युक्त पाणी प्यावे लागत असल्याने या मुळे येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही.तसेच येथील काही नागरिकांनी आरोग्याच्या दृष्टीने बाहेरुन आर ओ (वापर फिल्टरचे) पाणी विकत घेऊन आपल्या खिशाला झळ पोहोचवत आहेत. काही नागरिकांना क्षारयुक्त दुषित पाणी पिल्या शिवाय दुसरा पर्याय नाही.या बाबतीत येथील रवी पाटील रेळे, अमोल इंगळे, सागर पाचपोहे, दीपक चावला, पटेल, टाले यांनी ग्रामपंचायत व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण च्या उपविभागीय अधिकारी यांच्या कडे तक्रारी केल्या आहेत परंतु त्या तक्रारी कडे लक्ष देण्यात आले नाही.तेव्हा आमदारांनी याकडे जातीने लक्ष द्यावे अशी मागणी करण्यात आली.



### आमदार रणधीर सावरकर यांच्या हस्ते पूजन ; ७५ वारकऱ्यांचा सन्मान

# पाच पावली दिंडी सोहळ्याला उत्साहात प्रारंभ

**अकोला / प्रतिनिधी**

आषाढी एकादशी निमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री संत पसायदान सेवा समिती, तालुका व जिल्हा अकोला यांच्या वतीने २३ वा पाच पावली दिंडी सोहळा मोठ्या भक्तिभावात व उत्साहात संपन्न झाला.

या दिंडीचे आयोजक ह.भ.प. विठ्ठल महाराज खापरकर, यांचा सत्कार करण्यात आला, तापडिया नगर, बिर्ला रोड, अकोला येथून दिंडीला प्रारंभ करण्यात आला. आमदार रणधीर सावरकर यांच्या हस्ते श्रींचे पूजन करून दिंडीला हिरवी झेंडी दाखवण्यात आली. हा कार्यक्रम भारतीय जनता पार्टी आध्यात्मिक आघाडी च्या पुढाकाराने घेण्यात आला. यावेळी ७५ वारकऱ्यांचा शाल-श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. त्यानंतर सर्व वारकरी 'जय हरी विठ्ठल च्या गजरात पंढरपूरकडे रवाना झाले. या प्रसंगी राजेश बेले एकलारा, अंबादास उमाळे भाजपा जिल्हा सरचिटणीस, माधव मानकर, विवेक भरणे, गिरीश जोशी, शंकरराव काकड, विष्णू गोंदकर, विलास वानखडे, पवन महल्ले, प्रशांत जोशी, ॲड. देवाशिष काकड, संदीप गावंडे, सागर शेगोकार, हर्षद भामरे, आरती धोगलीया, बबलू जगताप, निकिता देशमुख, माणिकराव वानकर, लातूरकर साहेब, दिलीपराव घोडे, संजय राव वसु, मधुकर भटकर, गणेश खापरकर, गणेश कुकडे, आत्माराम, विठ्ठल लहेकर, रुपराव इंगोले, साहेब राऊत, श्री बाळकृष्ण तराळकर, गजानन खंडाळकर, गजानन डिगोळे, गोपाल खंदार, डॉ. गजानन बिहाडे, नीता खापरकर, राजश्री बिहाडे, सुरेखा कर यांच्यासह महिला व पुरुष वारकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेश बेले व सूत्रसंचालन अंबादास उमाळे यांनी केले तर आभार माधव मानकर यांनी मानले.




### 'वारी महाराष्ट्राची परंपरा '

- याप्रसंगी बोलताना आमदार रणधीर सावरकर म्हणाले, 'वारी ही केवळ यात्रा नाही तर ती महाराष्ट्राची जिवंत परंपरा आहे. संत ज्ञानेश्वर-तुकाराम यांनी दाखवलेला भक्तीचा, समतेचा आणि सेवेचा मार्ग वारीतून पुढे जातो. गेली २३ वर्षे सातत्याने समाजातील विविध घटकांना पांडुरंगाचे दर्शन घडवणाऱ्या ह.भ.प. विठ्ठल महाराज खापरकर यांचे कार्य निश्चितच कौतुकास्पद असल्याचे आ. रणधीर सावरकर यांनी म्हटले.

## अमरवेल शेतकऱ्यांसाठी ठरतोय कर्दनकाळ

**हिरपूर / प्रतिनिधी**

हिरपूर व परिसरात सोयाबीन, तूर, मूग, उडीद यांसारख्या द्विदल पिकांवर गेल्या दोन-तीन वर्षांपासून अमरवेल या परोपजीवी तणाचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत असून शेतकऱ्यांसाठी ही वेल कर्दनकाळ ठरत आहे. पिकांच्या खोडाला वेढा घालून त्यातील अन्नरस शोषून घेणाऱ्या या वेलीमुळे पिकांची वाढ खुंटत असून उत्पादनात मोठी घट होत आहे. काही शेतांमध्ये तर शंभर टक्क्यांपर्यंत नुकसान झाल्याची उदाहरणे समोर आली आहेत.

अमरवेल ही स्वतः अन्न तयार करू शकत नसल्याने ती दुसऱ्या वनस्पतीवर अवलंबून राहते. रोपाच्या सुरुवातीच्या अवस्थेत ही वेल पिकाला वेढा घालते आणि हॉस्टोरिया नावाच्या सूक्ष्म अवयवांद्वारे पिकातील अन्नद्रव्ये शोषून घेते. परिणामी पिके कमकुवत होतात, वाढ थांबते आणि शेंगा व दाण्यांची संख्या कमी होऊन उत्पादनात मोठी घट येते. हिरपूर व परिसरातील अनेक शेतांमध्ये अमरवेलीचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव दिसून येत आहे. विशेषतः तूर पिकात या वेलीने संपूर्ण झाड व्यापल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. पुढील हंगामात या तणाचा बंदोबस्त करण्यासाठी काही शेतकऱ्यांना एक हंगाम शेत पडीत ठेवण्याची वेळ येण्याची भीती व्यक्त होत आहे. अमरवेलीवर प्रभावी आणि कायमस्वरूपी नियंत्रणासाठी अद्याप निश्चित उपाय उपलब्ध नसल्याने शेतकरी चिंतेत आहेत. त्यामुळे उन्हाळ्यातच कृषी विभागाने गावागावांत जनजागृती, शेतकरी प्रशिक्षण, प्रात्यक्षिके आणि एकात्मिक तण व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे. ग्रामपंचायत, कृषी विभाग आणि शेतकरी यांच्या सामूहिक प्रयत्नांशिवाय या तणावर नियंत्रण मिळविणे कठीण असल्याचे कृषी तज्ज्ञांचे मत आहे.

> अमरवेल या परोपजीवी वेलीमुळे द्विदल पिकांची वाढ खुंटते आणि उत्पादनावर गंभीर परिणाम होतो. या तणावर अधिक संशोधनाची गरज आहे. एकात्मिक तण व्यवस्थापन आणि सामूहिक उपाययोजना हाच सध्या प्रभावी पर्याय आहे.
>
> – **राजेंद्र जाणे**, कृषिशास्त्रज्ञ

## न्यूज ब्रीफ

### वाहकाला मारहाण

**नांदुरा :** जुन्या बसस्थानकात बसमधील प्रवाशांना लवकर उतरण्याची सूचना केल्याचा राग मनात धरून एसटी महामंडळाच्या वाहकाला शिवीगाळ करून मारहाण केल्याची घटना नांदुरा येथे घडली. विनोद कोळी (४०) हे एसटी महामंडळात चाहक म्हणून कार्यरत असून, अकोला-चोपडा मार्गावरील एमएच-४९-बीझेड-८७९८ या चसमध्ये चालक जितेंद्र पंढरीनाथ पाटील यांच्यासह कर्तव्य बजावत होते. बस खामगावहून नांदुराकडे येत असताना आरोपी किशोर भास्कर गवई (रा. अटाळी, ता.खामगाव) व त्यांची पत्नी बसने प्रवास करत होते. दुपारी सुमारे ३:२० वाजता बस नांदुऱ्यातील जुन्या बसस्थानकात पोहोचल्यानंतर वाहकाने लवकर खाली उतरा, वाहतूक कोंडी होत आहे, अशी सूचना केल्याने वाहकाला मारहाण करण्यात आली.

### राष्ट्रीय महामार्गाच्या मालमत्तेचे नुकसान

**नांदुरा :** नॅशनल हायवे ५३ वर नांदुरा हद्दीतील कोळंबा फाट्याजवळ एक भरधाव ट्रक चालकाच्या निष्काळजीपणामुळे पलटी झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात ट्रक चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने स्ट्रीट लाईट पोल आणि साईन बोर्डला जोरदार धडक बसली. या भीषण धडकेत राष्ट्रीय महामार्गाच्या मालमत्तेचे तब्बल २ लाख ७७ हजार ३०० रुपयांचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी तक्रारीवरून ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

### आयसीआयसीआय बँक खातेदाराविरुद्ध गुन्हा

**खामगाव :** सायबर फसवणुकीतून मिळालेली १ लाख ७९ हजारांची रक्कम आयसीआयसीआय बँकेतील एका खात्यात जमा झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर खामगाव शहर पोलिसांनी संबंधित खातेदाराविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल श्रीकृष्ण देवराव हद्दे (३६), पोलीस स्टेशन खामगाव शहर यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार, आयसीआयसीआय बँक, नटराज गार्डनसमोरील शाखेतील एका खात्याचा धारक हा आरोपी असून, १० मार्च ते २७ मार्च २०२६ या कालावधीत सायबर फसवणुकीतून मिळालेली १.७९ लाखांची रक्कम त्याच्या खात्यात जमा झाल्याचे तपासात समोर आले.

### अवैध देशी दारू जप्त

**नांदुरा :** नांदुरा पोलिसांनी दहिवडी फाट्यावर अवैध देशी दारू विक्रेत्यावर कारवाई केल्याची घटना १८ जुलैच्या दुपारी ३.३० वाजता घडली. दहिवडी फाट्यावर देशी दारूची अवैध विक्री होत असल्याची गुप्त माहिती नांदुरा पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी उपरोक्त ठिकाणी छापा मारला. त्यावेळी आरोपी संतोष बाजारे (४३) रा. केदार हा देशी दारुची अवैध विक्री करतांना रंगेहात मिळून आला.

## नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून उचलले टोकाचे पाऊल

# खामगाव तालुक्यात शेतकरी पिता-पुत्राची आत्महत्या




**खामगाव /प्रतिनिधी**

तालुक्यातील पारखेड येथे रविवारी १९ जुलै रात्री आठ वाजेच्या सुमारास एक अत्यंत हृदयद्रावक आणि मन हेलावून टाकणारी घटना घडली. शेती व्यवसाय करणाऱ्या संतोष हरिशचंद्र गावंडे (५२) आणि त्यांचा मुलगा अक्षय गावंडे (३८) या पिता-पुत्राने स्वतः च्या शेतातील कांदा चाळीच्या अँगलला गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली. या घटनेमुळे पारखेड गावासह संपूर्ण खामगाव तालुक्यात तीव्र हळहळ व्यक्त होत असून गावंडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संतोष हरिशचंद्र गावंडे हे रविवारी शेतात गेले होते. रात्री आठ वाजेच्या सुमारास त्यांनी शेतात असलेल्या कांदा चाळीच्या लोखंडी अँगलला गळफास लावून घेतला. भरपूर वेळ होवूनही वडील घरी न आल्याने मुलगा अक्षय संतोष गांवडे याने शेताकडे धाव घेतली. शेतात पोहचताच त्याला कांद्याच्या चाळीत वडीलांनी गळफास लावल्याचे त्याला दिसून आले. सदर चित्र पाहताच अक्षय अक्षरशः हादरून गेला. वडीलांना मृतअवस्थेत पाहून त्यानेही त्यांच्या शेजारी स्वतला गळफास लावून जिवनयात्रा संपवली. या घटनेची माहिती वाऱ्यासारखी परिसरात पसरताच गावकऱ्यांनी शेताकडे धाव घेतली. घटनेची बातमी मिळताच खामगाव ग्रामीण पोलीस स्टेशनच्या पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन घटनेचा पंचनामा केला. दोन्ही मृतदेह ताब्यात घेऊन उत्तरीय तपासणीसाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. पिता-पुत्राने हे टोकाचे पाऊल का उचलले, यामागचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या प्रकरणाचा पुढील तपास खामगाव ग्रामीण पोलीस करत आहेत.

### मित्राला अंतीम कॉल आणि जीवनाचा झाला अंत

■ अक्षय हा शेतातील शेडमध्ये पोहोचला. तेथे वडिलांचा मृतदेह पाहताच त्याला जबर मानसिक धक्का बसला. यावेळी अक्षयने गावातील एका मित्राला फोन करून, माझ्या वडिलांनी गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. मी पण आता आत्महत्या करतोय, असे सांगितल्याची माहिती समोर आली आहे. मित्राने त्याला समजावण्याचा प्रयत्न करत, असे काही करू नको, मी लगेच येतो, असे सांगितले. मात्र मित्र घटनास्थळी पोहोचण्यापूर्वीच अक्षयनेही गळफास घेऊन आत्महत्या केली.

### जिल्ह्यात ६ महिन्यांत ६९ शेतकऱ्यांचा बळी

■ राज्य सरकारने शेतकरी कर्जमाफीची घोषणा केली असली, तरी प्रत्यक्ष पातळीवर शेतकऱ्यांच्या अडचणी संपलेल्या नाहीत. बुलढाणा जिल्ह्यात मागील अवघ्या सहा महिन्यांत तब्बल ६९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची चिंताजनक आकडेवारी समोर आली आहे. तसेच विदर्भातील अमरावती विभागात जानेवारी ते जून २०२६ या कालावधीत एकूण ४१५ शेतकरी आत्महत्यांची नोंद झाली आहे.

## छोटा कब्रस्तानच्या विकासासाठी समाजवादी पार्टीचे उपोषण



**जळगाव जामोद/प्रतिनिधी**

जळगाव जामोद येथील पंचायत समिती कार्यालयासमोर समाजवादी पार्टी महाराष्ट्रच्या वतीने २० जुलै पासून आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. समाजवादी पार्टीचे बुलढाणा जिल्हाध्यक्ष तथा नगर परिषद जळगाव जामोदचे नियोजन सभापती सै. नफिझ सै. शफिक यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पुकारण्यात आले आहे.

धानोरा महासिद्ध येथील छोटा कब्रस्तान ग्रामपंचायत धानोरा अंतर्गत येत असलेल्या स्मशानभूमीमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे नागरिकांना मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. यावर प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे आक्रमक पाऊल उचलण्यात आले आहे. नगरसेवक सैय्यद नफिस यांनी धानोरा महासिद्ध येथील छोटा कब्रस्तानमध्ये पिण्याच्या पाण्याची कोणतीही सोय नसल्यामुळे तिथे त्वरित बोरवेल करण्यात यावे, सीमा निश्चित नसल्यामुळे आणि सिमेंट भिंतीचे बांधकाम नसल्या कारणाने कब्रस्तानभोवती कंपाउंड वॉल तयार करून परिसर सुशोभित करावा, कब्रस्तानमध्ये नागरिकांना बसण्यासाठी बेंचची व्यवस्था करण्यात यावी, परिसरात सुरक्षेच्या दृष्टीने हायमास लाईटची व्यवस्था करणे, धानोरा महासिद्ध येथील नगर परिषद हद्दीत मस्जिदपासून रशीदसेठ यांच्या घरापर्यंतच्या विविध विकासकामांची पूर्तता करणे या मागण्यांसाठी आमरण उपोषण सुरू केले आहे.

यापूर्वीही या मागण्यांसंदर्भात प्रशासनाला निवेदन देऊन कार्यवाहीची मागणी करण्यात आली होती. परंतु, प्रशासनाकडून कोणतीही ठोस दखल घेतली गेली नाही किंवा सहकार्याची भावना दाखवली नाही, असा आरोप उपोषणकर्ते सैय्यद नफिस यांनी यावेळी केला आहे. अखेर कोणताच पर्याय न उरल्याने २० जुलै पासून पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषणाला सुरुवात करण्यात आली आहे.

## सोयाबीन बियाण्यांबाबत दिशाभूल; रवी सीड्स अँड रिसर्च कंपनीविरुद्ध गुन्हा

**खामगाव :** सोयाबीन बियाण्यांच्या उगवणीबाबत शेतकऱ्यांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींची दखल घेत खामगाव शहर पोलिसांनी मध्य प्रदेशातील रखी सीड्स अँड रिसर्च प्रा. लि. या कंपनीविरुद्ध जीवनावश्यक वस्तू अधिनियम, बियाणे नियम आणि भारतीय न्याय संहितेअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी अमोल वामनराव बंड (५१), कृषी अधिकारी (गुण नियंत्रण), तालुका कृषी अधिकारी कार्यालय, खामगाव यांनी दिलेल्या लेखी तक्रारीनुसार, शेतकऱ्यांनी कंपनीच्या सोयाबीन बियाण्यांच्या उगवणीबाबत तक्रारी केल्या होत्या. त्यानंतर बियाण्यांच्या पिशव्यांची तपासणी करण्यात आली असता, पॅकेटवर 'रवीचे बियाणे अस्सल सोन्याचे नाणे' असा दावा करण्यात आल्याचे आढळले. हा दावा बियाणे नियम, १९६८ मधील नियम १० व २३ नुसार चुकीचा व दिशाभूल करणारा असल्याचे कृषी विभागाच्या निदर्शनास आले. तपासात संबंधित बियाणे हे सत्यता दर्शक प्रकारातील असल्याचे स्पष्ट झाले. अशा बियाण्यांच्या उत्पादन, पॅकिंग व सीलिंग प्रक्रियेत कोणत्याही शासकीय प्रमाणिकरण संस्थेचा सहभाग नसून, त्याची संपूर्ण जबाबदारी उत्पादक कंपनीची असते. असे असताना दिशाभूल करणाऱ्या दाव्यांद्वारे शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचा आरोप कंपनीवर ठेवण्यात आला आहे. या प्रकरणी खामगाव शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## रेल्वे मार्गावर मॉक ड्रिलमुळे नागरिकांची धांदल

**खामगाव /प्रतिनिधी**



मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागाकडून आज एक महत्त्वाचे मॉक ड्रिल घेण्यात आले. रेल्वे अपघात किंवा एखादी अनुचित घटना घडल्यास रेल्वे प्रशासन आणि स्थानिक यंत्रणा किती तत्परतेने प्रतिसाद देतात, याची पडताळणी करण्यासाठी हे प्रात्यक्षिक खामगाव-जलंब मार्गावरील किलोमीटर ५४१/१-३ येथे आयोजित करण्यात आले होते. दरम्यान, हे केवळ एक मॉक ड्रिल असल्याचे स्पष्ट झाल्यामुळे नागरिकांनी सुटकेचा निश्वास टाकला.

रेल्वे रुळावरून गाडी घसरल्याची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली. या माहितीची दखल घेत खामगाव शहर पोलीस, रुग्णवाहिका आणि रेल्वे पोलीस तातडीने घटनास्थळी पोहोचले. प्रशासनाची सतर्कता पाहता ही खरंच मोठी दुर्घटना असावी, असा अंदाज वर्तवण्यात आला आणि बघ्यांची मोठी गर्दी जमली.

या मॉक ड्रिलमध्ये प्रशासकीय सज्जतेचा आढावा घेण्यात आला. या प्रक्रियेत स्थानिक नगरपरिषद अग्निशमन दलाची गाडी घटनास्थळी पोहोचण्यासाठी काहीसा अवधी लागल्याचे दिसून आले. आपत्कालीन परिस्थितीत वेळ अत्यंत महत्त्वाची असते, अशा वेळी झालेला हा विलंब स्थानिक नागरिकांमध्ये चर्चेचा विषय ठरला. सदर घटना म्हणजे रेल्वे गाडी रुळावरून घसरलेली नसून, ती रेल्वे विभागामार्फत आयोजित केलेले एक मॉक ड्रिल होते, असे रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## तरुणावर हल्ला दोघांविरुद्ध गुन्हा

**शेगाव :** मित्राच्या भावाच्या नावाखाली फोन करून चौकात बोलावलेल्या ३७ वर्षीय तरुणावर लोखंडी कड्याने हल्ला करून मारहाण केल्याची घटना रविवारी १९ जुलै रात्री ११ वाजण्याच्या सुमारास छत्रपती शिवाजी महाराज चौक, शेगाव येथे घडली. फिर्यादी गजानन विलास मदने (३७) रा. जनक नगरी, वरवंट रोड, शेगाव यांना त्यांच्या मित्राच्या भावाने फोन करून छत्रपती शिवाजी महाराज चौकात येण्यास सांगितले. फिर्यादी चौकात पोहोचताच तेथे रुपेश कैलास कुंडलकर (२८) व हनुमान कैलास कुंडलकर (३२) दोघेही रा. धनगर नगर येथे उपस्थित होते.

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, बुलडाणा यांचे न्यायालयात**

वारस के.नं. ११३/२६

**जाहीर नोटीस**

**१. नितीन मथुरादास बाहेती**
रा.डीएसडी विश्वा रो हाऊस नंबर ६ तहसील रोड बुलढाणा ता. जि. बुलढाणा
**२. सचिन मथुरादास बाहेती**
रा. अकोला नाका वाशिम तालुका जिल्हा वाशिम तालुका जिल्हा वाशिम
**विरुध्द-** कोणीही नाही

अर्जदार क्र. १ ते २ यांना बॉम्बे रेन्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ (२) चे तरतूदी नुसार ते मयत मथुरादास मोतीलाल बाहेती व सुशीला मथुरा दास बाहेती यांचे वर्ग-१ चे कायदेशिर वारस म्हणून घोषीत होवून वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणेस्तव.

सर्वत्र लोकांना सूचित करण्यात येते की, अर्जदार हे मयत मथुरा दास मोतीलाल बाहेती व सुशीला मथुरा दास बाहेती यांचे वर्ग-१ चे कायदेशिर वारस असून, मथुरादास मोतीलाल बाहेती यांचे दिनांक ०७/०३/२०१८ रोजी येथे हैदराबाद येथे निधन झाले त्याचप्रमाणे सुशीला मथुरादास बाहेती, यांचे दिनांक १०/०८/२०११ रोजी वाशिम येथे निधन झाले असून त्यांना अर्जदार क्र. १ ते २ यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही वर्ग-१ वारस नाहीत.

मयत मथुरादास मोतीलाल बाहेती व सुशीला मथुरादास बाहेती यांचे मृत्यू पश्चात अर्जदार क्र. १ ते २ त्यांचे कायदेशिर वारस असून, त्यासाठी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ (२) चे तरतूदीन्वये वारसहक्क प्रमाणपत्र मिळणेकरीता विनंती केलेली आहे. कोणासठी सदर बाबतीत हरकत उपस्थित करावयाची असल्यास नोटीस प्रकाशित झाल्यापासून ३० दिवसांत लेखी दस्तांसह व पुराव्यासह हरकत उपस्थित करावी त्यानंतर कुठलीही हरकत वा उजर विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी करीता ही जाहिर नोटीस माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रकाशित केली आहे.

ठिकाण - बुलडाणा
दिनांक - २०/०७/२०२६

शिक्का
स्वाक्षरी
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश व स्तर बुलडाणा

## १६१ गावांत शिवसंवाद यात्रा; संघटन बळकटीसह जनसंवादावर भर

### शिवसेना शिंदे गटाची पत्रकार परिषदेत माहिती

**खामगाव /प्रतिनिधी**



तालुक्यात शिवसंवाद यात्रा २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. केंद्रीय मंत्री तथा खासदार प्रतापराव जाधव आणि जिल्हा संपर्कप्रमुख संजय सोनार यांच्या मार्गदर्शनाखाली ही यात्रा आयोजित करण्यात आली आहे. शिवसेना उपजिल्हा प्रमुख संजय आवताडे, उपजिल्हा प्रमुख गजानन धोरण, शिवसेना तालुकाप्रमुख राजेंद्र बघे आणि युवासेना विधानसभा प्रमुख सागर गावंडे यांनी २० जुलै रोजी आयोजित पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. २६ जुलै ते १४ ऑगस्ट या कालावधीत खामगाव तालुक्यातील १६१ गावांमध्ये ही यात्रा राबविण्यात येणार असून, गावागावांत पक्ष संघटन मजबूत करणे, जनतेशी थेट संवाद साधणे आणि विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचणे हा यात्रेचा प्रमुख उद्देश असल्याचे सांगण्यात आले. यात्रेदरम्यान नवीन शिवसेना शाखांचे उद्घाटन, जुन्या शिवसैनिकांचा सन्मान, नव्या कार्यकर्त्यांचे स्वागत व पक्षप्रवेश, शेतकरी संवाद, जनसंवाद, गावनिहाय बैठका, सामाजिक व धार्मिक कार्यक्रम तसेच पक्ष संघटन विस्ताराचे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. जनतेच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेऊन त्यावर प्रभावी पाठपुरावा करण्यावरही विशेष भर दिला जाणार आहे. यात्रेचा प्रारंभ २६ जुलै रोजी धार्मिक विधी व देवीच्या पूजनाने होणार असून, त्यानंतर नियोजित कार्यक्रमांनुसार तालुकाभर दौरा करण्यात येणार आहे.

या यात्रेच्या निमित्ताने ८ ऑगस्ट रोजी ह.भ.प. इंदोरीकर महाराज यांचे जाहीर कीर्तन, ९ ऑगस्ट रोजी भव्य मोफत सर्वरोग निदान व आरोग्य तपासणी शिबिर त्यानंतर शहर संपर्क अभियान, संघटन विस्तार, महिला व युवक संवाद, गौपूजन कार्यक्रम तसेच १४ ऑगस्ट रोजी अखंड भारत संकल्प दिनानिमित्त राष्ट्रभक्तीपर कार्यक्रमांसह यात्रेचा समारोप करण्यात येणार आहे. यावेळी त्यांनी सांगितले की, गावागावात शिवसंवाद, घराघरात शिवसेना हा संकल्प घेऊन ही यात्रा राबविण्यात येत आहे.

## जुन्या वादातून महिलेसह कुटुंबावर हल्ला

**खामगाव :** वडिलोपार्जित शेतीच्या रस्त्याच्या वादातून दारूच्या नशेत महिलेसह तिच्या कुटुंबीयांना मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना समोर आली. अनिता राजेश म्हस्कर (४५) रा. लोणी गुरव, ता. खामगाव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी गजानन दिनकर म्हस्कर (३५) रा. लोणी गुरव हा फिर्यादीचा पुतण्या असून, दोन्ही कुटुंबांमध्ये वडिलोपार्जित शेतीच्या रस्त्यावरून व शेताच्या कारणावरून पूर्वीपासून वाद आहे. आरोपी दारूच्या नशेत घरासमोर येऊन शिवीगाळ करू लागला. फिर्यादीचे पती राजेश म्हस्कर यांनी त्याला समजावण्याचा प्रयत्न केला असता, आरोपीने त्यांच्या गळ्यावर नखांनी ओरबाडून दुखापत केली. बाद सोडवण्यासाठी आलेल्या नर्मदाबाई म्हस्कर यांनाही धक्काबुक्की करण्यात आली. दरम्यान, अनिता म्हस्कर यांनी हस्तक्षेप करताच आरोपीने हातातील बांबूच्या काठीने त्यांच्या उजव्या हातावर वार केला.

**CHANGE OF NAME**

MY OLD NAME
**KHAN NISHAT ANJUM HAMEED ASHRAF KHAN**
NOW MY NEW NAME IS
**NISHAT ANJUM HAMID ASHRAF KHAN**
- ADDRESS -
Chota Bazar Malkapur, Tq. Malkapur, Dist. Buldana - 443101

**CHANGE OF NAME**

MY OLD NAME
**VINILKUMAR BHANSALI**
NOW MY NEW NAME IS
**VINIL GAUTAMCHAND BHANSALI**
PASSPORAT
NO. N1851452
- ADDRESS -
Jain Pravision Bus Stand Samor, Jalgaon Jamod, Tq. Jalgaon Jamod, Dist. Buldana - 443402

## गजानन महाराज आयुर्वेद महाविद्यालयात तंबाखूमुक्त जनजागृती व्याख्यान व केंद्राचे उद्घाटन

# तंबाखूमुक्त समाज घडविण्यासाठी तरुणांनी पुढे यावे : डॉ.जाधव

**शेगाव /प्रतिनिधी**



तंबाखूमुक्त समाजाच्या जनजागृतीसाठी तरुणांनी पुढे येणे काळाजी गरज आहे. असे प्रतिपादन प्रसिध्द फिजिशियन डॉ. रविशंकर जाधव यांनी केले.

शेगाव तालुक्यातील गायगाव येथील अल्पावधितच नावरूपाला आलेले तसेच रुग्णसेवेसाठी तत्पर असलेल्या व्हिजन एज्युकेशनल वेल्फेअर सोसायटी, बुलढाणा द्वारा संचालित श्री संत गजानन महाराज आयुर्वेद महाविद्यालय धन्वंतरी आरोग्यधाम आयुर्वेद रुग्णालय व सर्पदंश चिकित्सा केंद्रांतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील प्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ तथा संस्थाध्यक्ष डॉ. दीपक लद्धड व सचिव डॉ. संगीता लद्धड यांच्या मार्गदर्शनाखाली तंबाखूमुक्त जनजागृती या विषयावर विशेष व्याख्यान उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. यावेळी ते बोलत होते.

सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने खामगाव येथील प्रसिद्ध फिजिशियन डॉ. रविशंकर जाधव प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. आपल्या प्रभावी व्याख्यानात त्यांनी तंबाखूचे सेवन केल्यामुळे होणारे कर्करोग, हृदयरोग, फुफ्फुसांचे विकार तसेच इतर गंभीर आजार यांची सविस्तर माहिती दिली. तंबाखूचे व्यसन हे केवळ व्यक्तीचेच नव्हे तर संपूर्ण कुटुंबाचे आणि समाजाचे नुकसान करणारे असल्याचे त्यांनी सांगितले, आजच्या स्पर्धात्मक युगात यशस्वी होण्यासाठी सदृढ आरोग्य, सकारात्मक विचार, आत्मविश्वास आणि व्यसनमुक्त जीवनशैली अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी आपल्या सविस्तर व्याख्यान्यात विषद केले. सदर कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रणाम खर्चे, डॉ. पराग जगताप, डॉ. स्नेहल देशपांडे, डॉ. श्रद्धा पद्मने, डॉ. राजकुमार भांगडिया यांच्यासह महाविद्यालयातील समस्त प्रथम वर्षाचे विद्यार्थी, प्राध्यापकवृंद व कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन प्रथम वर्षाचे विद्यार्थी चैतन्य आंधळे व ओम रुपनर यांनी केले, तर आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर गवळी यांने केले. सदर कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये तंबाखूच्या दुष्परिणामांविषयी जनजागृती निर्माण झाली असून व्यसनमुक्त, निरोगी व सुदृढ समाज घडविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

■ आजच्या तरुणाईमध्ये वाढत चाललेल्या तंबाखू व तत्सम व्यसनांच्या प्रवृत्तीबद्दल चिंता व्यक्त करत विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारच्या व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन केले. स्वतः व्यसनमुक्त राहून समाजातही तंबाखूमुक्तीचा संदेश पोहोचविण्याचे आवाहन सुद्धा त्यांनी यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना केले. व्याख्यानानंतर डॉ. रविशंकर जाधव यांच्या हस्ते धन्वंतरी आरोग्यधाम आयुर्वेदिक रुग्णालयात तंबाखूमुक्त जनजागृती केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. सदर केंद्राच्या माध्यमातून तंबाखूविरोधी जनजागृती, समुपदेशन व व्यसनमुक्तीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रणाम खर्चे यांनी दिली.




**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी शेगांव यांचे कार्यालय,ता. शेगांव जि. बुलडाणा**

क्र.कावि/म.स./जन्म मृत्यु शाखा/२९१/२०२६
दिनांक - २० जुलै २०२६

**जाहीरनामा**

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार श्री.अनिल नाना दामोदर, रा.खेर्डा ता.जळगांव जामोद जि.बुलडाणा यांनी त्यांचा मुलगा नामे रोहन अनिल दामोदर यांचा जन्म दिनांक ११/०२/२००७ रोजी त्यांचे मौजे सईबाई मोटे सामान्य रुग्णालय शेगांव येथे झाला असुन त्यांची निंबधक जन्म/मृत्यु अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद शेगांव यांचेकडे जन्म घटनेची नोंद करण्यात आलेली नाही. त्यामुळे अर्जदार यांनी जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) प्रमाणे निबंधक जन्म/मृत्यु अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद शेगांव यांना जन्म नोंदीबाबत झालेला विलंब क्षमापीत करणेचा आदेश पारित करण्याचा विनंती अर्ज दाखल केला आहे.

वरील जन्म नोंदीबाबत कोणास काही हरकत / आक्षेप घ्यावयाचे असल्यास त्यांनी जाहिरनामा प्रसिध्द झाल्याचे १५ दिवसाचे आत कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) या न्यायालयात हरकत / आक्षेप अर्ज लेखी स्वरूपात दाखल करावा. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकती / आक्षेप विचारात घेतल्या जाणार नाही. अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जात नमुद केल्याप्रमाणे जन्म नोंदीबाबत झालेला विलंब क्षमापित करणेचा आदेश पारित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

ठिकाण - शेगांव

शिक्का
स्वाक्षरी
तहसिलदार शेगांव
तथा तालुका दंडाधिकारी

दैनिक
महाभूमि
मंगळवार । २१ जुलै २०२६
dainikmahabhoomi@gmail.com

# वाशिम भूमि



## आषाढी वारीसाठी बचाव पथक रवाना

### भाविकांच्या सुरक्षिततेसाठी पुढाकार

**वाशिम / प्रतिनिधी**

पंढरपूरच्या आषाढी वारीनिमित्त लाखो वारकरी आणि भाविकांच्या सुरक्षिततेसाठी तसेच आपत्कालीन मदत उपलब्ध करून देण्यासाठी वाशिम जिल्ह्यातून प्रथमच आपत्ती व्यवस्थापन बचाव पथक रवाना करण्यात आले आहे. स्वामी विवेकानंद आपत्ती व्यवस्थापन बचाव पथक आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला असून, जिल्ह्याच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण आणि अभिमानास्पद उपक्रम ठरला आहे.

वाशिम-मंगरुळपीर विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्याम खोडे, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर आणि पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच किशोर देशमुख आणि सचिन राणे यांच्या समन्वयातून हे बचाव पथक पंढरपूरकडे रवाना करण्यात आले. आषाढी वारीदरम्यान उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीत तातडीची मदत, बचावकार्य, गर्दीचे व्यवस्थापन, हरविलेल्या व्यक्तींना मदत तसेच आवश्यक आपत्कालीन सेवा पुरविण्याची जबाबदारी हे पथक पार पाडणार आहे.

**पथकाची प्रमुख जबाबदारी**

- आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत व बचावकार्य.
- वारकऱ्यांच्या गर्दीचे नियोजन व व्यवस्थापन.
- हरविलेल्या व्यक्तींना मदत.
- आवश्यक आपत्कालीन सेवा उपलब्ध करून देणे.

पथकाच्या प्रस्थानापूर्वी मंगरुळपीर येथे आमदार श्याम खोडे आणि जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या हस्ते नारळ फोडून पथकाला शुभेच्छा देत रवाना करण्यात आले. यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत, संबंधित विभागांचे अधिकारी, बचाव पथकाचे सदस्य तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी पथकातील सदस्यांना सेवाभाव, शिस्त आणि तत्परतेने कार्य करून वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी मोलाचे योगदान देण्याच्या शुभेच्छा देण्यात आल्या. आषाढी वारीसाठी प्रथमच जिल्ह्यातून बचाव पथक रवाना झाल्याने या उपक्रमाचे विविध स्तरांतून स्वागत होत असून, वारकरी व भाविकांच्या सेवेसाठी जिल्हा प्रशासनाने घेतलेल्या या पुढाकाराचे कौतुक करण्यात येत आहे.

### मानोरा, मंगरुळपीर व वाशिममध्ये रॅली, मोर्चे ; धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी

# सोनम वांगचूकसाठी विद्यार्थी रस्त्यावर ; सरकारविरोधात आक्रोश

**वाशिम / प्रतिनिधी**

दिल्लीतील जंतर-मंतर येथे लडाखचे शिक्षणतज्ज्ञ व सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक आणि अभिजित दिपके यांनी विविध शैक्षणिक प्रश्नांसाठी सुरू केलेल्या आंदोलनाला वाशिम जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मानोरा, मंगरुळपीर आणि वाशिम येथे विविध विद्यार्थी संघटना, सामाजिक संघटना व राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी रॅली, मोर्चे आणि निवेदनांच्या माध्यमातून आंदोलनाला पाठिंबा दर्शविला.

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी, लडाखला पूर्ण राज्याचा दर्जा, तसेच भारतीय राज्यघटनेच्या सहाव्या परिशिष्टात लडाखचा समावेश करण्यासह विविध मागण्या यावेळी करण्यात आल्या. मानोरात विद्यार्थी एकता संघाची भव्य आक्रोश रॅली विद्यार्थी एकता संघ, मानोरा यांच्या वतीने शहरात भव्य




आक्रोश रॅली काढण्यात आली. पंचायत समिती कार्यालयापासून सुरू झालेली रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक, दिग्रस चौक मार्गे तहसील कार्यालयावर पोहोचली. त्यानंतर तहसीलदार राजेंद्र पाटील यांच्यामार्फत भारताच्या राष्ट्रपतींना निवेदन सादर करण्यात आले.

आंदोलनादरम्यान 'भारत माता की जय', 'संविधान अमर रहे', ''या सरकारचं करायचं काय, खाली डोकं वर पाय', ''केंद्र सरकार मुर्दाबाद', ''भाजपा मुर्दाबाद'' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. या रॅलीत विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्षांचे पदाधिकारी, पत्रकार, विद्यार्थी, पालक व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. आंदोलनात अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी संस्थेचे संचालक अरविंद पाटील इंगोले, ॲड. ज्ञायक पाटणी, प्रकाश राठोड, डॉ. संजय रोठे, रविंद्र पवार, रामनाथ राठोड, विनोद राठोड यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. मानोरा येथे सादर करण्यात आलेल्या निवेदनात, आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांची केंद्र सरकारने तातडीने दखल न घेतल्यास १५ ऑगस्टपासून देशभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

**मंगरुळपीरमध्ये मागासवर्गीय अन्याय निवारण कृती समितीचा पाठिंबा**

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय अन्याय निवारण कृती समिती, महाराष्ट्र यांच्या वतीने दिल्लीतील आंदोलनाला जाहीर पाठिंबा देत उपविभागीय अधिकारी तथा तहसीलदार, मंगरुळपीर यांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात भारतीय संविधानाने नागरिकांना दिलेल्या शांततापूर्ण आंदोलनाच्या अधिकाराचा सन्मान करण्याची मागणी करण्यात आली. आंदोलनकर्त्यांशी संवाद साधावा, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, तसेच विद्यार्थी व युवकांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय अन्याय निवारण कृती संघटना, सुरेश मनवर यांनी केले.

**वाशिममध्ये विद्यार्थ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा**

- वाशिम येथे विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून आपल्या मागण्यांसाठी आवाज उठविला. आंदोलनादरम्यान केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करत सरकारविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. तसेच सोनम वांगचूक आणि अभिजित दिपके यांच्या समर्थनार्थही घोषणा देण्यात आल्या. मोर्चानंतर विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. या आंदोलनात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

**आंदोलनांतील प्रमुख मागण्या**

- केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा.
- लडाखला पूर्ण राज्याचा दर्जा देण्यात यावा.
- भारतीय राज्यघटनेच्या सहाव्या परिशिष्टात लडाखचा समावेश करण्यात यावा.
- आंदोलनकर्त्यांशी संवाद साधून त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा.
- नागरिकांच्या घटनात्मक आणि लोकशाही अधिकारांचा सन्मान करावा.

## न्यूज ब्रीफ

### नदी-नाले कोरडेच ; पावसाची प्रतीक्षा

**कारंजा :** जुलै महिना अर्धा संपला असून, पावसाळ्याचा निम्मा कालावधी उलटत आला आहे. मात्र कारंजा तालुक्यात अद्याप दमदार आणि सर्वदूर पावसाने हजेरी लावलेली नाही. काही ठिकाणी तुरळक सरी कोसळल्या असल्या तरी तालुक्याच्या बहुतांश भागात पावसाने पाठ फिरविल्याचे चित्र आहे. परिणामी नदी-नाले, ओढे आणि लहान जलस्रोत अजूनही कोरडेच असून अनेक ठिकाणी पाण्याचा प्रवाहच सुरू झालेला नाही. त्यामुळे शेतकरी, पशुपालक आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

### मिटकॉनमार्फत नि:शुल्क प्रशिक्षण

**वाशिम :** मिटकॉन व जिल्हा उद्योग केंद्र वाशीम यांच्या संयुक्त विद्यमाने सुशिक्षित बेरोजगार युवक व युवतींकरिता स्वयंरोजगाराभिमुख विविध तांत्रिक उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रवेशाकरिता उमदेवार हा १८ ते ४५ वयोगटातील असावा तसेच शैक्षणिक पात्रता किमान वर्ग १० वी पास अथवा नापास असावा. उपरोक्त पात्रताधारक उमेदवारांनी प्रवेश अर्ज व अधिक माहिती करिता २२ जुलै पर्यंत जिल्हा कार्यालय मिटकॉन, मार्गे कॉम्पलेक्स अथवा जिल्हा उद्योग केंद्र वाशीम येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

## अमोल काकड यांची विशेष कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती

**काजळेश्वर उपाध्ये / प्रतिनिधी**

कारंजा तालुक्यातील काजळेश्वर येथील सुपुत्र तथा सध्या अमरावती येथील जीवन ज्योती वसाहत, प्रभाग क्र. १० येथे वास्तव्यास असलेले अमोल मोतीराम काकड यांची विशेष कार्यकारी अधिकारी पदावर नुकतीच नियुक्ती करण्यात आली.

अमरावती भाजपा ओबीसी मोर्चाचे अध्यक्ष कुणाल टिकले तसेच माजी उपमहापौर संध्या टिकले यांनी शासनाकडे केलेल्या पाठपुराव्यानंतर संत गजानन महाराज मंदिर, जीवन ज्योती कॉलनी, अमरावती येथे आयोजित



कार्यक्रमात अमोल काकड यांना विशेष कार्यकारी अधिकारी पदाचे नियुक्तीपत्र सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले. यावेळी कॉलनीतील मान्यवर उपस्थित होते. अमोल काकड यांच्या नियुक्तीबद्दल उपस्थितांनी आनंद व्यक्त करत त्यांचे कौतुक केले. कार्यक्रमात डोळे गुरुजी यांनी प्रास्ताविकातून अमोल काकड यांच्या सामाजिक कार्याचा परिचय उपस्थितांना करून दिला. कार्यक्रमाच्या शेवटी राजू काकड यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## एकतानगर परिसरात ४२ हजारांची चोरी

**रिसोड / प्रतिनिधी**

शहरातील एकतानगर परिसरात अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश करत सोन्याचे दागिने, रोख रक्कम व साड्या असा एकूण ४२ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर घरातील कपाटातून १२ हजार रुपये किमतीचे सोन्याचे टॉप्स, १६ हजार रुपये किमतीची कानातील रिंग, ४ हजार रुपये किमतीचे लहान मुलीचे सोन्याचे टॉप्स, १० हजार रुपयांची रोख रक्कम चोरी केली.

## कॉँग्रेसला धक्का ; सचिन इप्पर ५५० कार्यकर्त्यांसह भाजपात

### महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत सोहळा

**रिसोड / प्रतिनिधी**

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत कोराडी (नागपूर) येथे भारतीय जनता पक्षाचा पक्षप्रवेश सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सचिव सचिन इप्पर यांनी आपल्या ५५० कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

भाजपा नेते नकुल देशमुख आणि अमृता देशमुख यांच्या नेतृत्वाखाली हा पक्षप्रवेश सोहळा आयोजित करण्यात आला. सचिन इप्पर यांच्यासोबत युवक, ज्येष्ठ नागरिक, सरपंच, सदस्य, माजी



जिल्हा परिषद सदस्य तसेच सेवा सहकारी संस्थांचे अध्यक्ष व सदस्य यांनी भाजपाचा शेला स्वीकारून पक्षात प्रवेश केला. यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्वांचे पक्षात स्वागत करत पक्षसंघटना अधिक मजबूत करण्याचे आवाहन केले. या प्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, माजी मंत्री व माजी खासदार अनंतराव देशमुख, खासदार अनुप धोत्रे, भाजपा नेते नकुल देशमुख तसेच जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे यांच्या नेतृत्वाखाली रिसोड-मालेगाव विधानसभा, वाशिम जिल्हा आणि पश्चिम विदर्भात भाजपाची ताकद अधिक वाढवून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये विजय मिळवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाला भाजपा जिल्हा महामंत्री गजानन लाटे, ग्रामीण मंडळ अध्यक्ष सुभाष खरात, डॉ. श्रीराम गरकळ, गजानन देशमुख यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फाळेगाव थेट येथे एचपीव्ही लसीकरण जनजागृती

**दगड उमरा / प्रतिनिधी**

येथून जवळ असलेल्या फाळेगाव थेट येथील श्रीराम चरणदास बाबा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या आरोग्याचे संरक्षण आणि भविष्यातील गंभीर आजारांपासून बचाव करण्याच्या उद्देशाने एचपीव्ही लसीकरण जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेला पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य गजानन वारकड होते, तर वैद्यकीय अधिकारी डॉ. बंडू चिखलकर यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन



केले. कार्यशाळेत एचपीव्ही विषाणू, त्यापासून होणारे आजार, विशेषतः गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचा धोका तसेच योग्य वयात लसीकरणाचे महत्त्व याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. समाजात लसीकरणाबाबत असलेल्या गैरसमजुती दूर करून वैज्ञानिक माहितीच्या आधारे पालकांनी आपल्या पाल्यांचे वेळेवर लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. विद्यार्थी आणि पालकांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांची तज्ज्ञांनी समाधानकारक उत्तरे देत लसीकरण सुरक्षित, प्रभावी आणि आरोग्यदायी भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या प्राचार्य गजानन वारकड यांनी विद्यार्थ्यांच्या आरोग्य संरक्षणासाठी अशा जनजागृती उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित करत सर्व पालकांनी आरोग्यविषयक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले.

कार्यशाळेला पालक, विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, आरोग्यसेवक तसेच आशा सेविका उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स. शि. जी. एन. ठाकरे यांनी केले, तर स. शि. आर. व्ही. कव्हर यांनी आभार प्रदर्शन केले. उपस्थितांनी हा उपक्रम माहितीपूर्ण व अत्यंत उपयुक्त ठरल्याची भावना व्यक्त केली.

## मानसिक आरोग्य जनजागृती कार्यशाळा

**वाशिम / प्रतिनिधी**

जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम, जिल्हा रुग्णालय वाशिम यांच्या वतीने १८ जुलै रोजी शरदचंद्र पवार उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय, सुपखेला येथे विद्यार्थ्यांसाठी मानसिक आरोग्य जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला.

विद्यार्थ्यांमध्ये मानसिक आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, अंधश्रद्धा व व्यसनाधीनतेपासून दूर राहण्याचा संदेश देणे तसेच मानसिक आजारांबाबत योग्य माहिती पोहोचविणे हा कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता. कार्यक्रमात मनोविकृती सामाजिक कार्यकर्ते सुनील सुर्वे यांनी मानसिक आजारांची लक्षणे, कारणे, उपचार तसेच जिल्हा रुग्णालयामार्फत उपलब्ध असणाऱ्या मोफत सेवांची सविस्तर माहिती दिली. अध्ययन अक्षम, मतिमंद व तीव्र मानसिक आजारी दिव्यांग व्यक्तींना मिळणारे यू.डी.आय.डी. प्रमाणपत्र तसेच समुपदेशनासाठी उपलब्ध टेली-मानस टोल फ्री क्रमांक १४४१६ याविषयीही त्यांनी मार्गदर्शन केले.

अंधश्रद्धा, व्यसनाधीनता आणि मानसिक आरोग्य यांचा परस्परसंबंध स्पष्ट करत लहान मुलांमधील मानसिक आरोग्य समस्यांची लक्षणे वेळेत ओळखून उपचार घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. मानसिक आरोग्य ही प्रत्येकाची जबाबदारी असून जनजागृती ही आजच्या काळाची गरज आहे, असे प्रतिपादन सुनील सुर्वे यांनी केले. तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत सामाजिक कार्यकर्ते रामकृष्ण धाडवे यांनी तंबाखू सेवनामुळे होणारे गंभीर आरोग्यदुष्परिणाम, तंबाखूमधील घातक रसायने, मुखाच्या कर्करोगाचा वाढता धोका, तंबाखूचे व्यसन सोडण्याचे प्रभावी उपाय, निरोगी जीवनशैलीचे महत्त्व तसेच तंबाखूविरोधी कायद्यातील तरतुदी याविषयी मार्गदर्शन केले. शालेय परिसर तंबाखूमुक्त ठेवण्यासाठी विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

### रामा इंटरनॅशनल स्कूलचा उपक्रम ; कायद्याविषयी पोलिस अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन

# विद्यार्थ्यांना सुरक्षितता व वाहतूक नियमांचे धडे

**वाशिम / प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये वैयक्तिक सुरक्षितता, वाहतूक नियमांचे पालन आणि कायद्याविषयी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने रामा इंटरनॅशनल स्कूल, वाशीम येथे शाळेचे पालक दीपक कावरखे यांच्या सहकार्याने वाशीम शहर पोलिसांच्या विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमात एपीआय सिता वाघमारे (वाशीम सिटी) यांनी विद्यार्थ्यांना ''गुड टच बॅड टच'' या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श यातील फरक, स्वतःची



सुरक्षितता कशी जपावी, अनोळखी व्यक्तींपासून सावध कसे राहावे तसेच कोणत्याही अनुचित प्रसंगी पालक, शिक्षक किंवा पोलिसांची त्वरित मदत घेण्याचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना सोप्या व प्रभावी भाषेत समजावून सांगितले. यानंतर एपीआय (ट्रॅफिक) बालासाहेब नाईक यांनी विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे महत्त्व, रस्ता सुरक्षितपणे कसा ओलांडावा, वाहतूक चिन्हांची ओळख, हेल्मेट व सीटबेल्ट वापरण्याची आवश्यकता, वाहतूक सिग्नलचे पालन तसेच जबाबदार नागरिक म्हणून वाहतुकीचे नियम पाळण्याचे महत्त्व पटवून दिले. ''विद्यार्थ्यांनी लहानपणापासूनच वाहतूक नियमांचे पालन केल्यास सुरक्षित आणि शिस्तबद्ध समाज घडण्यास मदत होते,'' असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत विविध प्रश्न विचारले. उपस्थित पोलिस अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे समाधान करत त्यांना सुरक्षित, जागरूक आणि जबाबदार नागरिक बनण्याचा संदेश दिला. कार्यक्रमाच्या शेवटी रामा इंटरनॅशनल स्कूलच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये वैयक्तिक सुरक्षितता, वाहतूक नियमांविषयी जागरूकता आणि पोलिसांप्रती विश्वास निर्माण करणारा हा उपक्रम उपयुक्त व प्रेरणादायी ठरला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि कर्मचाऱ्यांनी विशेष सहकार्य केले.

**गुड टच बॅड टच विषयी मार्गदर्शन**

- चांगला व वाईट स्पर्श यातील फरक समजावून सांगितला.
- स्वतःची सुरक्षितता जपण्याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन.
- अनोळखी व्यक्तींपासून सावध राहण्याचे आवाहन.
- अनुचित प्रसंगी पालक, शिक्षक किंवा पोलिसांची त्वरित मदत घेण्याचे महत्त्व स्पष्ट.

**वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन**

- रस्ता सुरक्षितपणे ओलांडण्याच्या पद्धती.
- वाहतूक चिन्हांची ओळख.
- हेल्मेट व सीटबेल्ट वापरण्याचे महत्त्व.
- वाहतूक सिग्नलचे पालन व जबाबदार नागरिक म्हणून नियम पाळण्याचा संदेश.

## २९ जुलैपूर्वी मतदार नोंदणी अर्ज जमा करा : महादेव कव्हर

**वाशिम / प्रतिनिधी**

मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) मोहिमेअंतर्गत प्रत्येक पात्र नागरिकाने आपल्या भागासाठी नियुक्त करण्यात आलेल्या मतदारस्तरीय अधिकाऱ्यांकडे (बीएलओ) जाऊन स्वतःचा तसेच कुटुंबातील सर्व पात्र मतदारांचा नोंदणी अर्ज भरून २९ जुलै २०२६ पूर्वी जमा करावा, असे आवाहन भाजपा तालुका उपाध्यक्ष महादेव कव्हर यांनी केले आहे.

प्रत्येक अर्जासोबत रंगीत पासपोर्ट आकाराचे छायाचित्र जोडून आवश्यक त्या ठिकाणी स्वाक्षरी करून संबंधित मतदारस्तरीय अधिकाऱ्याकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे. निर्धारित मुदतीत अर्ज न भरल्यास अथवा आवश्यक माहिती न दिल्यास संबंधित मतदाराचे नाव मतदार यादीतून वगळले जाण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी कोणताही विलंब न करता प्रक्रिया पूर्ण करावी, असे त्यांनी सांगितले.मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेदरम्यान मतदारस्तरीय अधिकारी घरभेटीद्वारे मतदारांची माहिती व कागदपत्रांची पडताळणी करणार आहेत. त्यामुळे अधिकारी भेटीस आल्यास त्यांना आवश्यक माहिती व कागदपत्रे वेळेत उपलब्ध करून द्यावीत. तसेच मतदार यादीतील नाव, पत्ता व इतर तपशील अचूक असल्याची खात्री करून घ्यावी, असेही आवाहन भाजपा तालुका उपाध्यक्ष महादेव कव्हर यांनी केले आहे.

## अर्जेंटिनाला १-० ने हरवून दुसरे विजेतेपद पटकावले

# स्पेनला फुटबॉल वर्ल्डकप जिंकवून देणारे हिरो





**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

स्पेनने अर्जेंटिनाला १-० ने हरवून फुटबॉल विश्वचषकाचे दुसरे विजेतेपद पटकावले. संघाची सर्वात मोठी ताकद त्याची मजबूत बचावफळी होती. त्यांच्याविरुद्ध संपूर्ण स्पर्धेत फक्त एकच गोल झाला.

संघाने स्पर्धेत सर्वाधिक ५४५० पास दिले. यापैकी ४९३० पास यशस्वी झाले. त्यांची अचूकता ९० टक्के होती. या स्पर्धेत स्पेनचा संपूर्ण संघ एकजुटीने खेळला.

संघाकडे लामिन यामालसारखा स्टार खेळाडू होता. तर कर्णधार रोड्रीने मिडफिल्डमधून खेळावर नियंत्रण ठेवले. स्पर्धेतील सर्वोत्तम गोलकीपर असलेल्या उनाई सिमोनविरुद्ध फक्त एकच गोल झाला.

**१. फेरान टोरेस :** अंतिम सामन्यात गोल केला टोरेस अंतिम सामन्यात ६२व्या मिनिटाला ओयारजाबालच्या जागी मैदानात उतरला. त्याने पेड्रो पोरोच्या क्रॉसवर निको विल्यम्सच्या हेडरने मिळालेला चेंडू गोलपोस्टमध्ये पोहोचवला. तो विश्वचषक अंतिम सामन्यात विजयी गोल करणारा दुसरा बदली खेळाडू ठरला.

**२. लामिन यमाल :** ३० यशस्वी ड्रिबल केले यमालने उपांत्य फेरीत फ्रान्सविरुद्ध फाऊल मिळवला. यावर पेनल्टी मिळाली आणि ओयारजाबालने गोल केला. केवळ १९ वर्षे १ दिवसाचा असलेल्या यमालने स्पर्धेत ३० यशस्वी ड्रिबल केले. हे स्पर्धेत कोणत्याही खेळाडूने केलेले सर्वाधिक ड्रिबल आहेत.



**३. रोड्री :** मिडफिल्डमधून खेळावर नियंत्रण रोड्रीने स्पर्धेत सर्वाधिक ८०३ पास दिले. यामध्ये त्याची अचूकता ९४% होती. हे स्पर्धेत कोणत्याही खेळाडूने दिलेले सर्वाधिक पास आहेत. त्याने उपांत्य फेरीत फ्रान्सच्या किलियन एमबाप्पे आणि मायकल ओलिसे यांना अर्धा तास एकमेकांना पास करू दिले नाही. त्याला गोल्डन बॉल पुरस्कार देण्यात आला.

**४. मिकेल ओयार्झाबाल :** संघाचा अव्वल गोलंदाज ओयार्झाबालने स्पर्धेत ५ गोल आणि १ असिस्टसह संघाच अव्वल गोलंदाज राहिला. वर्ल्ड कपमध्ये नॉकआउट सामन्यात दोन गोल करणारा तो पहिला स्पॅनिश खेळाडू ठरला.

**५. पॉ क्यूबार्सी :** सर्वोत्कृष्ट युवा खेळाडू निवडला गेला क्युबार्सीला स्पर्धेतील सर्वोत्तम युवा खेळाडू म्हणून निवडण्यात आले. तो स्पर्धेत ८५७ मिनिटे खेळला. त्याने ९७% अचूकतेने ६९० पास दिले. अंतिम सामन्यात क्युबार्सीला अर्जेंटिनाच्या फर्नांडेझने पाडले आणि फर्नांडेझला रेड कार्ड मिळाले.

**६. उनाई सिमोन :** स्पर्धेत फक्त एक गोल गमवला सिमोनला स्पर्धेतील सर्वोत्तम गोलकीपर म्हणून निवडण्यात आले. त्याला गोल्डन ग्लव्ह अवॉर्ड देण्यात आला. सिमोनने मैदानात पूर्ण ८५७ मिनिटे घालवली. त्याने १४ गोल रोखले. त्याने पेनल्टी एरियाच्या आत १२० आणि बाहेर ९३ इंटरसेप्ट केले. संपूर्ण स्पर्धेत त्याने फक्त एक गोल खाल्ला, तोही उपांत्यपूर्व फेरीत बेल्जियमविरुद्ध.

**७. निको विल्यम्स :** असिस्ट करून संघाला फायनल जिंकवून दिली विल्यम्सला संपूर्ण स्पर्धेत फक्त १५९ मिनिटे मिळाली. फायनलमध्ये त्याच्या हेडरनेच चेंडू टोरेसपर्यंत पोहोचवला, ज्यावर विजयी गोल झाला. दोन वर्षांपूर्वी युरो २०२४ च्या फायनलमध्ये त्याने स्वतः गोल करून 'प्लेअर ऑफ द मॅच'चा किताब पटकावला होता.

## फुटबॉल वर्ल्डकप फायनलनंतर अर्जेंटिना-स्पेनचे खेळाडू भिडले



**नवी दिल्ली :** स्पेनने फुटबॉल विश्वचषक फायनलमध्ये अर्जेंटिनाला १-० ने हरवून दुसऱ्यांदा विश्वचषक जिंकला. सामना संपल्यानंतर दोन्ही संघांच्या खेळाडूंमध्ये धक्काबुक्कीही पाहायला मिळाली. अर्जेंटिनाचा कर्णधार लिओनेल मेस्सीला पराभवानंतर भावना अनावर झाल्या. त्याने आपल्यापेक्षा २० वर्षांनी लहान असलेल्या स्पॅनिश स्टार लामिन यमालला मिठी मारून अभिनंदन केले. २००७ मध्ये मेस्सीने यमालला मांडीवर खेळवले होते. त्यानंतर आता दोघे विश्वचषक फायनलमध्ये आमनेसामने दिसले.

## रोहित शर्माने निवृत्तीच्या चर्चा फेटाळून लावल्या

**नवी दिल्ली :** लॉर्ड्समध्ये इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात १३८ धावांची शानदार खेळी केल्यानंतर रोहित शर्माने आपल्या निवृत्तीच्या चर्चा फेटाळून लावल्या. तो म्हणाला की, बाहेरील गोष्टी त्याच्यासाठी महत्त्वाच्या नाहीत आणि त्याचे संपूर्ण लक्ष मैदानावर संघासाठी योगदान देण्यावर आहे.

३९ वर्षीय रोहितने तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात ११० चेंडूंमध्ये १३८ धावा केल्या. मात्र, त्याच्या शतकी खेळीनंतरही भारताला २७ धावांनी पराभव पत्करावा लागला. रोहित म्हणाला, 'माझे काम बॅटने प्रदर्शन करणे आणि देशाचे प्रतिनिधित्व करणे आहे. पदार्पण केल्यापासून मला हेच शिकवले आहे आणि मी हेच करत राहीन.' निवृत्तीच्या अटकळांवर त्याने हसत म्हटले, 'जेव्हा मी पदार्पण केले होते, तेव्हापासून बाहेर आवाज आहे आणि जोपर्यंत खेळणार, तोपर्यंत तो राहील. जर बाहेर आवाज नसेल तर मजा कशी येणार? माझे काम मैदानावर आहे आणि इतरांचे काम बाहेर. बाहेरच्या गोष्टी माझ्यासाठी काही महत्त्वाच्या नाहीत.' सामन्यानंतर पत्रकार परिषदेत कर्णधार शुभमन गिल म्हणाला, 'मला वाटते की हे सर्व माध्यमांमध्ये सुरू आहे. संघाच्या आत अशी कोणतीही चर्चा झाली नाही. रोहित भाईंनी आम्हाला निवृत्तीबद्दल काहीही सांगितले नाही.'

# प्रियांका चोप्राच्या वाढदिवसानिमित्त पती निकची खास पोस्ट



बॉलिवूड अभिनेत्री प्रियांका चोप्रा १८ जुलै रोजी ४४ वर्षांची झाली आहे. तिच्या वाढदिवसाच्या एक दिवसानंतर, तिचा पती आणि गायक निक जोनासने सोशल मीडियावर एक खास व्हिडिओ शेअर करून तिला शुभेच्छा दिल्या आहेत. या व्हिडिओमध्ये प्रियांका स्पेनमध्ये एका याटवर सुट्ट्यांचा आनंद घेताना दिसत आहे.

दरम्यान, प्रियांकाच्या वाढदिवसानिमित्त तिच्या आगामी 'वाराणसी' चित्रपटातील तिचा पहिला लूकही प्रदर्शित करण्यात आला आहे. अलीकडेच एका पॉडकास्ट दरम्यान, निक आणि प्रियांकाने त्यांच्या प्रेम कथेबद्दल सांगितले होते आणि २०१६ मध्ये त्यांची बोलणी कशी सुरू झाली होती, हे सांगितले होते. निक जोनासने रविवारी त्याच्या अधिकृत इंस्टाग्राम अकाउंटवर एक छोटा व्हिडिओ पोस्ट केला. हा व्हिडिओ स्पेनमधील आहे, जिथे दोघे सुट्ट्या घालवत आहेत. व्हिडिओमध्ये एक सुंदर याट दिसत आहे, ज्यावर प्रियांका चोप्रा बिकिनी घालून कॅमेऱ्यासमोर हसत पोज देत आहे.

तिने सनग्लासेस आणि डोक्यावर बँडना बांधला आहे. व्हिडिओमध्ये प्रियांका निकला फ्लाइंग किस देताना दिसत आहे. निकने या पोस्टच्या कॅप्शनमध्ये स्पॅनिश भाषेत लिहिले आहे, 'फेलिज कमप्लेआनोस! मी अमोर' म्हणजेच 'वाढदिवसाच्या शुभेच्छा, माझे प्रेम'. या व्हिडिओच्या बॅकग्राउंडमध्ये त्याने एक फ्लेमेंको गिटार गाण्याचा वापर केला आहे.

अलीकडेच, प्रियांका चोप्रा तिच्या पतीच्या 'जोनास ब्रदर्स' बँडच्या एका पॉडकास्टमध्ये सहभागी झाली होती. यावेळी निकने आठवण करून दिली की, त्याने प्रियांकाला डेट करायला कशी सुरुवात केली होती. निकने सांगितले की, त्याचा भाऊ केविन जोनासने त्याला प्रियंकाचा 'क्वांटिको' शो पाहण्याचा सल्ला दिला होता.



## लंडनमध्ये अक्षय कुमार अडखळला; पडता पडता वाचला

बॉलिवूड अभिनेता अक्षय कुमार रविवारी लंडनच्या लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर भारत आणि इंग्लंड यांच्यात खेळल्या गेलेल्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यादरम्यान दिसला. यावेळी त्याचा नवीन पांढऱ्या दाढीचा लूक चर्चेत राहिला. त्याने पांढऱ्या आणि बेज रंगाच्या ड्रेससोबत काळ्या केसांचा नवीन लूक स्वीकारला होता.



स्टेडियममध्ये अक्षय कुमारसोबत सैफ अली खान, त्याचा मुलगा तैमूर अली खान देखील उपस्थित होते. सोशल मीडियावर सामन्यादरम्यानचे अनेक फोटो आणि आणि व्हिडिओ समोर आले, ज्यात सर्वजण सामन्याचा आनंद घेताना दिसले.

सामन्यादरम्यान अक्षय आणि सैफ बोलतानाही दिसले. तर, सामन्यानंतर समोर आलेल्या एका व्हिडिओमध्ये चालताना अक्षय कुमार अचानक अडखळला. मात्र, तो पडण्यापासून वाचला. यावर सैफ अली खान आणि तैमूर हसू लागले. अक्षयनेही या क्षणाला विनोदी पद्धतीने घेतले आणि सर्वजण एकत्र हसत पुढे गेले.

अक्षय कुमार आणि सैफ अली खान लवकरच 'हैवान' चित्रपटात एकत्र दिसणार आहेत. हा चित्रपट ११ सप्टेंबर २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. दोघे सुमारे १८ वर्षांनंतर एकत्र स्क्रीन शेअर करणार आहेत. यापूर्वी त्यांनी 'मैं खिलाडी तू अनाडी', 'ये दिल्लगी', 'आरजू' आणि २००८ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'टशन'मध्ये एकत्र काम केले आहे. या चित्रपटात सयामी खेर देखील महत्त्वपूर्ण भूमिकेत आहे.




## सार्वजनिक मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी संसद योग्य ठिकाण

### कंगना रणौतची कॉकरोच पार्टीच्या आंदोलनावर टीका

भाजप खासदार आणि अभिनेत्री कंगना रणौतने संसदेजवळ सुरू असलेल्या कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनावर टीका केली आहे. पावसाळी अधिवेशनादरम्यान माध्यमांशी बोलताना कंगना म्हणाली की, कोणाला पदावरून हटवण्यासाठी किंवा पदावर ठेवण्यासाठी सरकारवर दबाव टाकणे चुकीचे आहे. सार्वजनिक मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी संसद योग्य ठिकाण आहे, आंदोलन नाही, असेही ती म्हणाली.

कंगना म्हणाली की, हे सर्व जंतर-मंतरवर गोंधळ घालत आहेत, धुमाकूळ घालत आहेत. ज्या पद्धतीने आंदोलन सुरू आहे ते योग्य नाही. दिल्लीतील जंतर-मंतरवर कॉकरोच जनता पार्टी विद्यार्थ्यांच्या मागण्यांच्या समर्थनार्थ अनेक दिवसांपासून आंदोलन करत आहे.



कंगना रणौत यांनी सोमवारी पावसाळी अधिवेशनादरम्यान संसद भवनाबाहेर सांगितले की, संसद अधिवेशनाचे आयोजन सर्व मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यासाठी आणि प्रश्न विचारण्यासाठी केले जाते. कंगना यांच्या मते, जनतेने एक सरकार निवडले आहे आणि सरकार चालवण्याचा अधिकार त्यांच्याकडेच आहे.

त्या म्हणाल्या की, जर कुणी इतकेच सामर्थ्यवान वाटत असेल, तर त्यांनी स्वतः निवडणूक लढवावी. आंदोलनाच्या माध्यमातून सरकारवर दबाव आणणे योग्य नाही. कंगना यांनी असेही म्हटले की, हळूहळू प्रत्येकजण भाजप आणि सनातन संस्कृतीच्या आश्रयाला येईल कारण हीच आपली संस्कृती आहे.

सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला चित्रपटसृष्टीकडून सातत्याने पाठिंबा मिळत आहे. अभिनेते प्रकाश राज यांनी सरकारला आवाहन केले आहे की, त्यांनी आंदोलक आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधावा आणि शांततापूर्ण आंदोलनांचा आदर करावा. अभिनेत्री शबाना आझमी यांनीही या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे.

## तो आधीपेक्षा खूपच बारीक दिसला

### सलमान खानचा नवा लूक चर्चेत..

मुंबईत एका कार्यक्रमादरम्यान सलमान खानचा नवा लूक चर्चेत आला, जिथे तो आधीपेक्षा खूपच बारीक दिसला. यानंतर चाहत्यांनी त्याच्या तब्येतीबद्दल चिंता व्यक्त केली आणि काही लोकांनी त्याला ट्रोलही केले.

याच दरम्यान, रविवारी रात्री उशिरा सलमानने एक्स वर आपले नवीन ब्लॅक अँड व्हाईट फोटो शेअर करत लिहिले, 'तुम्ही लोक कसे आहात?' सलमानने शेअर केलेल्या फोटोंमध्ये तो व्हायरल व्हिडिओच्या तुलनेत खूपच चांगला आणि फिट दिसत आहे.

दरम्यान, सलमानचा आणखी एक व्हिडिओ समोर आला. ज्यामध्ये तो त्याच्या व्हायरल व्हिडिओच्या तुलनेत थोडा चांगला दिसत आहे. मात्र, त्याच्या डोळ्यांभोवती हलका थकवा दिसत आहे. सलमान खान शुक्रवारी मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणच्या कार्यालयात एका विशेष कार्यक्रमासाठी गेले होते. तेथे त्यांनी प्राधिकरणाच्या नवीन डेटा कलेक्शन अँड व्हेरिफिकेशन सपोर्ट सेंटर (आयटी सर्वर रूम) चे उद्घाटन केले.

यावेळी त्यांनी तेथे उपस्थित लाभार्थ्यांना त्यांच्या नवीन घरांच्या चाव्याही सुपूर्द केल्या.



कार्यक्रमादरम्यान सलमान खानसोबत त्यांचे बॉडीगार्ड शेरा देखील उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अनेक व्हिडिओ इंटरनेटवर समोर आले, त्यानंतर त्यांच्या शारीरिक स्थितीबद्दल चर्चा सुरू झाली.




**बुलढाणा**

**एआरडी सिनेमॉल**

**मैं वापस आऊंगा** : दुपारी २:००, सायं. ५:३०, रात्री ९:००
**धमाल-४** : दुपारी २:१५, सायं. ५:४५, रात्री ९:१५

**खामगाव**

**श्री गजानन टॉकिज**

**धमाल-४** : दुपारी १२, दु. ३, सायं. ६, रात्री ९

**सनी पॅलेस टॉकिज**

**धमाल-४** : दुपारी १२, दु. ३, सायं. ६, रात्री ९

**वाशिम**

**एच२एम मूव्हीप्लेक्स**

**कत्तलान** : दुपारी १२:१५
**देऊळ बंद-२** : सकाळी ११:४५, दुपारी ३:०५, सायंकाळी ६:२०, रात्री ९:३५
**राजा शिवाजी (मराठी)**: दुपारी २:५५, सायं. ६:२५, रात्री ९:४५

**अकोला**

**मिराज**

**थमाल ४** : स. ९.०० , स. ११.५०, दु. १.४५ , दु. २.५०, दु. ५.००, रात्री ८.१५, रात्री ११.१५
**इव्हिल डेड बर्न (हिंदी)** : स. ९.०० , दु. २.४०, दु.५.५०
**दी ओडीसी (इंग्रजी)** : स. ९.१५, दु. ४.००, रात्री १०
**दी ओडीसी (हिंदी)** : स. ११.२०, दु. १२.३५ , सायं. ७.३०, रात्री ११.००
**वेलकम टू दी जंगल** : दु. १०.३०
**बेबी डू डाई डू** : दु. ४.४५
**बोल बोल राणी** : रात्री ८.००
**अल्फा** : रात्री १०.३०

**छत्रपती संभाजीनगर**

**इनॉक्स प्रोझोन मॉल**

**ईव्हील डेड बर्न** : सकाळी ११:१५, दुपारी १२:१५, २:३०, ४:३०, सायंकाळी ५:३०, ६:३०, रात्री १०:००
**धमाल - ४** : दुपारी दुपारी १२:१५, २:३०, ४:३०, सायंकाळी ५:३०
**मोना** : दुपारी १२:३०, सायंकाळी ५:३०
**वेलकम टू द जंगल** : दुपारी १२:१५, २:३०
**द ओडीसी** : दुपारी १२:१५, २:३०
**बोल बोल राणी** : दुपारी १२:३०, सायंकाळी ५:३०

**खिंवसरा सिनेप्लेक्स**

**धमाल-४** : सकाळी ११:१५, दुपारी १२:१५, २:३०, ४:३०, सायंकाळी ५:३०, ६:३०
**ईव्हील डेड बर्न** : दुपारी १२:१५, ४:३०, सायंकाळी ६:३०
**आऊट ऑफ सिलॅबस** : दुपारी १२:३०, २:३०, रात्री १०:२५
**वेलकम टू द जंगल** : सायंकाळी ५:३०, ६:३०
**घबाडकुंड** : दुपारी १२:१५

**मुक्ता - नुपूर सिनेमागृह**

**धमाल-४** : सकाळी १०:००, दुपारी १२:००, ३:००, ४:०० सायंकाळी ६:००
**वेलकम टू द जंगल** : सकाळी १०: १०, दुपारी ५ : ३०, सायंकाळी ८ : ००
**ईव्हील डेड बर्न** : दुपारी २:३०, रात्री १०:२५
**द ओडीसी** : दुपारी १२ : ००, रात्री ९ : ३०
**देऊळ बंद - २** : दुपारी १२ : ००, दुपारी २:३०